# पाणिपतची बखर



व्हीनस बुक स्टॉल पुणे

ई/४३६

# पाणिपतची बखर



संपादक

डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी

१४५०

# ाणिपतची बखर

संपादक

डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी
एम. ए. पीएच्. डी.

सिटी बुक स्टॉल
आप्पा बळवंत चौक, पुणे ३०

प्रकाशक :
**वि. गं. कुलकर्णी**
गौतम प्रकाशन
३२३ सदाशिव पेठ, पुणे २.

सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती

मुद्रक :
**वि. गं. कुलकर्णी,**
विद्या प्रिं...
१०९७ सदाशिव पेठ,
बाजीराव रोड, पुणे ३०

पानिपतचा रणसंग्राम ' प्रस्तुत संपादनात संदर्भासाठी वापरले आहेत याचा निर्देश करावासा वाटतो. पहिल्या ग्रंथात प्रा. न. र. फाटक व सेतुमाधवराव पगडी यांनी फार्शी साधनांचा अनुवाद दिला आहे त्याचा उपयोग झाला तर दुसऱ्या ग्रंथात भाऊसाहेबांची काही नव्याने उपलब्ध झालेली पत्रे पानिपत प्रकरणावर नवा प्रकाशझोत टाकण्यात उपयुक्त ठरली.

ऐतिहासिकतेपेक्षा या बखरीबाबत कलात्मकताच वरचढ ठरली असल्याने कलात्मकतेचे विविध पैलू विस्ताराने विवेचले आहेत. रसाविष्कार व्यक्तिचित्रे, वर्णनकौशल्य, निवेदनकौशल्य, भाषाशैली आणि रघुनाथ यादवाचा व्यक्तित्त्वाविष्कार हे या बखरीचे तेजस्वी पैलू आहेत. वेधक व भेदक तपशिलातून मूर्त होणारे प्रत्ययकारी युद्धाचे चित्रण, प्रभावी मनोदर्शन आणि त्यातून इतिहासातील घटनात्मक सत्यापलीकडच्या मानवाच्या भावसत्यापर्यंत मजल गाठण्याचे रघुनाथ यादवाचे कौशल्य यामुळे बखरीची उंची वाढली आहे.

बखरवाङ्मयाकडे केवळ गौरवपूर्ण वा तुच्छतापूर्ण दृष्टीने न पाहता विशुद्ध चिकित्सात्मक दृष्टीने पहावे ही या संपादनामागील भूमिका आहे. इतिहास व ऐतिहासिक कादंबरी यांच्या सीमारेषेवरील या वाङ्मयप्रकाराकडे समतोल दृष्टीने पाहणे म्हणजे खरोखर तारेवरची कसरतच होय. तरीही हा प्रामाणिक प्रयत्न जिद्दीने केला आहे.

प्रस्तुत बखरीच्या संपादनात भारत इतिहास संशोधक मंडळाचे प्रा. ग. ह. खरे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य अडचणीमुळे पाणिपतच्या बखरीचे मुद्रण घाईने उरकले असल्याने अनवधानाने काही मुद्रणदोष राहिले असण्याची शक्यता आहे. वाचकांनी याबद्दल क्षमा करावी.

डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी
मनोहर भवन
१४४४ सदाशिव, पुणे ३०.

दिनांक
२०-११-७१

# संदर्भग्रंथ

## इतिहास

१) पानिपत १७६१ ... प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर
२) नाना फडणीस यांचे शब्दात पानिपतचा रणसंग्राम
... विवेचक– श्री. शं. ना. जोशी
३) पानिपतचा संग्राम भाग पहिला ... संपा. श्री. न. र. फाटक, सेतुमाधवराव पगडी
४) मराठी रियासत भाग ६ पेशवा बाळाजीराव .. गो. स. सरदेसाई
५) मराठी रियासत मध्यविभाग ३ पानिपत प्रकरण.
... गो. स. सरदेसाई
६) ऐतिहासिक प्रस्तावना ... वि. का. राजवाडे
७) मराठ्यांच्या इतिहासाची साधने ... खंड १, ३ व ६
... वि. का. राजवाडे.
८) पुरंदरे दप्तर ... खड १ व ३.
९) The Battles of Panipat .. Lt. Col. Gulcharan Singh
१०) Fall of the Mughal Empive Vol. II ··· Sir J. N. Sarkar
११) पेशवे दप्तर भाग २. २१ व २७.
१२) नानासाहेब पेशवे यांचे चरित्र ... गो. स. सरदेसाई

## टीका

१) मराठी बखर ... प्रा. र. वि. हेरवाडकर
२) मराठी बखर गद्य ... प्रा. गं. ब. ग्रामोपाध्ये
३) प्राचीन मराठी गद्य – प्रेरणा आणि परंपरा
... डॉ. श्री. रं. कुलकर्णी.

## बखर

१) भाऊसाहेबांची कैफियत .. संपा. का. ना. साने
२) भाऊसाहेबांची बखर ... संपा. शं. ना. जोशी
३) पाणिपतची बखर ... संपा. प्रा. र. वि. हेरवाडकर
४) पाणिपतची बखर ... संपा. र. मु. जोशी

## कोश

१) फार्शी-मराठी कोश ... मा. त्रि. पटवर्धन

# शुद्धिपत्र

## प्रस्तावना

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ तळटीप | १ | बखरकार्रांना | बखरकारांना |
| ८ तळटीप | १ | Unconseious | Unconscious |
| १० | १९ | कलाकृतीला | कलादृष्टीला |
| २० | १४ | worthless all | weorthless of all |
| २१ | २६ | पृ. १७६ | क्र. १७३ |
| ३१ | ३ | वारज | वारण |

## पाणिपतची बखर

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | २ | मुक्का | मुक्काम |
| १ | ५ | छ ५ | छ २५ |
| ७ तळटीप | २ | दिल्ली | दिली |
| ९ | २० | भरस्वती | भरवस्ती |
| २० | १८ | भांडी | मांडी |
| ३२ | १० | आऱ्ही | आम्ही |
| ४९ | ४ | यावाज | आवाज |

## टीपा

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५८ | ८ | म्हणजे | म्हणणें |
| ६४ | ७ | पशाविना | पैशाविना |
| ६७ | २ | तोफखानाच्या | तोफखान्याच्या |
| ७३ | १९ | खंदकणार | खंदकपार |
| ७८ | १७ | प्रत | प्रेत |

# अनुक्रमाणिका


*प्रस्तावना* पृष्ठे १ – ३७

*पाणिपतची बखर* पृष्ठे १ – ५०

१) वर्तमान विदित व्हावे आज्ञा ... ... १
२) भाऊसाहेब यांची हिंदुस्थान प्रांती रवानगी .. ... १
३) फौजेचा बंदोबस्त, यमुनातटाकांस भाऊ दाखल ... ... ३
४) इराणी आणावयाचा संकेत ... ... ५
५) सुजातदौला याजकडे वकिली ... ... ५
६) जाटाशी बुद्धिवाद, जाट अविश्वासू ... ... ६
७) दिल्ली–कुंजपुरा लुटून फस्त ... ... ९
८) दुराणी यमुनातीरास, तोफांची सरबत्ती ... ... १०
९) भाऊंचा ' लढाई व्हावी हाच संकल्प ' ... ... ११
१०) तवईचा वक्त गुजरला .. ... १२
११) लढाईची मर्दुमी ... ... १३
१२) इराणीतर्फे वकिली ... ... १४
१३) ' बंदोबस्त करणे तो आम्हीच करू ' ... ... १७
१४) सरदार बोलावून सरफराई ... .. १८
१५) रणांगणाचा शृंगार ... ... १९
१६) सैन्याचे चार भाग ... ... २०
१७) महाधुरंधर संग्राम ... ... २०
१८) पेशव्यांकडील सरदार पडले त्यांची नांवनिशी ... ... २४
१९) दुराणीकडील सरदार पडले त्याची नांवनिशी .. ... २६
२०) दुतर्फा नाश बहूत झाला ... ... २७
२१) ' मराठे बडे जोरदार हटेले ' ... ... २७
२२) जखमी लोकांची उस्तवारी ... ... २७

२३) दाणावैरणीकरता फिकीर ... ... २८
२४) 'या हट्टाने सर्व लयास गेले. काही आहे तेही जाणार' ... २८
२५) 'सत्कीर्ती करून मरावे या भूषणापरतें दुसरें काय आहे'... ३०
२६) भाऊसाहेब व विश्वासराव यांची भाषणे व प्रतिज्ञा ... ३१
२७) लढाईस तयार ... ... ३२
२८) 'आजचा निदान समय' ... ... ३३
२९) खंदकपार जाहाले ... ... ३४
३०) दुराणीच्या तीन टोळ्या ... ... ३६
३१) एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली ... ... ३७
३२) रणमर्द चढला ... ... ३७
३३) कलियुगी असा योद्धा कोणी जाहाला नाही. .. ... ३९
३४) विश्वासराव वैकुंठवासी ... ... ४०
३५) भाऊसाहेबांस परम दुःख ... ... ४०
३६) मलकाजमानीचा हुकूम ... ... ४२
३७) कल्पांतीचा आदित्य. ... ... ४३
३८) सूर्य असताच अंधःकार. ... ... ४३
३९) नानासाहेबांचा शोक. ... ... ४४
४०) भाऊसाहेबांचें उसनें घ्यावें. ... ... ४४
४१) नानासाहेब कैलासवासी. ... ... ४५
४२) विश्वासरावांचे प्रेत गोसाव्यांचे हवाली. ... ... ४५
४३) सर्वस्व बुडाले. ... ... ४५
४४) यथामतीने बखर सजविली. ... ... ४७
पुणे २. प्रतीमधील मजकूर ... ... ४७
टीपा पृ. ५१–८४

# प्रस्तावना

## १. बखरवाङ्मयाचे विशेष

### प्राचीन मराठीतील वैभवसंपन्न दालन

प्राचीन मराठींत गद्याचा प्रवाह जोमदार होण्यास बखर वाङ्मय कारणीभूत ठरलें आहे. बखर वाङ्मयाने स्वतःचे असे स्वतंत्र स्थान आणि परंपरा प्राचीन मराठीत निर्माण केली आहे. प्राचीन मराठी पद्यवाङ्मयांतील तत्त्वज्ञान पांडित्य वा काव्य यांचे वैभव येथें नसले तरी भावनांची खळबळ आणि विचारांचा आवेश बखर वाङ्मयांत निराळ्याच ढंगाने प्रगट होतो. बखर हा वाङ्मय प्रकार परकीय की स्वकीय याबाबत मतभेद होतांना दिसतात. बखर ही इतिहाससाधन म्हणून अभ्यसनीय कीं केवळ ललितकृती म्हणून तिच्याकडे पाहणें आवश्यक, यावद्दलही टीकाकारांत मतांतरे आढळतात; परंतु बखरवाङ्मयाने मराठी सारस्वतांत गद्याचा वैशिठ्यपूर्ण जोरकस प्रवाह निर्माण करून मराठी गद्याला ऐश्वर्य प्राप्त करून दिले, याबाबत मात्र टीकाकारांत एकमत आहे. विशेषतः 'सामान्य परिवारू'साठीं लिहिलेले महानुभावांचे साधेसुधे गद्य पाहिल्यावर तर तुलनेनें बखरवाङ्मयांतील डौलदार, लालित्यपूर्ण गद्य मनाला अधिक आकर्षून घेते यांत संशय नाहीं.

### बखर – व्युत्पत्ती व उपपत्ती

बखर या शब्दाची व्युत्पत्ती आणि त्या अनुषंगाने बखरींच्या स्वरूपासंबंधीं मांडल्या गेलेल्या उपपत्ती यांचे थोडक्यांत दिग्दर्शन करणें उपयुक्त ठरेल. वि. का. राजवाडे यांनीं संस्कृत भष् धातूचा अपभ्रंश बख आहे यावरून बखर हा शब्द आला असावा असें म्हटलें आहे. प्रारंभीं बखरी तोंडी सांगितल्या जात असाव्या व नंतर त्यांचे लेखन झालें असावें, अशी कल्पना त्यांनीं मांडली आहे. (ऐ. प्र. पृ. ३४८ ) फारशी शब्द खबर (स्त्री.) ( अर्थ–बातमी, हकीकत, इतिहास ) यावरून कांहीजण बखर

शब्द वर्णव्यत्यास होऊन आला असे मानतात, ही व्युत्पत्तीच अधिक ग्राह्य वाटते. " मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनीहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला ' ही राजवाड्यांची उपपत्ती (ऐ. प्र. पृ. २ ) या व्युत्पत्तीला पोषकच आहे. राजवाड्यांचे हें अनुमान प्रमाण मानलें तर बखर या शब्दाचे मूळ व ही कल्पना परकीय आहे असें म्हणावे लागतें. प्रा. हेरवाडकरांनी हेंच मत मान्य केलेलें आहे. ( मराठी बखर पृ. ९) परंतु अलीकडे डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनीं आपल्या ' प्राचीन मराठी गद्य—प्रेरणा आणि परंपरा ' या ग्रथांत बखर या शब्दाची खबर या फार्शी शब्दावरून लावलेली व्युत्पत्ती आणि बखर हा प्रकार परकीय अनुकरणाने मराठींत आला ही कल्पना या दोन्ही अग्राह्य ठरविल्या आहेत. ' प्राचीन काळी टिकाऊ स्वरूपाचे लेख चामड्यावर लिहिले जात. ते चामडे बकरीचे असण्याची शक्यता आहे, म्हणून बकर वरून बखर ' अशी व्युत्पत्ती ते मांडतात. ( पृ. १०० ) ही व्युत्पत्ती ओढून ताणून लावलेली दिसते. डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांचा मुख्य रोख ' फारसी अखबारनवीस आणि मराठी बखरकार यांच्या भूमिकेत मूलभूत फरक आहे. ' यावर आहे. प्रशस्ती गाणाऱ्या आश्रितांच्या मालिकेंत बखरकारांना बसविणें चुकीचें ठरेल. कारण, अप्रिय सत्याचे कथन, पराजयाच्या घटनांची नोंद बखरकार करतात असें स्पष्टीकरण करून डॉ. कुलकर्णी म्हणतात, ' बखरकारांनी अखबारनवीसाचे अनुकरण केलें असेल हें संभवनीय वाटत नाहीं ' ( पृ. ९७ ) बखर हा प्रकार सर्वस्वी पूर्वपरपरेंतून निर्माण झाला हें डॉ. कुलकर्णींचे आग्रहाचे प्रतिपादन पटण्यासारखें नाहीं.

बखरकारांनी अखबारनवीसांचे तंतोतंत अनुकरण केलें नाहीं हें खरें पण पुष्कळ वेळा बखरकारांची भूमिका कैफियती सादर करण्याची, समर्थनपर, दृष्टी पक्षपाती होती हें नाकारतां येणार नाहीं. भाऊसाहेबांची बखर, सभासदाची बखर, पानिपतची बखर या धन्याच्या आज्ञेवरून लिहिल्या गेल्या आहेत. बखरीमागील हा पोष्य-पोषक भाव संपूर्णपणे दुर्लक्षिता येण्यासारखा नाहीं. तसेच कित्येक बखरकार पारसनवीस म्हणजे फारशी भाषेंत तरबेज होते. एकीकडे संस्कृतची परंपरा तर दुसरीकडे

फारशीचा संस्कार यांचा बखर सजविण्यासाठीं उचित विनियोग बखरकारांनीं केला आहे. फारशीवरून ही इतिहास-चरित्राची लेखनपद्धती (बखर) उचलून तिला पौराणिक साज बखरकारांनीं चढविलेला दिसतो. वर्णनांत संस्कृतचा भारदस्तपणा आणून त्याला फारशीमधील शब्द भांडाराची जोड त्यांनीं दिली आहे. थोडक्यांत बखर हा लेखनप्रकार फारशींवरून घेतला तरी त्याला वळण मात्र अस्सल मराठी दिले असे म्हणणेच सयुक्तिक ठरेल. बखरीमागील संस्कृत आणि फारशी परंपरेच्या संस्कारांचे धागे उलगडले म्हणजे बखरीचे स्वरूप पूर्णपणें उलगडते असें मात्र होत नाही. याबरोबरच बखर लेखनामागे बखरकारांची विशिष्ट मनोधारणा होती. ज्या कालांत ते वावरत होते व बखरलेखन करीत होते त्या कालांतील प्रेरणांनी ते भारले गेले होते हा महत्त्वाचा धागा लक्षांत घ्यावा लागतो.

## बखर लेखनाची पार्श्वभूमी व प्रेरणा

मराठीत बखरींना ज्या कालांत बहर आला, त्या कालच्या अनुरोधाने बखर लेखनामागील प्रेरणा सहज अजमावता येतात. शिवकाल आणि पेशवेकाल म्हणजे स्वराज्य प्राप्त झालें व त्याचें साम्राज्यात रूपांतर झाले. या कालांत बखरींची निर्मिती मोठ्या प्रमाणांत झाली. मराठ्यांच्या स्वराज्य-साम्राज्य कालांत देशप्रेम, स्वातंत्र्यप्रेम, स्वामिनिष्ठा, पराक्रम किंवा क्षात्रधर्म यांचा श्रद्धापूर्वक अंगिकार झाला; या प्रेरणा वाढीस लागल्या. बखरकारांच्या मनोभूमिकेंत या प्रेरणा रुजलेल्या दिसतात. उत्तरोत्तर बखरींत या प्रेरणांचेच स्फुरण पाहावयास मिळतें. प्रा. ग्रामोपाध्ये यांनी बखरीमागें वीरयुगाची पार्श्वभूमी होती. शिवकाल व पेशवेकाल या कालांत बखरीत वीरांच्या पराक्रमाचें पोवाडे व रणचंडीचे रोमहर्षक वर्णन यांना उधाण आलें असें म्हटलें आहे. ( मराठी बखर गद्य-प्रस्तावना पृ. ३-४) 'बखरीचे रोपटे स्वराज्याबरोबर वाढलें, साम्राज्याबरोबर त्याचा वृक्ष झाला' ( मराठी बखर पृ. २४९ ) असें अलंकारिक वर्णन प्रा. हेरवाडकरांनी केलें आहे, त्यांत या प्रेरणा गर्भित आहेतच. डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनीं ' महाराष्ट्रभूमी यवनाक्रांत झाली असतांना धर्मरक्षण, धर्मजागृती

करणें या प्रेरणांनी उद्युक्त होऊन हे लेखन झाले. पुढें ज्यांनी धर्मस्थापना केली, त्या अवतारांचे गायन करण्यांत बखर लेखक रमू लागले' असें प्रतिपादन केलें आहे. धर्मरक्षणप्रेरणा ही बखरीची मूलप्रेरणा मानणें खरोखर एकांगी आहे. स्वत: डॉ. कुलकर्णींनी बखरीला उतरती कळा का लागली याची मीमांसा करतांना 'स्वातंत्र्य, स्वधर्म याविषयीं भावना क्षीण झाल्या. एकराष्ट्रीयत्वाला तडे गेले' याचा निर्देश केला आहेच. म्हणजेच बखर निर्मितींत स्वदेशप्रीती व स्वातंत्र्यप्रीती या प्रेरणांचाही मोठा वाटा आहे, हें ओघानें आलेच बखरींतील घटनांबद्दल व व्यक्तींबद्दल बखरकारांना विशेष आस्था, जिव्हाळा वाटतो, तो या प्रेरणांमुळेच.

साकल्यानें पाहता बखरीमागील प्रेरणा संमिश्र आहेत; गुंतागुंतीच्या आहेत. पुराणासारखी धर्मजागृतीची प्रेरणा काहींच्या बुडाशी आहे. अखबारनवीसांप्रमाणें 'कैफियत' मांडण्याचा अट्टाहास कांहीं बखरीत आहे तर कांहीं ठिकाणीं बखर 'सजविण्याचा' कलाकुसर निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्नही आहे. म्हणजेच निर्भेळ, विशुद्ध अशी कोणतीं एक प्रभावी प्रेरणा या संबंध बखरवाङ्मयाला प्राणभूत आहे असें म्हणणें धाडसाचें ठरेल. धर्मजागृती, देशाभिमानानें परिप्लुत वृत्तांतकथन, ऐतिहासिक व्यक्तींचा गौरव किंवा कलापूर्ण चित्रण अशा विविध प्रेरणांचा कमी–अधिक प्रभाव पडून, लेखकाच्या मगदुराप्रमाणें व मनोधारणेंप्रमाणें बखरीला रंगरूप प्राप्त होते असेच अखेरीस म्हणावें लागेल.

## बखर – संमिश्र वाङ्मय प्रकार

बखरीमागील या संमिश्र प्रेरणा लक्षांत घेतल्या म्हणजे बखर हा समिश्र वाङ्मय प्रकार आहे, हें सहज ध्यानांत येते. ऐतिहासिक घटना निवेदन करणें, वृत्तांत कथन करणें म्हणजे इतिहास येथे आहे. ऐतिहासिक व्यक्तीचे कर्तृत्व, पराक्रम यांचे गुणगान त्यांचे चरित्र रंगवून येथे केलेले पाहावयास मिळते. चरित्राप्रमाणें कथात्मकतेचा भागही बखरींत आढळतो. ऐतिहासिक घटनांचें किंवा चरित्रांतील प्रसंगाचें वर्णन यांच्यांत भावना आणि कल्पना यांची खुलावट आणून, ललितकथेप्रमाणें निवेदनांत चटकदारपणा

रंजकता आणून, डौलदार भाषाशैलीचा आश्रय करून, बखरकार साहित्य-गुण प्रकट करतात. इतिहास, चरित्र, ललितकथा यांचे एक आगळेंच मिश्रण यामुळें बखरींत तयार होते. या मिश्रणांतून भावनारहित, पक्षरहित अशा इतिहासापासून वेगळी असलेली, परंतु ऐतिहासिक ललित कृतीपासूनही जरा लांबच असलेली अशी बखर सिद्ध होते. विषय इतिहासाधिष्ठित परंतु त्याची मांडणी मात्र ललित वाङमयाच्या गुणविशेषांना पोषक असें बखरीचें स्वरूप वर्णन करतां येईल. बखरीचा अभ्यास करतांना बखरींचें हे संमिश्र स्वरूप नेहमी डोळ्यापुढें असले तरच तिला योग्य तो न्याय मिळेल. अन्यथा कधीं इतिहाससाधन म्हणून तर कधीं ललितकृती म्हणून तिच्याकडून भलभलत्या अपेक्षा केल्या जाण्याची शक्यताच अधिक.

आपल्याकडे प्रारंभीं राष्ट्राभिमानाच्या प्रेरणेंतून बखरींचे संशोधन सुरू झालें आणि त्यावेळी अर्थातच बखरींचा अभ्यास राजवाडे, रा. ब. का. ना. साने यांनीं इतिहाससाधन म्हणून केला. ही दृष्टी एकांगी होती हें आज ( विशेषतः बखरीच्या वाङमयीन गुणविशेषावर भर देतांना ) आपल्याला खटकते, परतु आज आपण बखरीकडे स्वतत्र वाङमयप्रकार या विशुद्ध वाङमयीन दृष्टीने कितीही पाहण्याचा प्रयत्न केला तरी बखरींची निर्मिती या पद्धतींने झालेली नाहीं. तिच्यामागें विशुद्ध वाङमयीन प्रेरणा नाही, हें उघड आहे. तेव्हां बखर म्हणजे इतिहाससाधन ही कल्पना चुकीची ठरवितांना बखर आणि इतिहास यांचा जो अतूट संबंध आहे तो तोडणें असमंजसपणाचें होईल. तसेच बखरींत लालित्य असले तरी ती स्वतंत्र निर्मिती किंवा कलाकृती नसते ही तिची मर्यादाही तिचें वाङमयीन आकलन करतांना ध्यानांत ठेवणें अत्यावश्यक आहे. बखरीला असणारे ऐतिहासिकता आणि कलात्मकता यांचे दोन पदर जवळून न्याहाळले म्हणजे तिचें इतिहास आणि ऐतिहासिक कलाकृती यांच्यापासून असणारे वेगळेपण नेमके मनावर ठसेल.

## बखरीची ऐतिहासिकता

बखर म्हणजे इतिहास नव्हे, हे आतां नव्यानें सांगण्याची गरज उरलेली

नाही. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं इतिहासाचें साधन म्हणून सुद्धां बखरींना प्रमाण मानलेलें नाहीं. त्यांतील स्थल, काल आणि व्यक्ति यांचा विपर्यास, काटेकोरपणा किंवा प्रमाणबद्धतेचा अभाव, अतिशयोक्तीचें प्राबल्य या दोषामुळें त्यांना फारसें महत्त्व देतां येत नाहीं, असें राजवाड्यांनीं प्रतिपादन केलें आहे ( ऐ. प्र पृ. ३ ) इतिहाससाधन म्हणून असणारे बखरीचे मूल्य सांगणारे राजवाड्यांचें वाक्य— " एक अस्सल चिटोरें सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे—" वापरून इतकें गुळगुळीत झालें आहे कीं त्यांतसुद्धां अतिशयोक्ती आहे हें आपल्याला खटकत नाहीं. राजवाड्यांनीं अस्सल कागदपत्रांच्या तुलनेनें बखरींना कमी लेखलें आहे, हें येथें ध्यानांत घेतलें पाहिजे. तसेंच बखरकारांनीं जाणूनबुजून सत्यापलाप केलेला नाहीं, समकालीन बखरींत स्थलकालविपर्यासाचा दोष कमी आहे, हेंही त्यांनीं मान्य केलें आहे.

वास्तविक आजची इतिहासशास्त्राची पद्धती—ज्यांत अस्सल साधनसंग्रह त्याची निवड आणि त्यांतून निःपक्षपाती भूमिकेनें काढलेले निष्कर्ष, यांनाच केवळ स्थान आहे—ती पद्धती बखरकाराकडून अपेक्षिणें कितपत न्यायाचें होईल ? त्यांची भूमिका असा शास्त्रशुद्ध इतिहास लिहिण्याची नाहींच. स्थल, काल, व्यक्ती यांचा काटेकोर तपशील देणें ही त्यांची वृत्तांतकथनांतील किंवा ऐतिहासिक व्यक्तीच्या चरित्र लेखनामागील भूमिका नाहीं. बखरकारानें वृत्तांत वा चरित्र यांचा स्थूल आराखडा वा चौकट ही मूळ ऐतिहासिक आधार असलेली अशी निवडली आहे. या दृष्टीनें पाहतां बखरीचा विषय ऐतिहासिक आहे असें म्हणावें लागतें, पण या चौकटींत रंगभरणी मात्र बखरकारानें स्वतःच्या विशिष्ट भावनेच्या, भूमिकेच्या कुंचल्यानें केली आहे. हे विसरतां येत नाहीं. बखरकाराची या वृतान्तांकडे, घटनांकडे वा चरित्राकडे पाहण्याची ही भूमिका पुष्कळदां तत्कालीन समाजाची प्रातिनिधिक असते आणि यामुळें बखरींतील वर्णनांत, विकारविचारांच्या आविष्कारांत त्या समाजाच्या आशा-अपेक्षा, भाव-भावना याचें प्रतिबिंब पडलेलें आढळतें. ही प्रक्रिया जेथे घडते, तेथे इतिहास निराळ्या अर्थानें साकार होतो. बखरीची पाहणी त्यांतील ऐतिहासिक तपशील अस्सल किती या भूमिकेने

न करता खरोखर त्यात तत्कालीन समाजाचे मानसचित्र कसे उमटले आहे या भूमिकेनें केली तर बखरींतील ऐतिहासिकेतचा खरा अर्थ आपल्याला आकळेल. इतिहास संशोधक प्रा. शेजवलकर यांनीं बखरीसंबंधी एक महत्त्वाचें विधान केलें आहे ते या संदर्भात लक्षणीय वाटते. ' बखरीवरून इतर कांहीं कळत असो नसो, पण तत्कालीन समाजाच्या आशा-आकांक्षा, भावना व हर्षामर्ष यांचा बोध अवश्य होतो. ( पानिपत १७६१ पृ. १०२)

बखरींतून आलेला पानिपतसंग्रामांतील तपशील किंवा शिवचरित्रांतील तपशील कितपत सत्य आहे यावर बखरीचे मोल ठरविण्यापेक्षां या संग्रामाकडे वा चरित्राकडे पाहण्याची जनमानसाची जी स्वाभिमानाची, गौरवाची भूमिका होती ती बखरींत कितपत प्रतिबिंबित झाली आहे, तसेंच तत्कालीन वातावरणाचा प्रत्यय या बखरींतून कितपत येतो हें अजमावणेंच अधिक श्रेयस्कर ठरेल. शिवशाही व पेशवेशाही या कालांत मराठी समाजाचे मन कोणत्या प्रेरणांनीं प्रभावित झालें होते. शौर्य, स्वाभिमान, स्वामिनिष्ठा, देवप्रेम या गुणांच्या आविष्कारासाठीं ते कसें आसुसले होते, या गुणाचा गौरव करण्यांत ते कसे दंग झाले होते, याची साक्ष म्हणजे या कालातील बखरवाङ्मय होय.

## बखरीची कलात्मकता

बखरीचा दुसरा पदर कलात्मकतेचा. आजच्या वाङ्मयीन दृष्टींत अभ्यासाच्या या अंगालाच मोठें महत्त्व दिले जाते. बखरीचा विषय इतिहासावर आधारीत तर मांडणी कलात्मक असते हें आपण पाहिलेच. विषयाबद्दल बखरकाराला जो जिव्हाळा वाटतो, वर्णित व्यक्ती वा प्रसंग याबद्दल जो अभिमान त्याच्या मनीं दाटतो, त्यामुळे वर्णनांत आपोआप जिवंतपणा, उत्कटता हे गुणविशेष अवतरतात. इतिहासांतील व्यक्तींच्या विकारविचाराशीं समरस होऊन बखरकार प्रसंग वर्णन करतो. यामुळें ललितकथेतील चित्रणाचा आगळा रंग बखरीत उतरू लागतो. रसाविष्कार, व्यक्तिचित्रण, मनोदर्शन, संवाद, वर्णनकौशल्य, निवेदनकौशल्य हे ललित कथेच्या लालित्याचे अंगभूत घटक बखरींत दृग्गोचर होऊ लागतात. खेरीज

या सर्व घटकांना एका सूत्रांत गोवणारे बखरकारांचे व्यक्तित्वही बखरीत प्रतिबिंबित होतें.

बखर हा जसा इतिहास नव्हे, तसेच ते विशुद्ध वाङमयही नव्हे, त्याची प्रेरणा जशी वेंगळी, तसा त्याचा अवतारही आगळा. बखर सिद्ध होतांना ललित वाङमयाचे घटक आणि गुणविशेष यांना आत्मसात करते, हे तिचे वैशिष्टच महत्त्वाचें आहें. ही प्रक्रिया कदाचित अजाणता* होत असेल, बखरकाराच्या तळमळी पोटीच साहित्य गुण निम ण होत असतील किंवा हें बखरकार कधीं जाणीवपूर्वकही साधत असेल. बखरकारांची भूमिका व कुवत यानुसार बखरींतील कलात्मकतेंत तरतमभाव आढळ-णार हें तर खरेच; पण सर्वसाधारपणें बखरींतील कलात्मकता तिच्या ऐतिहासिकतेपेक्षां उठावानें दिसावी असे बखरकारांनाही वाटत असावे. याचे एक गमक म्हणजे बखर वाचन करतांना आपल्याला जो प्रत्यय येतो, त्यांत ज्ञानापेक्षां प्रक्षोभाचाच भाग अधिक असतो. बखरीपासून ज्ञानानंदापेक्षां भावनानंदच अधिक प्रमाणांत लाभत नसतो काय ? असे असले तरी बखर आणि ऐतिहासिक कादंबरी यांच्या भूमिकेत, पद्धतींत, आविष्कारांत मात्र मूलभूत फरक असतो.

## बखर आणि ऐतिहासिक कादंबरी

बखरकार आणि कादंबरीकार याच्या भूमिकेंतील मूलभूत फरक हा आहे कीं, बखरकाराची भूमिका निवेदकाची ( वृत्तांत, घटना, घडामोडी यांचे निवेदन ) असते. तर कादंबरीकाराची भूमिका नवनिर्मिती साध-णाऱ्या कलावताची असते. भावना, कल्पना यांचा शिडकावा निवेदनांत केल्यामुळें बखरकाराला बखरींत लालित्य किंवा वाङमयीन गुण आणतां येतात. निवेदन वर्णन यांतील तद्रूपता–तादात्म्य यामुळें बखरीतील सृष्टी ललित वाङमय सृष्टीशी जवळीक साधू लागते; परंतु कादंबरीकार इति–

* प्रा. ग्रामोपाध्ये बखरकारांना ( Unconseious Artist ) म्हणतात; ( मराठी बखर गद्य प्रस्तावना पृ. ६ ) परंतु नवनिर्मिती साधणाऱ्या कलावतांच्या पंक्तींत बखरकारांना बसविणें अवघड आहे.

हासांतील प्रसंग आधाराला घेऊन ऐतिहासिक तपशिलाची निवड करून, त्यांतील भावसत्य नेमकें हेरून प्रतिभाबलाने जी निर्मिती ( Creation ) साधतो ती कलेची अपरसृष्टी बखरीत उतरूं शकत नाहीं असेच म्हणावे लागते. बखरकाराने भावनाकल्पना यांचें साह्य घेतले तरी प्रतिभावंताची निर्मितीची पातळी ती गाठू शकत नाही.

ऐतिहासिकतेचा बखरीचा पदर तिला पार्थिवाशीं अधिक प्रमाणांत जखडून ठेवतो. ऐतिहासिक कादंबरीकार याबाबत अधिक स्वातंत्र्य घेतांना दिसतो. बखरकाराची ऐतिहासिक सत्याशीं प्रामाणिक राहण्याची भूमिका या दृष्टीनें विशेष विचारांत घ्यावी लागते. इतिहासाचार्य राजवाडे यांनीहि बखरकारांचा हा प्रामाणिकपणाचा गुण वाखाणिला आहे परंतु यामुळे खरे पाहतां बखरकारांच्या चित्रणाला बंधनच पडलें आहे. ऐतिहासिक सत्यापेक्षां इतिहासांतून गवसणाऱ्या भावसत्याला कादंबरीकार प्रमाण मानतो आणि त्या दृष्टीनें थोडे स्वातंत्र्यही घेतो. ऐतिहासिक वास्तव आणि काल्पनिक यांचें मिश्रण करून या भावसत्याचा आविष्कार करणारी एकजिनसी कलाकृती निर्माण करण्याची कादंबरीकाराची धडपड असते यामुळेंच कलाकृतीला सार्वकालीन असा आशय अर्थ प्राप्त होतो इतिहासाच्या तात्कालिकांतून कलेच्या शाश्वततेकडे तिची वाटचाल होते बखरींत तत्कालीन सामाजिक जीवनाचा संदर्भ महत्त्व पावतो तर या संदर्भाला भेदून अखिल मानवी जीवनापर्यंत ऐतिहासिक कलाकृती भिडते. नवनिर्मितीची पातळी आणि ऐतिहासिक सत्यापेक्षां भावसत्यावर भर दिल्याने लाभणारे शाश्वततेचें अधिष्ठान ही दोन वैशिष्टयें ऐतिहासिक कादंबरीला बखरीहून वेगळी उंची प्राप्त करून देतात.

## बखरीची पौराणिक पद्धति

बखरकारांच्या भूमिकेत ऐतिहासिकतेला वास्तव, सत्य यांना असणारे प्राधान्य हे त्यांच्या चित्रणाला जसें बंधनकारक झालें आहे, तसेच बखरकारांची पुराणांचे अनुकरण करण्याची पद्धती ( जिला डॉ. श्री. रं. कुलकर्णी पुराणशरणता म्हणतात ) त्याच्या कल्पनाविलासाला मर्यादित

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१११ बढाशिव पेठ, पुणे ३०,

अडकविणारी ठरली आहे. प्रसंगवर्णनांत, व्यक्तिवर्णनात बखरकार स्वतंत्र भावना, कल्पना यांना अवसर न देतां पुराणातील प्रसंगांचा आणि व्यक्तींचा निर्देश करतात, पौराणिक वर्णनांचा आश्रय घेतात, कथासंदर्भ उचलतात. तेथील दृष्टांत अलंकार यांचा वापर करतात. हा सर्व पौराणिक थाट बखरींना एक निराळा ढंग प्राप्त करून देत असला पौराणिक काल आणि वातावरण यांचा भास यामुळें होत असला तरी स्वतंत्र कलाकृतींतील वर्णनांची सर या अनुकरण प्रेरित वर्णनांना येत नाहीं. एक प्रकारची सांकेतिकता, साचेबंदपणा या वर्णनाला, दृष्टांत अलंकारांना येऊं लागतो.

पुराणसदृश साहित्य निर्माण करणें ही बखरकारांची भूमिका होती असें आग्रही प्रतिपादन डॉ. श्री. रं. कुलकर्णी करतात परंतु या भूमिके-मुळे बखरींतील कलात्मकतेला मर्यादा पडली आहे, याकडे त्यांनीं लक्ष वेधलेले नाहीं. युद्धवर्णनांत राम-रावणी युद्ध, भारती युद्ध यांचे दृष्टांत, शौर्यवर्णनांत भीमार्जुन-कर्ण यांचे निर्देश प्रथम भव्य पार्श्वभूमी देणारे वाटले तरी त्यांचीं पुनरुक्ती त्यांतील सांकेतिकताच उघड करते. या. दृष्टांतांतून, दाखल्यांतून बखरकारांची बहुश्रुतता प्रतिबिंबित होत असली तरी त्यांच्या कल्पनेनें स्वैर भरारी न मारतां रामायण-महाभारत यांतील ठराविक उदाहरणांचा, संदर्भांचा वापर करण्यावरच समाधान मानणें हें आजच्या कलाकृतीला थोडेसें खटकतेच.

बखरकारांनीं दिलेल्या वंशावळी, सृष्टीची उपपत्ती, प्राचीन राज-वंशाची माहिती, पुराणांच्या धर्तीवर येणारी ऐश्वर्यप्राप्तीची फलश्रुती यांचे समर्थन बखरकारांच्या पुराणोक्त धर्मरक्षण प्रेरणेच्या अन्वयें किंवा पुराणसदृश साहित्यनिर्मितीच्या अनुषंगानें केलें तरी बखरीचा कलात्मक एकजिनसीपणा यामुळें बाधीत होतो हें नाकारण्यांत अर्थ नाहीं.

जेथें बखरकारांच्या जीवनदृष्टींतच ही अद्‌भुतता, दैववाद चमत्कार यांचा प्रभाव असलेली पुराणांची विचारसरणी भिनलेली आहे. तिथें ही ही पौराणिक पद्धती सांकेतिक राहत नाहीं. तेथें बखरकारांच्या व्यक्तित्वाचा

तो एक भाग बनल्यामुळें बखरींतील व्यक्तित्वाविष्कारात त्याचा स्वाभाविकपणें अन्तर्भाव होतो. बखरीला कलात्मक एकजिनसीपणा प्राप्त करून देणारें खरें केंद्र म्हणजे बखरकारांचें हें व्यक्तित्व होय. या दृष्टीनें बखरींतील व्यक्तित्वाविष्काराचे आकलन होणें जरूर आहे.

## बखरींतील व्यक्तित्वाविष्कार

बखरींत ऐतिहासिकतेपेक्षां कलात्मकता वरचढ असतें, असें मागें म्हटलें, असें होण्याचें प्रमुख कारण म्हणजे बखरींत होणारा व्यक्तित्वाविष्कार हें होय. एकच घटना केंद्रीभूत असलेल्या एकाच प्रसंगाचें वर्णन करणाऱ्या दोन बखरींत फरक पडतो, याचें कारण त्या बखरकारांना उपलब्ध झालेली माहिती वेगळी असते. यापेक्षांही त्यांची या घटनेकडे या प्रसंगाकडे पाहण्याची दृष्टी भिन्न असते. त्यांत भाग घेणाऱ्या व्यक्तीबद्दलच्या या बखरकारांच्या प्रतिक्रिया वेगळ्या असतात. घटना अशी अशी घडली, व्यक्तीचे वर्तन असें असें झालें, या ऐतिहासिकतेबरोबर त्यामागे असलेल्या प्रेरणा कारणपरंपरा, घटनेचे झालेले परिणाम आणि त्यांत गुंतलेल्या व्यक्तीचे रागद्वेष, सुखदुःखें याकडे स्वतःच्या विशिष्ट दृष्टीनें बखरकार पाहतो आणि प्रसंगचित्रण, व्यक्तिचित्रण करतो तेथें अपरिहार्यपणें व्यक्तित्वाविष्कार होतो.

पानिपतसंग्रामावरील 'भाऊसाहेबांची बखर' आणि 'पाणिपतची बखर' या दोन बखरी बरवर चाळल्या तरी बखरकाराच्या व्यक्तित्वाविष्कारामुळें चित्रणांत तफावत कशी पडते हे सहज जाणवतें. भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक प्रसंगवर्णन फुलवतो, व्यक्तींच्या भावभावनांना अधिक अवसर देतो. त्या मानानें रघुनाथ यादव संयमाचा वापर अधिक करतो. भाऊसाहेब हे पानिपतच्या संग्रामाचे नायक ( सेनापती ). त्यांच्याबद्दल या दोन बखरकारांची दृष्टी भिन्न आहे. भाऊसाहेबांचा बखरकार भाऊंकडे साशंक, दोषैक दृष्टीनें पाहतो, पानिपतच्या पराभवाचा मोठा वांटा त्यांचा आहे, अशी त्याची भूमिका दिसते, उलट रघुनाथ यादव भाऊंबद्दल अभिमानानें, गौरवपूर्ण शब्दांनीं लिहितो. त्यांनीं घेतलेले ' सतीचे वाण ' त्यांचें

सरदारांशी असलेले जिव्हाळ्याचें संबंध आणि वकिलांना दिलेल्या प्रत्युत्तरांतून प्रगट होणारा निर्धार यांतून ही गौरवपर भूमिका स्पष्ट दिसते. रघुनाथ यादवाच्या विचारसरणींत दैववादाचा प्रभाव अधिक आहे, यामुळें पानिपतवरील पराभवाचें कारण तो ' श्रीहरी विन्मुख जाहला ' हे देतो; तर भाऊसाहेबांचा बखरकार भाऊंनीं स्वीकारलेली लढाईची यावनी पद्धती दोषास्पद ठरवितो. विषयाची मांडणी, सजावट, व्यक्तिचित्रें आणि मीमांसा या बखरीच्या विविध अंगांत याप्रमाणें व्यक्तित्वानुसार फरक पडत असतो, बखरीचें हें वेगळेपण वा वैशिष्टच हेंच तिच्या कलात्मक समृद्धीचें मूल कारण ठरतें.

बखरीची वाङमयीन दृष्टीनें पाहणी करतांना व्यक्तित्वाविष्काराचा हा पैलू केंद्रीभूत ठरतो. बखरकाराच्या व्यक्तित्वाच्या लोलकांतून बखरींतील घटना, प्रसंग, व्यक्ति यांचे किरण परावर्तित होतात आणि त्यांतून विविधरंगीं वाङमयीन सौन्दर्य अवतरतें. बखरीचा विषय इतिहासांतील असतो म्हणून तिचा ऐतिहासिकतेचा पदर प्राथमिक मानला तरी विषयाच्या मांडणींत, आविष्कारांत बखरकाराच्या व्यक्तित्वाचा मोठा भाग असल्यामुळें बखरीच्या सिद्धींत अखेर कलात्मकतेचा पदरच प्रभावी ठरतो. बखरीच्या ऐतिहासिक मूल्यापेक्षां बखरीच्या वाङमयीन मूल्याकडेच अधिक कटाक्षानें पाहणें आवश्यक ठरतें, तें यामुळेंच होय.

## २. पाणिपतची बखर

### पाणिपतच्या बखरीचा लेखक

पाणिपतच्या बखरीच्या प्रारंभीं गोपिकाबाईच्या आज्ञेवरुन रघुनाथ यादवानें ही बखर लिहिली असा उल्लेख येतो. ' श्रीमंत महाराज मातोश्री गोपिकाबाई..... साहेबांचे सेवेशीं, आज्ञाधारक रघुनाथ यादव लेखक दिमत चिटणीस..... श्रीमंत यांजकडून, वर्तमान आजपर्यंत झालें तें विदित व्हावें म्हणून आज्ञाधारकास आज्ञा

जाहली. त्यास यथामतीनें निवेदन करितो.' रघुनाथ यादव आपण चिटणीसाकडील कारकून असल्याचें सांगतो. या उल्लेखामुळें शिवाजी-महाराजांची बखर लिहिणारा रघुनाथ यादव चित्रे ऊर्फ चित्रगुप्त आणि हा रघुनाथ यादव एकच होय, असें प्रतिपादन प्रा. र. वि. हेरवाडकर यांनीं केलें आहे. ( पा. ब. प्रस्तावना, पृ. १७ ) शिवाजी महाराजांची बखर लिहिणाऱ्या रघुनाथ यादव चित्रे यांचें वर्णन राजवाड्यांच्या ४ थ्या खंडाच्या प्रस्तावनेंत आलें आहे. ( ऐ. प्र. पृ. २१६ ) बाळाजी आवजी चिटणीस हा रघुनाथ यादवाचा चुलत आजा. बाळाजीस चिमणाजी व शामजी हे दोन भाऊ होते. ह्या दोघांपैकीं कोणा एकाचा वंशज रघुनाथ यादव असावा. पौराणिक थाटावर त्यानें आपलें नांव चित्रगुप्त लावलें आहे. कोल्हापूर दरबारी तो चिटणीशी करी. राजारामपुत्र संभाजी याच्या दरबारीं वयाच्या बाराव्या वर्षापासून पुढें ४० वर्षे रघुनाथ यादवानें चिटणीशी केली. संभाजीच्या मृत्यूनंतर त्याला यशवंतराव शिंद्यांचा आश्रय मिळाला. रघुनाथ यादव माहितगार मनुष्य असल्याचें राजवाडे सांगतात. येथें फक्त चित्रगुप्ती बखरीचाच उल्लेख आहे. पाणिपतची बखर या रघुनाथ यादवाचीच असती तर तसा निर्देश राजवाड्यांनीं ओझरता कां होईना येथे केला असता असें वाटतें. पाणिपतची बखर लिहिणाऱ्या रघुनाथ यादवाचा उल्लेख राजवाड्यांच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत दोनदा आला आहे. ( ऐ. प्र. पृ. ९६ व १०८ ) एकाच रघुनाथ यादवाने शिवाजी महाराजांची बखर व पाणिपतची बखर या दोन्ही बखरी लिहिल्या असत्या तर खंड १ प्रस्तावना किंवा खंड ४ प्रस्तावना कुठेंतरी या गोष्टीचा उल्लेख केल्यावांचून राजवाडे राहिले असते असें वाटत नाहीं. यामुळें आणि तर्काशिवाय दुसरा कोणताच आधार उपलब्ध नसल्यामुळें पाणि-पतच्या बखरीचा कर्ता रघुनाथ यादव व चित्रगुप्त हे आज तरी निःसंदिग्धपणें एकच होत असे म्हणतां येत नाहीं. महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे आणि पाणिपतची बखर काव्येतिहाससंग्रहांत प्रथम प्रसिद्ध करणारे रा. ब. का. ना. साने यांनींहि याबाबत संशयच प्रगट केला आहे. ( म. सा. आवृत्ती ५ वी, पृ. ६१३ तळटीप) 'बखर रचणार रघुनाथ यादव यांजविषयी

माहिती अधिक मिळाली नाहीं, ( पा. ब. उपोद्घात, पृ. ५, का. ना. साने आवृत्ती ४ थी )

## पाणिपतच्या बखरीचा लेखनकाल

रघुनाथ यादवानें बखरीला प्रारंभ ' छ. २५ जमादिलाखर ' म्हणजे १० जानेवारी इ. स. १७६३ ला केला. बखरीचा शेवट ' शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे माहे फाल्गुन शुद्ध ५ मंदवासर ' म्हणजे १८ फेब्रुवारीस झाला. या दिवशीं मंदवासर (शनिवार) नव्हता शुक्रवार होता असे राजवाड्यांचे म्हणणें आहे ( ऐ. ए. पृ. १०८ ) पानिपतच्या युद्धानंतर (१७६१) बरोबर दोन वर्षांनीं ( १७६३ ) ही बखर लिहिली गेली. यामुळें समकालीन बखर या दृष्टीनें या बखरीचें महत्त्व विशेष मानलें पाहिजे. रियासतकार सरदेसाई यांनीं पानिपतची बखर विशेष ग्राह्य मानली आहे. ( म. रि. मध्यविभाग ३, पृ. १३३ ) 'पानिपतच्य मुद्धांत रघुनाथ यादव हजर होता ' या सरदेसाईंच्या विधानाला ( म. रि. पे. बा. पृ. ४३७ ) मात्र निश्चित आधार उपलब्ध नाहीं. तो माहितगार होता एवढे मान्य करतां येईल. दफात्यांचा आधार रघुनाथ यादवानें बखरीच्या अखेरीस नमूद केला आहे.

## पाणिपतच्या बखरीच्या प्रती

काव्येतिहास संग्रहांत कै. रा. ब. का. ना. साने यांनीं प्रथम इ. स. १८८५ मध्यें ही बखर प्रसिद्ध केली. साने यांना एकूण चार प्रती उपलब्ध झाल्या. १) पुणें प्रत १, २) भिवंडी प्रत, ३) नागपूर प्रत, ४) पुणें प्रत २. कै. सान्यांनीं पुणें प्रत १ व भिवंडी प्रत याचा मेळ बसत असल्यानें त्यावरूनच बखर प्रसिद्ध केली. कै. साने यांनीं या प्रतिसंबंधीं दिलेली माहिती खालीलप्रमाणें आहे.

(१) ह्या बखरीची पहिली प्रत पुणें येथील राजश्री शंकर तुकाराम शाळिग्राम यांच्या मार्फत मिळाली. ही खर्ची उभ्या बंदांवर लिहिलेलीं आहे. अक्षर चांगले आहे.

(२) दुसरी प्रत भिवंडी येथील एका गृहस्थानें आम्हांकडे पाठविली. ही जुन्नरी कागदाच्या चौरस बंदांवर दोन्ही बाजूंनीं बुकासारखी वही बांधून त्याजवर लिहिली आहे. हिच्या पहिल्या बंदाचे डावे अर्ध गेलें असल्यामुळें व उजवें जीर्ण झाल्यामुळें पहिलीं दोन पृष्ठें नाहींत, असेंच म्हणावयाचें. दोन पृष्ठांचा एक बंद, याप्रमाणें एकेचाळीसाव्या बंदावर म्हणजे ८१ व्या पृष्ठांवर ही बखर समाप्त झाली आहे. ह्या प्रतीचें अक्षर वाटोळें, वळणदार व सुवाच्य लिहिलेलें आहे. पृष्ठांची लांबी-रुंदी फूटफूट असून प्रत्येक पृष्ठावर अकरा ओळी लिहिलेल्या आहेत. वही सुटून बंद निरनिराळे व बरेच जीर्ण झालेले आहेत, तरी अक्षरें शाबूत आहेत. ' कृष्णाजी त्रिंबक जोगळेकर ' असें नांव प्रथम पृष्ठांच्या जीर्ण ालेल्या उजव्या अर्धावर दोनदां घातलेले आहे. शेवटीं " ही किताबत महंमद इभ्राइम वल्लद बापूसाहेब कबे सुभेदार वस्ती कसवे ठाणें तारीख १२ माहे मे सन १८२४ तारीख १२ माहे रमजान शरीफ सन १२३९ हिजरी शके १७४६ तारणनाम संवत्सरे, वैशाख वद्य १ प्रतिपदा बुधवार दिवसाचें अकरा वरावर समाप्त केली. हस्ताक्षर गोपाळराव बल्लाळ गद्रे वसईकर हल्लीं वस्ती कसबे ठाणें " असा लेख आहे. यावरून ही प्रत लिहून साठ वर्षें होऊन गेलीं व मूळ मालकापासून ती जोगळेकर यांजकडे मागाहून आली, असें होतें.

(३) तिसरी प्रत रा. रा. वामनराव दाजी ओक यांनी नागपूरहून बाळबोध प्रत करून पाठविलीं ती. तिच्यावर मूळ बखरीचा शक १६८३ वृषानाम संवत्सर असा दिला आहे. मित्ती फाल्गुन शुद्ध आहे. यावरून तर युद्ध झाल्यावर १ वर्ष २ महिन्यांनींच ही रचिली असें होतें. "ही नकलेची नकल श्रावण शुद्ध ५ पंचमी शके ११५४ (?) आनंदनाम संवत्सरे मुक्काम पुणें येथें केली, असें शेवटीं लिहिलें आहे, ह्यावरून प्रत कधीं केली ह्याचा निर्णय होत नाहीं. नकल करणारा श्रीधर गणेश परांजपे, ह्या नागपूर प्रतींत व वरील पुणें आणि ठाणें प्रतींत मजकूर जरी शेवटपर्यंत एकच आहे, तथापि नागपूर प्रतींत पुष्कळ ठिकाणीं शब्द व वाक्यें जास्त आढळतात.

(४) पुणें येथें बाजारांत आम्ही एक प्रत विकत घेतली ती चौथी

प्रत. हिच्या प्रथम पृष्ठांवर श्रीकाराच्या डाव्या कोपऱ्यावर ' सखाराम मोरेश्वर वझे दस्तुर खुद्द ' असें नांव आहे. हिचे साठ-पासष्ट बंद असावे, पैकीं साडेअठ्ठेचाळीस बंद आम्हांस मिळाले. ही प्रत करणारास मूळ प्रतीचें अक्षर पुष्कळ ठिकाणीं लागलें नाहीं, असें दिसतें. हिच खर्ची बंद उभे दोन फूट लांब व चार इंच रुंद असे आहेत. अक्षर बरें आहे. ही बंदाच्या एका बाजूनें लिहिलेली आहे, हिचें शेवटले बंद नसल्यामुळें ही कोणी कधीं व कोठल्या प्रतीवरून लिहिली हें कळण्यास मार्ग नाहीं. हिचा व वरील नागपूर प्रतीचा बराच मेळ पडतो.

## पाणिपतच्या बखरीची एक नवी आवृत्ती

मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे इ. स. १९५५ साली रघुनाथ यादव चित्रे यांच्या पानिपतच्या बखरीची एक नवी आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे. रघुनाथ मुरलीधर जोशी यांनीं ती संपादित केली आहे. बखरीच्या प्रारंभीं ' श्रीमंत महाराज दौलतराव घोरपडे मलकतमदार ' यांचेसाठी ' रघुनाथराव चित्रगुप्त ' यानें ही बखर लिहिली, असा उल्लेख आहे. हे घोरपडे व ऐतिहासिक पत्रव्यवहारमधील क्र. २५५ चे पत्र नाना फडणीसांना लिहिणारे घोरपडे एकच असावे, असे संपादक म्हणतात. तसेच ते पानिपतच्या युद्धांत समक्ष उपस्थित होते, असें त्यांनीं म्हटलें आहे. संपादकांना उपलब्ध झालेली प्रत ' दौलतराव हिंदुराव घोरपडे यांच्यासाठीं लिहिलेली आणि कुकनूर येथील कोनेर गौडा यांच्या प्रेरणेनें काही महत्त्वाचे फरक करून लिहिलेली दिसते. ' कै. रा. ब. का. ना. साने यांनीं काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध केलेल्या बखरीशीं या बखरीचें बरेच साम्य आढळतें. बराच मजकूर व पुष्कळ वाक्यें दोन्ही बखरींत सारखी आढळतात. परंतु कांहीं बाबतींत फरकही पाहावयास मिळतो.

या बखरीच्या सुरुवातीला निजाम व मराठे यांची बरीच माहिती येते. " मुजफरजंगाच्या प्रेरणेनें हैदरजंगानें भाऊसाहेबांवर हल्ला केला ' असा उल्लेख त्यांत आहे. कै. सान्यांनी प्रसिद्ध केलेल्या बखरींत भाऊसाहेबांची मोहिमेवर रवानगी झाली, येथपासून माहिती येते. मराठवाडा

प्रतींत ' नाना फडणीसाचे नांव नाहीं. " हे तिचे वैशिष्टय म्हणून संपादकांनी सांगितलें आहे आणि कै. सान्यांच्या प्रतींत भाऊसाहेबांनीं युद्धाच्या आदल्या दिवशीं ज्या मंडळींशीं सल्लामसलत केली त्यांतील नाना फडणीसाचा उल्लेख हा ' नानाला पुढें जे राजकीय महत्त्व प्राप्त झालें तें विचारांत घेऊन वाढवलेला आहे ( प्रस्तावना पृ. ७ ) असे मतप्रदर्शन केलें आहे. परंतु नाना फडणीसाचे आत्मचरित्र व भाऊसाहेबांची बखर यांतील उल्लेखांवरून भाऊसाहेब व नाना यांचे निकटचे संबंध प्रस्थापित होतात. दोन्ही बखरींचा शेवटही वेगवेगळा आहे. १४ जानेवारी १७६१ रोजीं म्हणजे युद्धाच्या दिवशी प्रातःकाळी विश्वासराव व भाऊसाहेब स्नानसंध्या व आन्हिक करून सालंकृत आणि सायुध महान राष्ट्रीय कार्ययज्ञ करण्याकरतां निघाले या वर्णनानें मराठवाडा प्रत संपते. उलट कै. सान्यांच्या प्रतीत यानंतरचा विश्वासराव व भाऊसाहेब यांचा हृदयद्रावक अंत, नानासाहेबांचा शोक व त्यांचें देहावसान ही सर्व माहिती येते. मराठवाडा प्रतींत ' आज्ञाप्रमानें तयार जाहले समाप्त ' अशी अक्षरें आहेत. म्हणूनच केवळ ती बखर संपली असे म्हणावें लागले; पण पानिपतच्या हकिगतीच्या दृष्टीनें पाहतां खरोखर पुढील महत्त्वाचा संग्राम वृत्तांत त्यांतून गळला असें दिसतें. संपादकांनींहि ' अशा तऱ्हेचा शेवट केल्यामुळे बखरीला एक प्रकारची अनैतिहासिकता प्राप्त झाली ' असल्याचे मान्य केले आहे. केवळ ऐतिहासिकतेच्या दृष्टीनेंच नव्हे तर कलात्मकतेच्या दृष्टीनेंहि हा शेवट अयोग्य वाटतो. निकाली संग्रामाचा महत्वाचा भागच निवेदनांतून डावलला गेला. तेव्हां या शेवटामुळें बखरीला ' भावना मनोहर अशी काव्यमय कमनीयता ' आली आहे हें संपादकाचें म्हणणें पटत नाहीं.

बखरीचा प्रारंभ आणि शेवट या दृष्टीनें पाहतां कलात्मक संगती कै. सान्यांच्या प्रतींतच अधिक प्रमाणांत आहे. भाऊसाहेबांची व विश्वासरावांची मोहीमेवर रवानगी हा प्रारंभ आणि संग्रामांत भाऊसाहेबांची व विश्वासरावांची पडलेली आहुती, मराठ्यांचा झालेला सर्वस्वनाश आणि नानासाहेबांचा शोकानें झालेला अंत, हा बखरीचा शेवट यांत निवेदनाचा परमोत्कर्ष स्वाभाविक रीतीनें गांठलेला आहे. मराठवाडा प्रतीच्या भाषेपेक्षां कै.

सान्यांच्या प्रतीची भाषा निश्चितच अधिक डौलदार, भारदस्त अशी आहे. तसेच काव्येतिहाससंग्रहात प्रसिद्ध झालेली प्रत रघुनाथ यादवानें गोपिकाबाईसाठीं लिहिलेली आहे, हेंही लक्षणीय आहे. पेशवे घराण्याशीं रघुनाथ यादवाचे संबंध निकटचे असणें हे अधिक स्वाभाविक ठरते. यामुळें कै. साने यांनीं प्रसिद्ध केलेली प्रतच अधिक विश्वसनीय मानावी लागते. शिवाय काव्येतिहाससंग्रहांतील प्रतींत दफात्यांची संगत पाहून बखरींतील हकीगत लिहिली असा निर्देश येतो तसा मराठवाडा प्रतींत नाही हेहि लक्षणीय आहे. दोन्ही प्रतींची मजकूर, भाषा यादृष्टीनें पाहणी करतां कै. सान्यांनीं काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध केलेली रघुनाथ यादव विरचित पाणिपतची बखरच मुळांत अधिक जवळची असावी असें मानणें योग्य होईल.

( कै. रा. ब. का. ना. साने यांनी इ. स. १९१४ साली प्रसिद्ध केलेली या बखरीची चौथी आवृत्ती आधारभूत मानून प्रस्तुत प्रकाशनाची प्रत प्रसिद्ध केली आहे. )

## पाणिपतच्या बखरीचा विषय

मराठ्यांच्या इतिहासांतील महत्त्वाचा प्रसंग पानिपतचा संग्राम हा या बखरीचा विषय आहे. रघुनाथ यादवानें भाऊसाहेबांची उत्तर हिंदुस्थानांत रवानगी झाली येथपासून प्रारंभ केला आहे आणि पानिपतच्या रणांगणावर मराठ्यांनीं शौर्य गाजविलें, परंतु त्यांच्या वांट्याला अखेरीस अपयश आले या दुर्दैवी घटनेचें वर्णन बखरीच्या अखेरीस केलें आहे. भाऊसाहेबांचा सुजाउद्दौला व सुरजमल जाट यांना वळवण्याचा प्रयत्न, दिल्ली व कुंजपुरा हस्तगत करणें, अबदाली व मराठे यांच्यांत झालेल्या लढाया व दुतर्फा झालेला नाश, मराठ्यांची झालेली उपासमार व लढून मरण्याचा त्यांनीं केलेला निश्चय, अखेरच्या संग्रामांत मराठ्यांनीं वीरश्रीची केलेली शर्थ आणि त्यांचा झालेला सर्वस्वनाश, या विविध घटनांचें वर्णन बखरींत आलें आहे. दुष्काळाच्या संकटानें गांजलेल्या सरदारांनीं भाऊसाहेबांवर ठेवलेला दोषारोप, भाऊसाहेबांनीं संकटसमयांतहि टिक-

V. P. Bhagwat



विलेले धैर्य, सैन्यांत निर्माण केलेला जोष आणि अखेर पानिपतच्या युद्धांत विश्वासराव व भाऊसाहेब यांची पडलेली आहुती, या बातमीनें नानासाहेब पेशवे यांना झालेले दुःख व त्यानेंच त्यांचा ओढवलेला अंत यांचीहि माहिती बखरकार देतो.

पानिपतचा संग्राम प्रत्यक्ष घडण्यापूर्वी भाऊंनीं केलेलें राजकारण, त्यांची ' बादशाही कायम करावी आणि शत्रूचा पराभव करावा ' ही असलेली ठाम भूमिका, मराठे व अबदाली दोन्ही बाजूंनीं तहाचा झालेला प्रयत्न, त्यांत सलोखा न साधल्यावर लढाई करावी हाच झालेला निश्चय या महत्त्वाच्या भागावरहि रघुनाथ यादवाने लक्ष दिलें आहे. याप्रमाणें पानिपतच्या संग्रामाची पार्श्वभूमी, प्रत्यक्ष संग्रामांतील रणधुमाळी व ओढवलेला नाश यांचें निवेदन ' पाणिपतच्या बखरींत ' आलें आहे या वृत्तांतनिवेदनांत ऐतिहासिकता आणि कलात्मकता हे दोव पदर एकमेकांत गुंफलें गेले आहेत. या बखरीची ऐतिहासिकता प्रथम जोखून नंतर तिच्यांतील कलात्मकतेचा परामर्श घेऊं.

## पाणिपतच्या बखरीची ऐतिहासिकता

पानिपतच्या संग्रामाचें वर्णन करणारी ही बखर असल्यामुळें साहजिकच तिच्याकडे इतिहाससंशोधकांचें लक्ष वेधले आणि इतिहाससाधन म्हणून त्यांनीं तिचे मूल्यमापन केले. इतिहाससंशोधकांच्या या बखरीबाबतच्या विधानांत फार मोठी तफावत आढळते. बखरलेखक रघुनाथ यादव यानें आपण बखरीसाठीं चिटणीसांच्या दफात्यांचा आधार घेतला आहे हे जसे नमूद केलें आहे, तसेंच ' यथामतीनें बखर सजवून सेवेंशी पाठविली आहे. ' असें पुढें म्हटलें आहे. म्हणजेच बखरीच्या ऐतिहासिकता व कलात्मकता या दोन पदरीं विणीची जाणीव बखरकाराला स्पष्टपणें आहे. उलट बखरीचे हे संमिश्र स्वरूप न आकळल्यामुळें इतिहाससंशोधक मात्र दोन टोकांची मते प्रदर्शित करतांना आढळतात.

रियासतकार गो. स. सरदेसाई पानिपतची बखर अव्वल साधनांवरून लिहिली गेली म्हणून अव्वल दर्जाची मानतात, ( म. रि. पे. बा.

पृ. ४३७ टीप ) रघुनाथ यादवानें दफात्यांचा आधार घेतला म्हणून व पानिपत संग्रामानंतर २ वर्षांनीं लिहिली म्हणून सरदेसाई पानिपतची बखर विशेष ग्राह्य म्हणतात तर दफात्यांचा उपयोग नीट केला नाहीं म्हणून राजवाडे रघुनाथ यादवाला दोष देतात. राजवाडे म्हणतात, ' रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर मोठ्या कसोशीनें पारखून घेतली पाहिजे. रघुनाथ यादवानें दफात्यांचा नीट उपयोग केला नाहीं असें म्हणावें लागते. माहितीपेक्षां वर्णनानें ही बखर जास्त फुलविलेली आहे. ' ( ऐ. प्र. पृ. १०८ ) रघुनाथ यादवाचें लक्ष ऐतिहासिकतेपेक्षां कलात्मकतेकडे अधिक प्रमाणांत वळले आहे असा याचा उघड अर्थ आहे. यामुळेंच इतिहाससंशोधक प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर आणि सर यदुनाथ सरकार या बखरीवर ताशेरे उडवितांना दिसतात. प्रा. शेजवलकर म्हणतात.

' Though ostensibly written by a courtclerk and that by order of a member of Peshwa's family this is the most worthless all Panipat Bakhars' (Panipat 1761, p. 136)

सर यदुनाथ सरकार तर ही अफूबाजीची गोष्ट opium eater's tale समजतात ( Fall of the Mughal Empire vol. II p. 367 )बखरीवर असे ताशेरे झाडणें थोडेसें अतिरेकाचेंच ठरेल. त्यापेक्षां इतर अस्सल साधनांनीं ग्राह्य ठरणारा बखरींतील भाग सत्य मानावा आणि बखरकार समकालीन असल्यानें त्याची पानिपतसंग्रामाबावतचीं एकंदर भूमिका लक्षणीय म्हणून विचारांत घ्यावी हें धोरण ठेवणेंच अधिक हितकारक ठरेल.

पानिपतच्या मोहिमेसाठीं भाऊसाहेब व विश्वासराव यांची रवानगी नानासाहेब पेशव्यानें केली या घटनेच्या निवेदनानें बखरीला प्रारंभ होतो. भाऊसाहेबांची निवड पेशव्यानें राघोबादादाला पाठविण्याचा पूर्वीचा विचार बाजूला सारून केली याची मीमांसा इतिहासकारांनीं राघोबादादाचा नाकर्तेपणा आणि भाऊसाहेबांचा खंबीरपणा, उदगीरच्या लढाईत त्याला

मिळालेला विजय या पार्श्वभूमीवर केली आहे. रघुनाथ यादवानें या ठिकाणीं महादजीपंत पुरंदऱ्यानें पेशव्यांना दिलेला सल्ला उद्धृत केला आहे. हे उद्गार कदाचित ऐतिहासिकदृष्ट्या असत्यही असतील, म्हणजे यांना अस्सल ऐतिहासिक आधार नसेल परंतु त्यांत जो आशय व्यक्त झाला आहे त्यांत भाऊंच्या स्वभावाचें आणि गुणांचें जे मर्म ग्रथित झाले आहे ते सत्यच आहे. भाऊसाहेबांच्या कारभारांतील कौशल्य आणि त्यांचा स्वाभिमानी दृढनिश्चयी व आग्रही स्वभाव यांचें नेमकें वर्णन या उद्गारांत आले आहे. नानासाहेबांनीं भाऊंचा ' मागील पराक्रम मनांत आणून पुढेंही रूपशाम येथें स्वराज्य करणें हाच उमेद ' हा निजध्यास जाणून त्यानाच पाठविण्याचा निश्चय पक्का केला असे बखरकारानें म्हटलें आहे. ' इराणी अटकनदी उतरून अलीकडे आला, त्यास अटकेपार घालवावा या कारणास्तव ही मोहीम होती. तेव्हां प्रबल शत्रूंशी सामना देण्यासाठीं महत्त्वाकांक्षी, [पराक्रमी आणि कारभारकुशल भाऊसाहेबांची योजना झाली हे बखरकाराचे निवेदन यथोचित होय.

भाऊसाहेबांची या मोहिमेबाबतची जी ठाम आणि दृढ भूमिका होती ती बखरकारानें त्यांच्या उद्गारांतून स्पष्ट आणि स्वच्छ शब्दांत मांडली आहे. आज भाऊसाहेबांची गोविंदपंत बुंदेले यांना लिहिलेली जी पत्रें उपलब्ध झालीं आहेत, त्यांतील मजकूर आणि बखरकारानें मांडलेली विचारसरणी यांत कमालीचें साम्य आहे. भाऊसाहेब जाटाला सांगतात, ' बादशाही कायम करावी आणि शत्रूचा पराभव करावा (पृ. ७) आम्ही फरजंद,... जेणे करून बादशाही सलामत राहील तेंच करावयास आलो आहो ' ( पृ. ८ ) इराणीच्या वकिलांना ते निर्भयपणें प्रत्युत्तर देतात, ' हिंदूपत बादशाही येथील बंदोबस्त करणें, तो आम्हीच करूं ' (पृ. १७) या वाक्याशीं पत्रांतील पुढील वाक्यांचे केवढे साधर्म्य आहे ! ' आम्हांस तर चकतेयाची बादशाही राखणें यासाठीं अबदालीशी सलूख करणें नाहीं. ( राजवाडे खंड १, पृ. १७३ ) ' तैमूरियाची पातशाही, याचा बंदोबस्त कळेल तसा आम्ही राजश्री पतप्रधान यांच्या इतफाकानें करूं. तुम्ही या गोष्टींत न पडावे ' ( राजवाडे खंड १, क्र. १७९ )

मोगल बादशाहीच्या रक्षणासाठीं उत्तर हिंदुस्थानांतील सर्व सरदार, संस्थानिकांनीं एकत्र यावें आणि अबदालीला घालवून द्यावें ही भाऊसाहेबांचीं भूमिका होती. 'अबदालीची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुजों देणें हें अयोग्य' हे त्यांचें वाक्य प्रसिद्धच आहे. ( राजवाडे खंड १, क्र. १६७ ) यासाठींच त्यांनीं सुजाउद्दौलाला वळवण्याचा आणि सुरजमल जाटाला राखण्याचा प्रयत्न केला हे इतिहासांत नमूद आहे. जाट अविश्वासू ही कल्पना आली असताही भाऊसाहेबांनीं 'तुम्ही बादशाहीचे दुवागीर, इमानी आहां. आमचा वसवसा काडीमात्र न धरितां सर्व जमातीनिशीं एकदील होणें' असा सल्ला त्याला दिला आहे आणि सुजाउद्दौलाला 'इराणीस आंग दिल्हे' म्हणून दोष दिल्यावरही 'तुम्ही व आम्ही एकत्र होऊन ( इराणी ) अगदीं नेस्तनाबूद करावा' असें म्हटलें आहे. बखरकारानें सुजाउद्दौला व जाट यांच्या बाबतचें भाऊसाहेबांचे वर्तन व सल्लामसलत यांचें जे वर्णन केलें आहे, तें इतिहाससंशोधनाच्या प्रकाशांत पाहतां योग्यच ठरतें. इतकेंच काय 'जाट अविश्वासू' हे जे बखरींतील भाऊंचे म्हणणें आतांपर्यंत अतिशयोक्त वा निराधार वाटत होतें, तेहि आतां भाऊसाहेबांच्याच एका नवीन उपलब्ध झालेल्या पत्रानुसार सत्य स्थिती सांगणारेच ठरते. ( जाटांचा जमीदारी कावा सांगणारे 'नाना फडणीस यांचें शब्दांत पानिपतचा रणसंग्राम' या पुस्तकांतील पत्र क्रमांक २७ पहा पृ. ५९—६४ ) रघुनाथ यादवानें रजपुतांच्या बाबतचें केलेलें निवेदन योग्य आहे. रजपूत...दोहींकडे अंग न देतां सलूख राखून ...स्वस्थ राहिले हे वाक्य रजपुतांची तटस्थता, इराणी किंवा मराठे दोघांनाहि न मिळतां पारडे कोणाकडे झुकतें हें पाहण्याची त्यांची धूर्तता या ऐतिहासिक वस्तुस्थितीवर प्रकाश टाकते. उत्तर हिंदुस्थानांतील ही मराठ्यांना, भाऊसाहेबांना जाचक असणारी परिस्थिती, कोणाचेहि त्यांना साह्य न मिळाल्यानें एकाकीपणे त्यांना द्यावा लागलेला लढा याची कल्पना रघुनाथ यादवाच्या निवेदनावरून येते.

पानिपतचा निकाली संग्राम होण्यापूर्वीं तहाचा झालेला प्रयत्न आणि इराणीनें मराठ्यांची उपासमार व दैन्य पाहून थंड राहण्याचा योजलेला युद्धांतील डावपेच यांची माहिती बखरींत आली आहे, ती ऐतिहासिक

साधनांच्या आधारे सत्य ठरसे. इराणीतर्फे वकिली होते तेव्हा ' नर्मदा दक्षिणतीरापासून पलीकडील हद्द तुम्ही आपली संरक्षण करून असावें ' ( पृ. १७ ) म्हणून सांगितले जातें तर भाऊसाहेबांकडून ' तुम्ही आल्या मार्गें अटक उतरून जावें. भाईचारा राखावयाचा असल्यास लौकर फौजे-सुद्धा माघरें जावें ' असे कळविलें जाते. तहाचा प्रयत्न फसल्यावर दोन्ही सैन्यांच्या दोन तीन लढाया झाल्या. प्रथम मराठ्यांची बाजू वरचढ होती. पण पुढे त्यांच्यावर उपासमारीचें संकट ओढवलें. अब्दालीनें याचा बरोबर फायदा घेतला. रघुनाथ यादव लिहितो, ' मग महर्गतेची वार्ता त्यांणी श्रवण करून सलूखाची वार्ता व युद्धाची तयारी करणें ही गोष्ट अगदींच टाकिली. चलबिचल न करितां थंड राहिले ' (पृ. २८) पुढें सरदारही भाऊसाहेबांजवळ म्हणतात, ' तुमच्या लष्करची खराबी इराणीस कळली. आतां सर्वस्वी बुडवितो ' (पृ. ३०) आपल्यापेक्षां जोरदार असणारे मराठे उपासमारीनें अर्धमेले होऊन जाईपर्यंत त्यांच्याशीं युद्ध करावयाचें नाहीं हा फेबियन डावपेच अबदालीने उपयोजिला. असे राजवाडे म्हणतात. ( ऐ. प्र. पृ. ८८ ) त्याचेच नेमके प्रत्यंतर बखरीतील या वाक्यांतून येतें.

पानिपत संग्रामाचे प्रत्यक्ष वर्णन करतांना रघुनाथ यादवानें कल्पनेला अधिक अवसर दिला आहे हे मान्यच केले पाहिजे. तरीहि या संग्रामांत विश्वासराव व भाऊसाहेब यांचा झालेला अंत, मराठ्यांनीं गाजविलेली वीरश्री, संग्रामानंतरची दुरवस्था, नानासाहेबांना बसलेला तीव्र धक्का या घटना सत्य, वास्तव आहेत; त्यावरच कल्पनेची कलाकुसर रघुनाथ यादवानें केली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

इतिहासकाराच्या काटेकोर दृष्टीनें पाहिलें तर पाणिपतच्या बखरींतील निवेदनांत रघुनाथ यादवानें कांहीं चुका केलेल्या आढळतात. कांहीं नांवें चुकलीं आहेत. कांहीं कालनिर्देश चुकले आहेत. नजीबखान रोहिल्या-बद्दल बखरींत मनसूरअली हे नांव आणि अबदालीचा पुत्र तैमूरशहा याबद्दल तेजूरशहा हे नांव आले आहे. गोविंदपंत बुंदेल्यावर अबदालीने अताईखान व करीमदादखान या सरदारांना पाठविल्याचें इतिहासांत नमूद आहे. त्याऐवजीं बखरकार शास्तेखां व जुरूपुकरखां या सरदारांचीं नांवे

देतो. बखरींतील पानिपतच्या निकाली संग्रामाची तिथी चुकलेली आहे. ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारें ही तिथी पौष शुद्ध अष्टमी ठरते तर बखरीत पौष शुद्ध २ हा उल्लेख येतो. नानासाहेबांना ही पानिपत संग्रामाची व त्यांत भाऊसाहेब, विश्वासराव पडल्याची बातमी पुण्यास बारनिसानें कळविली व त्यानंतर नानासाहेब पुण्याहून मोहिमेस निघाले ही माहिती चुकीची आहे. नानासाहेब यापूर्वींच पुण्याहून निघाले होते. (२२ नोव्हेंबर १७६०) बखरीच्या प्रारंभीं शाहूच्या अंतसमयीं नानासाहेबां बरोबर भाऊसाहेब होते हा निर्देश गेरसमजाने आलेला आहे. ऐतिहासिक घटनांचा स्थल, काल आणि व्यक्तीविषयक काटेकोर तपशील रघुनाथ यादवाने विचारांत घेतलेला दिसत नाहीं. पानिपत संग्रामाचा ढोबळ, स्थूल आराखडा त्याच्यापुढें आहे. पानिपत संग्रामांतील या बारीकसारीक तपशीलापेक्षां रघुनाथ यादवाला महत्त्वाचें वाटतें, ते म्हणजे मराठ्यांचें वीरश्री वैभव आणि भाऊंचा कृतनिश्चय, त्यांनीं घेतलेलें सतीचें वाण बखरकाराच्या या भूमिकेमुळें साहजिकच बखरींत ऐतिहासिकतेपेक्षां कलात्मकतेची वीण अधिक उठावदार झाली असल्यास त्यात आश्चर्य नाही.

## पाणिपतच्या बखरीची कलात्मकता

बखरींत ऐतिहासिकतेपेक्षां कलात्मकता कशी वरचढ होते याचें ही बखर उत्तम उदाहरण आहे मराठ्यांची महत्त्वाकांक्षा आणि शौर्य यांच्या वर्णनात बखरकाराच्या लेखणीला तेज चढले आहे. पानिपतचा संग्राम हा मराठ्यांच्या इतिहासांतील एकीकडे अभिमानाचा-शौर्य गाजविले म्हणून तर दुसरीकडे दुःखाचा अपयश आले म्हणून –असा प्रसंग याबद्दल अर्थातच बखरकाराची संमिश्र भावना आहे आणि ती त्याने बखरीत तळमळीने व्यक्त केली आहे. या तळमळीमुळे, जिव्हाळ्यामुळे प्रसंगवर्णनांत रसाविष्कार साधला आहे. यथातथ्य उठावदार वर्णने आणि प्रसंगाची उत्कंठावर्धक मांडणी हे कलागुणही बखरीत आहेत. येथील भाऊसाहेबांचे तेजस्वी व्यक्तिचित्र म्हणजे बखरीचें भूषण आहे. इतर व्यक्तींची रेखाचित्रेहि मनोरम आहेत. बखरीतील प्रसंग आणि व्यक्ती यांचें चित्रण रघुनाथ यादवाच्या डौलदार प्रवाही भाषेमुळे अधिकच आकर्षक वठले आहे.

रसाविष्कार, व्यक्तिचित्रण, वर्णनकौशल्य, निवेदनकौशल्य आणि शैली या साहित्यगुणानीं विनटलेली ही पाणिपतची बखर आटोपशीर, लहान असूनहि कलात्मकतेने चटका लावते.

**रसाविष्कार :**

बखरीत वीर आणि करुण या रसांचा आविष्कार उत्कटतेनें होतो युद्धाचें वर्णन, सैनिक एकमेकांवर तुटून पडले त्याचें वर्णन बखरकार करतो, 'लढाईची हातघाई जाहाली, भाला व विचवे व गुरगुजे व जमदाडा व वाघनखें यांचे चपेटे फार जाहाले......सक्रोध होऊन अवसानें धरून एकमेकावर पर्जन्यप्राय कोसळूं लागले. मल्लयुद्धाचे मारणेंच निकडोचे परस्परे दाखवूं लागले. ' बीभत्साची छटाहि या वर्णनांत नंतर मिसळते. 'कितीकांची शरीरें त्या गर्दीच्या खंदळीत चिरडून गेली. कितीकांचें हातपाय तुटून नुसते कोथळे रणांत राहिले.' ( पृ. २१-२२ ) वीररसाच्या प्रकर्षाला 'लढाईची शर्त' 'मोठी झोटधरणी', 'संग्राम महाधुरंधर' हे शब्दप्रयोग जसे कारणीभूत होतात तसेच 'रक्तोदके भूलिंगास अभिषेक जाहाला आणि शिरकमलें हीच भूलिंगास कमलें अर्पण जाहाली.' यासारखे रूपकही तो परिणाम साधते. अखेरच्या लढाईचे वर्णनहि असेंच प्रभावी आहे. 'वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणीं ओळखेनासे जहाले. वीर रणामध्यें माजले. रणमद चढला. कोणास क्षतें वर्मीं लागलीं... कोणी रणांगणी मूर्च्छित पडले व कोणाची शिरें तुटोन धडावेगळी जाहाली व कोणाची उदरें फुट्रोन अंतरमाळा लोंबू लागल्या.' या बीभत्सावर 'परंतु अणुमात्र कोणी लढाईविषयीं कसर केली नाही.' ( पृ. ३८ ) या वीर वर्णनाची मात होते भाऊंच्या 'अभिनव यशाचे' वर्णन करतांना तर बखरकाराला धन्यतेच्या भावनेनें भारलेले आहे. यामार्गे या कलियुगीं असा योद्धा कोणी जाहाला नाहीं पुढेंहि होणें जरूर' शत्रू पराभवाते पावून भाऊसाहेब व विश्वासरावसाहेब उभयता आपआपल्या अंबारीत बसून महागर्जना करून रणतुरे व नौबती आणखी जयवाद्यें वाजवींत आपले गोटात चालिले एकच सिंहनाद जाहाला.' ( पृ. ३९-४० )

संग्रामवर्णनांत वीररसानें स्फुरण पावणारी बखरकारांची लेखणी दु:खद प्रसंगांत तितकीच हळुवार बनते. तिच्यांतून कारुण्य पाझरू लागते. पानिपतवरचा निदान समय जवळ आला असतां भाऊसाहेबांना विश्वासराव लहान असतांना त्याच्यावर दुर्धर प्रसंग आपल्यामुळें आला असे आवेगाने वाटतें आणि ते विव्हल होतात. पाषाणहृदयी माणसालाहि द्रवविण्याचे सामर्थ्य यावेळच्या भाऊसाहेबांच्या उद्‌गारांत आहे. 'विश्वासरावसाहेब तुमचे वय लहान, तुम्ही सुखाची जाती तिलप्राय अनुभवली नाहीं... तुम्हांस मी मरणाचे घरी आणिले.' (पृ. ३१) भाऊसाहेबांचा अंत झालेला कळल्यावर नानासाहेबांनी केलेला शोकहि असाच हृदयद्रावक आहे. 'भाऊसाहेबांनीं मला मागे टाकून आपण स्वर्गवास केला. माझी अंधळयाची काठी चोरून नेली. माझे घनाचा चरु कोणी चोरून नेला तो कळेना. आतां देहत्याग करावा अथवा संन्यास घ्यावा (पृ. ४४) भाऊसाहेब आणि नानासाहेब यासारख्या थोर, वीर पुरुषांच्या अंत:करणातही मार्दव कसे वसत असते आणि वात्सल्य, भ्रातृभाव यामुळें प्रसंगीं ते कसे द्रवतात याचें हें उत्कट वर्णन रसिक मनाच्या अगदीं गाभ्यापर्यंत जाऊन भिडते.

## भाऊसाहेबांचे व्यक्तिचित्र :

रसिकाला वेध लावणारें या बखरींतील व्यक्तिचित्र म्हणजे भाऊसाहेबांचें. भाऊसाहेबांची महत्त्वाकांक्षा, निश्चयीपणा, स्वाभिमान, तडफ, धैर्य, शौर्य त्यांचे कारभारकौशल्य आणि व्यवहार चातुर्य या गुणांचे चित्रण बखरकार मोठ्या आत्मीयतेने करतो. वेगवेगळे प्रकाशकिरण त्यांच्या या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर पडतात आणि त्यांचे तेजस्वी दर्शन आपल्याला भारावून टाकते. महादजीपंत पुरंदरे याच्या शब्दांतून चिमाजी अप्पांच्या या पुत्राचे शौर्य व निश्चयीपणा हे गुण नेमके टिपले जातात. 'कैलासवासी चिमाजी अप्पा यांणी पूर्वी बहुत पराक्रम केला. त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब हे लढाईत मागे हटणार नाहींत. शत्रूस पराभवितील किंवा आपण कैलासवासी होतील.' (पृ.२) नानासाहेब जाणतात 'रूमशाम येथे स्वराज्य करणे हीच उमेद, हाच निजध्यास.' भाऊसाहेबांचा तर इराणीचा वकील म्हणतो

' रूमशाम येथे एकछत्री राज्य करावें चतुः समुद्रपावेतों पृथ्वी पादाक्रांत करावी ही इच्छा (तुमची) ' स्वतः भाऊसाहेबांनीं जाट आणि इराणीचा वकील यांना जी प्रत्युत्तरे दिलीं आहेत त्यातून निधडेपणा आणि आत्मविश्वास, स्वाभिमान आणि श्रद्धा यांचे आगळेंच मिश्रण दृष्टीस पडते 'आम्ही फरजंद लहान माणूस न हों ... इराणीचा हिशेब कोण धरितो ? ' असें बेदरकारपणें म्हणणारे भाऊसाहेब ' जे बदनजर धरून वर्तणूक करितील त्यास त्यांचा कुळस्वामी पाहून घेईल ' अशी श्रद्धा व्यक्त करतात. ' श्रीमंत छत्रपती महाराज सातारकर, त्यांचा जयप्रताप विक्रम पराक्रम वरदहस्त आमचे मस्तकी आहे. सर्व धरित्रीचें राज्य स्वामिकृपेनें संपादितो.' (पृ.१८) येथे श्रद्धेला आत्मविश्वासाची जोड मिळाली आहे.

जाट आणि सुजा यांच्याशीं वागतांना भाऊंचे व्यवहारचातुर्य दिसते. जाट कार्यवादू, अविश्वासू याची खात्री पटली असतांहि ते त्याला 'इमानी' म्हणून चुचकारतात. दोघांत विकल्प आला असता बाहेर दिसू देत नाहीत. बेइमानी इराणीशी हातमिळवणीं केल्याबद्दल सुजाला दोष देऊन झाल्यावर ' तुम्ही व आम्ही एकत्र यावे ' म्हणून पाचारण करतात. सरदारांशी असणारे भाऊंचे संबंध केवळ व्यवहारी नसून जिव्हाळ्याचे आहेत. लढाईचा निश्चय झाल्यावर भाऊसाहेबांनीं सरदारांना ' मनोधारणेची बोलणी बोलून, बक्षिसे देऊन, सर्वांस स्तुतीनें गौरवून नावाजिले ' आणि आत्मविश्वासांत घेतले. सरदारांनी ' या हट्टाने सर्व लयास गेले. तुम्ही सर्वांचा घात केला ' असा दोषारोप केला असता भाऊसाहेब शांतपणें दैवगतीनें घडले असे समजावून ' दूषणे लाविता तीं प्रमाणच ' असा थोडासा कमीपणा घेऊन पुढच्या कार्याकडे सरदारांचे मन वळवितात. ' यश छत्रपतींचें सांभाळावे हें यश तुम्हा समस्तांचे आहे ' अशी प्रेरणा त्यांच्यात निर्माण करतात. निदानसमयीची भाऊसाहेबांची हांक ' अन्न भक्षिले त्याचे आज सार्थक करून दाखवावे......यश किंवा अपयश हें तुमचे तुम्ही सांभाळावें ' आणि लढाईत जखमी झालेल्यांची त्यांनी केलेली उस्तवारी त्यांची आपुलकीची भावनाच उघड करते. या जिव्हाळ्यामुळेंच सरदारही त्यांना एकदिलाने साथ देतात.

भाऊसाहेबांचा क्षात्रधर्म म्हणजे या सर्व गुणांच्या शिखरस्थानी असणारा पैलू होय. याचा आविष्कार तर बखरकार मोठ्या तेजस्वी शब्दांत करतो. 'शरीर तृणप्राय मानून, मर्दुमीचा हिय्या न सोडितां, समशेरीची शर्थ करून दाखवावी. सत्कीर्ती करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे ? ' आम्ही तरी सतीचे वाण घेतलें ' अशी भाऊसाहेबांची निष्ठा आहे ' या निष्ठेमुळें एक प्रकारचा करारीपणा, कडवेपणा त्यांच्यात आला आहे. विश्वासराव रणांगणांत गोळी लागून पडल्यावर भाऊसाहेबांची पहिली प्रतिक्रिया जरी दुःखाची असली तरी नंतर भावनावेग संपल्यावर ते कर्तव्यजागृत होतात आणि मल्हारराव होळकराला पुण्यास कुटुंब घेऊन जाण्यास सांगतात. शत्रूंनी पिच्छा पुरवला तर ' कुटुंबाचा शिरच्छेद करावा परंतु शत्रूचे हातीं जिवंत लागूं देऊं नये ' अशी सूचना देतात. यानंतर निकरानें शत्रूशीं लढा देण्याचे ते ठरवितात. ' वडिलांचे भेटीस आपण जावें हे अयोग्य ' अशी त्यांची भावना होते आणि जिवावर उदार होऊन ते रणांगणांत उडी घेतात. (पृ. ४१-४२)

पानिपतसंग्रामांत केंद्रीभूत ठरणारे भाऊसाहेबांचे व्यक्तिचित्र याप्रमाणें विविध पैलू दर्शवून, भाऊसाहेबांची कृती, उक्ती त्यांचे विकार-विचार अशा विविध छटांनी त्यांत रंगभरणी साधून रघुनाथ यादवानें विशेष रंगतदार बनविलें आहे.

## इतर रेखाचित्रे :

पाणिपतच्या बखरींत विस्तारानें रंगविलेलें व्यक्तिचित्र फक्त भाऊ-साहेबांचेच आहे. इतर व्यक्तींची केवळ रेखाचित्रें बखरकार काढतो. पण व्यक्तीच्या मोजक्याच उद्‌गारांतून त्याचें व्यक्तीमत्व लीलया उघड कर-ण्याचें कसब रघुनाथ यादवानें येथे दाखविले आहे. भाऊसाहेब विश्वास-रावाबद्दल ' तुम्हास मी मरणाचें घरीं आणिलें ' म्हणून विव्हल झाले असतां विश्वासराव जी त्यांची समजूत घालतो ती खरोखर करुण तितकीच उदात्त आहे. ' तुम्ही उभयता बंधू कायम असल्यास माझें सारखे पुत्र हुत

होतील ' असें सांगून हा कोवळा तरुण थांवत नाहीं तर ' रूमशाम येथील सरदेशमुखीच्या वतनाचीं वस्त्रें श्रीछत्रपतींच्या नांवें ' आणण्याची प्रतिज्ञा करतो. भाऊसाहेबांनी जनकोजी शिंदेला पुण्याला माघारें जावयास सांगितलें असतां तो उत्तर देतो, ' खावंद जर माघारे पुण्यास येतील तर मी जाईन नाही तर जेथे खावंदाचा जोडा पडेल तेथे माझे शिरकमल पडेल ! यांत तिळमात्र अंतर नाहीं ' जनकोजीची स्वामिनिष्ठा आणि निर्धार यांची किती यथार्थ अभिव्यक्ती आहे ही ! शत्रूपक्षांतील मलकाजमानीच्या सैनिकांना उद्देशून केलेल्या भाषणांतून तिच्या करारी, निश्चयी स्वभावाची कल्पना येते. ' जाटाचा विश्वास नाही. हा कार्यवादू समयास फिरून पडेल ' या भाऊंच्या वाक्यांतून किंवा विश्वासराव पडल्यावर ' आतां आपण मोठा पराक्रम जरी करून पुण्यास गेलों तरी सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब माझें मुखावलोकन करणार नाहीत. या उद्गारांतून जाट व गोपिकाबाई यांचें कार्यसाधूपणा व मनस्वीपणा हे विशेष सहजपणें प्रतिबिंबित होतात.

## समुदायचित्रे :

व्यक्तींचीं रेखाचित्रें जशी रघुनाथ यादवानें काढलीं आहेत. तशी समुदायाची वैशिष्टचेंही जाता जाता त्यानें रेखाटलीं आहेत. मराठ्यांचा कडवेपणा, चिकाटी, हानी झाली तरी लढण्याचा खंबीरपणा यांचे उल्लेख शत्रूच्या तोंडी आणि उर्दू भाषेंत घालण्यांत रघुनाथ यादवाची योजकता दिसते. ' मराठे बडे कट्टे लढनेवाले......अनाजका दुकाल पडा तोबी लढनेकू हटेले खडे रहते है '' मराठे बडे जोरदार हटेले ' अशी प्रशस्ती शत्रूकडून केली जाते. मराठे सरदारांची स्वतंत्र चित्रें येथे नाहींत पण त्यांचें निधडेपण प्राणपणानें लढण्याची जिद्द, छत्रपतींवरील निष्ठा, यांचें ओझरतें पण ऊर्ज्वस्वल रेखाचित्र नजरेत भरतें. भाऊसाहेबांनीं निदानसमयीची हांक दिली असतां सरदार प्रत्युत्तर करतात. ' आम्ही जीवित्वाची तमा धरीत नाही !' महाराजांचे पुण्य मस्तकीं असतां इराणींची बिशाद काय ? मारून गर्दीस मेळवून देऊ '......युद्धांत क्रौर्य असतेच पण ' इराणीची जात अरबूज आपपर म्हणावयाची नाहीं ( पृ. ३७ ) यामुळें भर कशी पडते याचा

निर्देश बखरकार जातां जातां करतो. संग्रामाचे वर्णन प्रत्ययकारी होण्यास या समुदायचित्रांचा मोठाच हातभार लागला आहे.

**वर्णनकौशल्य :**

रघुनाथ यादवाची बखरींतील यथातथ्य रेखीव वर्णनें हाहि त्याच्या कलात्मकतेचा मनोज्ञ आविष्कार आहे. सूक्ष्म निरीक्षण आणि कल्पकता दोन्हींचा मिलाफ झाल्यामुळे पाणिपतच्या बखरींतील विविध वर्णनें चित्त-वेधक उतरली आहेत कांहीं खास शब्दप्रयोग, चलचित्राप्रमाणें प्रवाही गतिमान वाक्यरचना यांच्या माध्यमांतून रघुनाथ यादव आपल्या डोळ्या-पुढें प्रत्यक्ष चित्र उभे करतो. ' रणांगणाचा शृंगार '- करून मराठे रणांत जावयास निघाले त्या वेळचें वर्णन याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. ' अंगी वीरश्रीची वारी असलेलें हे ' भीमार्जूनासारखे महावीर ' चिलखत, टोप घालून हातात कमरेला शस्त्रे बांधून कसे सज्ज झाले याचे विस्तृत वर्णन पारिभाषिक शब्दांचा योग्य वापर करून येथे केले आहे, त्यांचा आवेश आणि उत्साह यांचे हें वर्णन पहा —' अंगी स्फुरणे अतिशय युद्धास जाव-यास अति उदित, स्वामी सेवेंशीं तत्पर अशा आवेशाचे पुरुष हजारोहजार सिद्ध जाहाले ' (पृ. १९) युद्धानंतर सैन्याची आणि लोकांची दुर्दशा झाली तिचें रघुनाथ यादवानें पुढीलप्रमाणें चित्रण केलें आहे. ' खंदक भरल्यावर जे लोक भिकारी होऊन अन्न अन्न करीत दुसरा देश धरून पुण्यास आले ते आले.. हजारोहजार त्या कुरुक्षेत्रीं रणमंचकीं निजलेच राहिले. (पृ. ४३) शेलके घोडे, शेलके साहित्य, सोनपत, पानपत वगैरे ठिकाणीं सर्वस्व बुडालें, कितीएकांची घरें बसली, कितीएकांच्या नकला जाहाल्या, कितीएक हातापायांनीं अधू जाहाले, गंगाप्रवाही व यमुनाप्रवाही कितीएकांनीं घालून घेतले. ' ( पृ. ४६-४७ ) भयंकर दैन्य, वाताहत, सर्वस्वनाश यांचें हे बखरींतले वर्णन वाचल्यानंतर अंगावर शहारे येतात.

रणांगणावर नेण्यासाठीं सजविलेल्या हत्तीचे वर्णन उठावदार, रेखीव वस्तुवर्णनाचा नमुना आहे. ' पंचरंगे करून चित्रविचित्र शुंडादंड मस्तकावर रेखिले व बादली पाखरा गजपुष्ठीवर घालून सुवर्णमंडित पिंपळवनें

मुक्तलडांच्या झालरी व गळयांत रुप्याच्या घंटा व रुप्याच्या वांकी, तोडर पायीं, रुप्यासोन्याच्या अंबाऱ्या हत्तीवर ठेवून चौफेर मोत्यांचें घोस लाविलें ते मदोन्मत्त वारज विलोकिता केवळ सुरेश्वरांचे ऐरावत भासले ' (पृ. ३४) भाऊंचा कृतनिश्चय आणि रणांगणांतील त्यांचे तेजस्वी दाहक रूप यांचे हे चित्रण पहा- सदाशिवपंत भाऊ खासे अंबारीत बसून खांदास नवरत्नांचे फर्श बांधिले. कारण कीं, संपूर्ण वसुंधरेचे राज्य करीन किंवा इंद्रपदीचे घेईन. अंबारींत बसतांच सर्व शरीर लाल जाहालें व नेत्रही आरक्त जाहाले.' त्या समयीं भाऊ कसा भासला कीं, केवळ कल्पांतीचा आदित्य ! ... (पृ. ३५-३६) पाणिपतच्या बखरींतील ही वर्णनें म्हणजे बखरीला समृद्धी प्राप्त करून देणारी, तिच्या कलावैभवांत भर घालणारी संपदा आहे.

**निवेदन कौशल्य :**

पाणिपतच्या बखरींत रघूनाथ यादवाचें निवेदनकौशल्यही दिसून येतें. बखरींतील निवेदन प्रवाही तर आहेच, पण त्यांतील आकर्षक मांडणी, उत्कंठा व कुतूहल वाढविण्याची पद्धती आणि नाटयमयता आपलें लक्ष वेधून घेतें. सुजाउद्दौला व जाट यांना आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न भाऊसाहेबांनीं केला. त्यावेळचीं मुद्याला नेमका हात घालणारी भाषणें किंवा इराणीतर्फे वकिलीचा प्रयत्न झाला तेव्हां भाऊसाहेबांवर ( मराठयांवर ) केलेले आरोप ' सर्व बादशाही तुम्ही मराठयांनीं बेकैदी करून बुडविली ' आणि ' ही गोष्ट तुमचे खातरीस न येई तरी लढाई करावी लागेल ' अशी दिलेली धमकी नाटयपूर्ण आहे. भाऊसाहेबांनी इराणीच्या वकिलांना दिलेला अहेर...' आम्ही तुम्हांस एकंदर दबून रहाणार नाहीं. तुमचे हुकूमाची तमा धरीत नाहीं. लढाई करावी हाच आमचा निश्चय आहे ' तितकाच प्रभावी आहे. संवादयोजनेमुळे हें वकिलीचे प्रयत्न, त्यांतील कावेबाजपणा, एक-मेकावर बाजू उलटविण्यांची कोशीस या गोष्टी नजरेंत भरतात. पानिपत संग्रामाच्या वर्णनांत दोन्ही बाजूंची तयारी, रणधुमाळी कधीं लाभणारा विजय तर कधीं घ्यावी लागलेली माघार यांचें उत्कंठावर्धक निवेदन बखरींत येते. सरदारांनीं भाऊंवर केलेले वाक्प्रहार आणि ते झेलून सरदा-रांना युद्धास प्रवृत्त करण्याचा भाऊंचा यत्न येथे अशीच संवादयोजना करून

रघुनाथ यादवानें नाट्य निर्माण केलें आहे. विश्वासरावाला गोळी लागून तो पडल्यावर आतां भाऊसाहेबांची प्रतिक्रिया काय होणार अशी सहजच उत्कंठा निर्माण होते. तेथें प्रथम परम दु:ख, नंतर होळकरास पुण्यास जाण्याची आज्ञा करणें, नानासाहेबांना निरोप पाठविणें, 'आतां लोभ असो द्यावा ' म्हणणें आणि सरदारांनीं गंगाकाठी छावणी करण्याची सूचना केली असतां ती नाकारून रणांगणांत उडी घेण्याचा कृतनिश्चय करणे असे चढत्या पायरीचे निवेदन बखरकार करतो. बखरकाराच्या या प्रभावी गतिमान निवेदनांत घटना जिवंत करण्याचें सामर्थ्य आहे.

**भाषाशैली :**

रघुनाथ यादवाची डौलदार प्रभावी भाषाशैली बखरींतील निवेदन परिणामकारक होण्यास कारणीभूत झाली आहे. युद्धाच्या वीरश्रीच्या वर्णनांत यांतील लघु वाक्यार्धांनी गतिमानता व ओघ यांची जोड मिळते, तर ध्वनिवाहक शब्दांच्या योजनेनें आवेश, ओज यांचा परिणाम साधला जातो. युद्धास [तोंड लागले त्यावेळचे पुढील वर्णन पहा ' दारुण संग्राम जाहाला हवद्यास हवदे, राऊतास राऊत एकमेळ जाहला... एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली. धुरें करून दिनमणीचा अस्त जाहाला असा भास पडला, घे धे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना पुढचा पाय पुढें कोणास कोणी हटेना ( पृ. ३७ ) दुसऱ्या लढाईचें वर्णन या शैलीमुळें असेंच प्रभावी झालें आहे. ( पृ. २१-२२ ) मराठ्यांची ' हरहर महादेव ' ही गर्जना इराणीकडील लोकाची या ' अल्लखुदा या रहिमान रहीम ' ही गर्जना हत्यारांचें चपेटे, मल्लयुद्धांचे मारणें, महाकाल, कृतांत यांची स्मृती, रणभूमीवरील मूर्च्छित रक्तबंबाळ वीर, शरीरे चिरडलेली, हातपाय तुटलेले, भाला हृदयपार झालेला याचे विस्तृत वर्णन रघुनाथ यादव प्रत्ययकारी करतो. ' आपआपले पुण्याने कोणी विष्णु लोकास गेले, कोणी कैलासास गेलें, कोणी सत्य लोकास गेले, कोणी इंद्र-लोकास गेलें, गासारखी डौलदार वाक्यरचना रघुनाथ यादवानें येथें मार्मिकतेनें योजिली आहे.

**पौराणिक दाखले :**

पौराणिक दाखल्यांची योजना, उपमा, दृष्टांत, उत्प्रेक्षा या अलंकारासाठीं पुराणांतील उदाहरणांचा वापर ही रघुनाथ यादवाच्या निवेदनाची लकब लक्षणीय आहे, युद्धवर्णनांत रघुनाथ यादव 'कलियुगीं दुसरें प्रत्यक्ष भारती युद्ध जाहाले' असे म्हणतो. 'रामरावण यांच्या युद्धासमान युद्ध जाहलें' भाऊंनी 'प्रताप कर्णाप्रमाणें केला' अशा उपमा तो वापरतो, भाऊंना सरदार सांगतात, 'विनाश कालासारखी बुद्धी जाहाली. होणार त्यासारखी बुद्धी होते' त्या वेळीं नलराजा श्रीरामचंद्र, रावण आणि दुर्योधन यांनीं दुर्बुद्धी झाल्यामुळें संकटें कशी ओढवून घेतली याची उदाहरणें दिली जातात ( पृ. २९-३० ) विश्वासराव जेव्हां नानासाहेब व भाऊसाहेब यांतील बंधुभाव व्यक्त करतो तेव्हां 'आपण उभयता वंधू एक धर्मराज, एक अर्जुन, एक श्रीरामचंद्र, एक भरत' असा उल्लेख येतो. भाऊ कल्पांतीचा आदित्य भासला ही उत्प्रेक्षा, रक्तोदके भूलिंगास, अभिषेक, शिरकमलें भूलिंगास अर्पण ही रूपकें पौराणिक थाटाचीच आहेत.

शोक, दुःख, वैराग्य या भावनांचा अविष्कार करतांना रघुनाथ यादव चटकन रामायण, महाभारत यांतील दाखले देतो. विश्वासराव पडल्यावर तो भाऊंचें दुःख वर्णन करतो. 'श्रीराम अयोध्यापूर सोडून वनवासांत जावयास सिद्ध जाहाले तेच वर्तमान ऐकतांच दशरथानें कैकयीच्या मंदिरांत अतर्धान केले तसेच भाऊसाहेब जाहले ( पृ. ४१ ) भाऊसाहेबांच्या निधनाची वार्ता कळल्यावर नानासाहेबांना अतीव दुःखानें वैराग्य आले त्यासाठीं 'रामचंद्रासाठीं भरतानें अयोध्यापूर सोडून नंदिग्रामी राहून नैराश्यवत उदास जाहाले तद्वत ( पृ. ४४ ) असा दाखला रघुनाथ यादव देतो. कौरवपांडव कुरुक्षेत्रीं धारातीर्थी सुस्नात जाहलें तदनुरूप आपणही व्हावे' अशी उठावणी भाऊ करतात. समरांगणीचें वीरश्री वैभव पाहण्यास 'स्वर्गी इंद्रलोकीचें इंद्रसुद्धां सुरगण विमानांत बसून अंतराळीं आले' असें पौराणिक धर्तीचें निवेदन येते. पौराणिक सृष्टीतील ही उपमानें दाखले परिचित असल्यामुळें त्यांतील संदर्भ तावडतोब मनाला

भिडत असले तरी रघुनाथ यादवानें काव्य सौंदर्याचा शिडकावा करणारी ग्रीष्मांत चमकणाऱ्या विद्युल्लतेची जी उपमा ( पृ. ४३ ) भाऊंना दिली आहे तीच अधिक स्मरणांत राहते.

**व्यक्तित्वाविष्कार :**

पाणिपतच्या बखरींतील कलात्मकतेचा महत्त्वाचा पैलू म्हणजे तींत रघुनाथ यादवाचा होणारा व्यक्तित्वाविष्कार होय. गोपिकाबाईच्या आज्ञे-वरून ही बखर त्यानें रचली असली तरी स्वतःच्या विशिष्ट दृष्टिकोणाचा वापर त्यानें निवेदनांत केला आहे, हें उघड आहे. पानिपतच्या संग्रामानंतर लवकरच ( २ वर्षांनीं ) ही बखर लिहिली असल्यामुळें त्या संग्रामाकडे तटस्थपणें वा चिकित्सकपणें पाहण्याची, त्यांतील घटना व यशापयश यांच्या मूल्यमापनाची भूमिका साहजिकच बखरकार घेत नाहीं. संग्रामवर्णन स्वकीयांच्या बाजूनें करणें ही त्याची स्थूल भूमिका आहे. बखरकाराचें मन मराठ्यांच्या शौर्यानें, त्यागाने हेलावलें आहे. त्यांची दुर्दशा पाहून कळवळलें आहे. हें ओथंबलेले हृदय बखरींत अनेक अंगांनीं ओसंडलें आहे. रघुनाथ यादवाची छत्रपतींबद्दलची निष्ठा आणि ईश्वरावरची श्रद्धा 'छत्रपतींचा पुण्य प्रताप वरदहस्त' 'महाराजांचें पुण्य' 'सांबकृपा' 'कैलासनाथाची सत्ता' या उद्‌गारांतून व्यक्त होते. दैववादाचा पाठ-पुरावा तर रघुनाथ यादव पुष्कळ ठिकाणीं करतो. प्रारंभींच तो 'पुढे होणार भविष्य बलवंत' म्हणून नानासाहेबांना भाऊंना पानिपतावर पाठ-विण्याची बूद्धी झालीं असें सुचवितो. भाऊंना हेका केला म्हणून दोष देणारे सरदार 'नकळे ईश्वराचा महिमा! होणार त्या सारखी बुद्धी उत्पन्न होते' अशी पुस्ती जोडतात उलट भाऊही त्यांची समजूत घालतात 'होणारास उपाय काय? कोणी आपण आपले अनिष्ट चिंतीत नाहीं. दैवगतीनें घडून आल्यास उपाय कोणाचा?' विश्वासराव म्हणतो, 'जे ईश्वरानें नेमिले असेल तें कदापी टळावयाचे नाहीं' असा दैववादाचा प्रभाव येथें जाणवत असला तरी दुबळेपणा मात्र येथे नाहीं. भाऊसाहेब, विश्वासराव यांची क्षात्रधर्माचा पुरस्कार करणारी वाक्यें लिहिताना

रघुनाथ यादवाच्या लेखणीला स्फुरण चढलेलें दिसतें. ‘ सत्कीर्ति करून मरावें या भूषणापरतें दुसरे काय आहे ?’ ही भाऊसाहेबांची श्रद्धा किंवा रणांगणाचें ठायीं पराक्रम करून मृत्यु आल्यास दुसरे काय पाहिजे ? ’ ही विश्वासरावाची धारणा किती ओजस्वी आहे !

ईश्वरनिष्ठा, स्वामिनिष्ठा, दैववाद, स्वकीयप्रेम, क्षात्रधर्माभिमान या विविध संस्कारांनीं युक्त अशा रघुनाथ यादवाच्या मनोधारणेची डूब बखरींतील घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांच्या वर्णनाला लाभली आहे. यामुळेंच पाणिपतची बखर म्हणजे पानिपतच्या संग्रामाचा केवळ ऐतिहासिक आलेख रहात नाहीं तर आत्मीयतेनें पण विशिष्ट दृष्टिकोणांतून केलेलें हे निवेदन सहजतया कलात्मकतेच्या पातळीवर जाते.

## युद्धाचे चित्र :

पाणिपतच्या बखरीच्या ऐतिहासिक मूल्याबाबत मतभेद होतील-तसे ते आहेतही-परंतु बखरीची कलात्मकता मात्र मतभेदाचा विषय होईल असें वाटत नाहीं. युद्धाचें चित्र आपल्यापुढें उभे करण्यांत बखरकाराने मोठें यश मिळविलें आहें वकिलीचे प्रयत्न, राजकारणी कावे युद्धापूर्वीची परिस्थिति साकार होते. त्यानंतर ‘ लढाई करावी हा निश्चय ’ वीरश्रीनें भारलेली मनोवस्था, विविध शस्त्रास्त्रें, सैन्याची रचना यांचें वर्णन येतें, प्रत्यक्ष रणांगणावरील रणधुमाळी, वीरांची मर्दुमी सरदारांचे पतन जखमींची उस्तवारी आणि सैन्यावरचें दुष्काळाचें संकट या निवेदनांतून संग्रामाची वेगवेंगळी अंगे आपल्यासमोर उभी ठाकतात. पानिपतचा निकाली संग्राम तर रघुनाथ यादवानें दिलेल्या वेधक तपशिलामुळें प्रत्यक्ष समोर घडत असल्याचा भास होतो. सरदारांची निकराचीं भाषणें भाऊंनीं केलेली उठावणी, लढाईत विश्वासराव पडल्यावर भाऊंनी आवेशाने रणांत घेतलेली उडी, नंतर मिळालेली कलाटणी हा उत्कटतेनें भरलेला तपशील पहा. संग्रामांतील अखेरचा सर्वनाश आणि नानासाहेबाचा अपार शोक व हृदयद्रावक अंत यांतून युद्धाची संहारक शक्ती आणि मानवी मनावर त्यामुळें होणारा आघात यांचें किती भेदक, भयानक दर्शन घडते !

**प्रभावी मनोदर्शन :**

भाऊसाहेबांचें व्यक्तिचित्र व मनोदर्शन हा या बखरींतील कलात्मक दृष्टया विशेष संपन्न असा भाग म्हणता येईल. इतिहासकार भाऊंचे गुणदोष सांगतात, त्यांच्या कृतीची मीमांसा करतात. त्याचे डावपेच कसे यशस्वी झाले वा फसले ते दाखवितात. यापलीकडे त्या प्रत्यक्ष संग्रामप्रसंगी भाऊसाहेबांची मन:स्थिति काय झाली असेल, कोणत्या विकारविचारांनीं ते वेढले असतील हे जाणणें, त्यांचयाकडे 'माणूस' म्हणून पाहणें हें बखरकारानें साधलें आहे. दुर्घट समय प्राप्त झाला असतां भाऊंनीं केलेलें उदासपणाचें भाषण, त्यांत व्यक्त झालेली विश्वासरावासंबंधींची भावना ह्या भाऊंच्या मनोदर्शनांत बखरकार इतिहासांतील घटनात्मक सत्यापली-कडे भावसत्यापर्यंत कशी झेप घेतो याचें प्रत्यंतर येतें. पाणिपतची बखर वाचल्यावर कितीतरी वेळ भाऊंचे हे उललेले हृदय आपल्या मनाची पकड ोडत नाहीं. प्रक्षुब्ध भाऊंची विश्वासरावाने घातलेली समजूत व दारुण प्रसंगीं त्यानें प्रकट केलेला निर्धार यांचा ठसाही मनावर दीर्घकाल राहतो. रणांगणावर मानवी मनाची विचित्र विलसितें कशी दृष्टीस पडतात याचे हे उदाहरण लक्षणीय आहे. निधड्या छातीचे भाऊ विश्वासरावाला आपण मरणाचे घरी आपलें म्हणून गहिवरतात तर कोवळा तरुण विश्वासराव मोठी समजूत व प्रौढ बुद्धी प्रगट करतो. रणांगणावरील आणखी एक प्रसंग असाच विलक्षण आहे. मल्हार रामचंद्र रणांत आक्रंदत पडलेले असतात. त्यांचा पुत्र ते दु:ख पाहून त्यांना 'पुरे करतो' (पूर्णपणे मारतो) नंतर आपला शिरच्छेद करावयास तो उद्युक्त होतो. तें पाहून भाऊसाहेब सद्‌गदीत होतात व त्याची समजूत घालतात, 'आत्महत्या करूं नये, उदईक सर्व आपण इंद्रसभेस जाऊं !' (पृ. २२) रणांगणावरील रणधुमाळी बरोबरच मानवी मनाची ही घडामोड रघुनाथ यादवाने बखरीत चित्रित केली आहे हे या बखरीचे मोठे कलात्मक यश होय.

रघुनाथ यादवानें कांहीं प्रसंग मात्र अगदीं त्रोटक दिले आहेत. बळवंतराव मेहेंदळे युद्धांत मारले गेले व त्याची पत्नी सती गेली हा

प्रसंग किंवा गोविंदपंत बुंदेले यांना मारल्यावर त्यांचे शिर अबदालीनें भाऊसाहेबांकडे पाठविलें हा प्रसंग यांच्या निवेदनांत सरधोपटपणाच आहे. विकारविचारांची खळबळ व्यक्त करण्यास अवसर असलेले हे प्रसंग बखरींत अगदींच रूक्ष पद्धतीनें सांगितले आहेत. हे अपवाद वगळता इतरत्र रघुनाथ यादवाचें निवेदन समरसतेचें द्योतक आहे.

एकंदरींत पाणिपतच्या बखरींत विविध साहित्यगुणांचा विलास आपल्याला पाहावयास मिळतो. रसोत्कटता, जिवंत व्यक्तिचित्रें, प्रभावी मनोदर्शन, वेचक समुदायचित्रें, वेधक वर्णनें, उत्कंठावर्धन निवेदन, डौलदार शैली आणि मोहक व्यक्तित्वाविष्कार हे या बखरीचे उठावदार कलात्मक पैलू आहेत. या गुणविशेषांनीं मंडित झालेली पाणिपतची बखर मराठी बखरवाङ्मयांत मानाचें स्थान भूषवीत आहे.

**डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी**

रघुनाथ यादव-विरचित

# पाणिपतची बखर.

॥ श्रीगणपती प्रसन्न ॥

### १. वर्तमान विदित व्हावे आज्ञा

श्रीमंत महाराज मातोश्री गोपिकाबाई-साहेब मुक्का शहर पुणें साहेबांचे सेवेसी.

आज्ञाधारक रघुनाथ यादव लेखक दिमत[१] चिटणीस[२] कृतानेक साष्टांग दंडवत[३]. विज्ञापना तागाईत[४] छ[५] जमादिलाखर[६] पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. नवी खबर श्रीमंत यांजकडून वर्तमान आजपर्यंत झालें तें विदित व्हावें म्हणून आज्ञाधारकास आज्ञा जाहली. त्यास यथामतीनें निवेदन करितो. श्रवण केलें पाहिजे.

### २. भाऊसाहेब यांची हिंदुस्थान प्रांती रवानगी

यथापूर्वक कथन. श्रीमंत महाराज राजश्री शाहू महाराज छत्रपती यांणीं निजधामास जाते समयीं राजश्री नानासाहेबांस व भाऊसाहेबांस सातारियाचे मुक्कामी समक्ष बोलावून[७] आणून, सर्व निरवानिरव करून, शिक्केकटार हवालीं करून, मस्तकीं वरदहस्त ठेविला आणि आज्ञा जाहली जे, “ माझे

---

(१) दिमत–तावा. (२) चिटणीस–सरकारी कारकून. (३) दंडवत–नमस्कार. या शब्दावरून लेखक परभू होते असा तर्क का. ना. साने यांनी केला आहे. (४) तागाईत–पर्यंत. (५) छ–मुसलमानी दिनांक निदर्शक. (६) जमादिलाखर–अरबी वर्षाचा ६ वा महिना (७) पुणे प्रत २ मधील पाठ–राजश्री नानासाहेब व भाऊसाहेब हे त्या ठिकाणींच होते ते समयीं नानास समीप बोलावून आणिले आणि गळयात शिक्के घातले आणि–

मागें सकल पृथ्वीचें राज्य करणें तें तुम्हांशिवाय राज्यास धणी कोणी दिसत नाहीं. " असें सांगून महाराज कैलासभुवनास गेले. मागे राजश्री नानासाहेब व भाऊसाहेब यांणीं आपल्या पराक्रमानें अटकेपर्यंत[१] मुलूक काबीज केला. बारा वर्षे सकल पृथ्वीचें राज्य केले. राज्याचा उदय दिवसेंदिवस होत चालला. सर्व प्रांतांतील किल्ले कोट व महादुर्गे सोडविलीं. एक सत्ता केली. मांडलिक राजे सेवक होऊन दास्यत्व करूं लागलें. असा पराक्रम थोर, सर्वां विशेष, जाहला असता, त्यास पुढें होणारें भविष्य बलवंत, याजकरितां राजश्री नानासाहेबांस बुद्धी जहाली जे, राजश्री भाऊसाहेबांस हिंदुस्थानांत फौज देऊन रवाना[१] करावे. ते समयीं राजश्री महादाजीपंत पुरंदरे यांहीं श्रीमंत महाराज यांस विनंती केली की, " भाऊसाहेबांस एकंदर[२] हिंदुस्थानचे मोहिमेस पाठवूं नये. भाऊसाहेबांचे कारभाराचा हावभाव[३] दुसरे कोणास येणार नाही. सर्व राज्याचा भार त्यांजवर आहे. " असें कित्येक प्रकारें सांगितलें. ते समयीं श्रीमंत राजश्री नानासाहेब यांणीं उत्तर केलें कीं, " भाऊसाहेबांचे चित्तांत स्वारीस जाण्याचें आहे, याजकरितां त्यांस पाठवितों. त्यांचा मानस फार दिवस आहे याजकरितां येविशीं स्वारी करून आले म्हणजे सर्वांची खातरजमा[४] होईल. " तेव्हां महादाजीपंत पुरंदरे यांणीं उत्तर केलें कीं, " कैलासवासी चिमाजी आपा यांणीं पूर्वी बहुत पराक्रम केला. त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब, हे लढाईस मागें हटणार नाहीत. शत्रूस पराभवितील किंवा आपण कैलासवासी होतील. त्यात सहसा[५] अन्यथा नाहीं. याजकरितां त्यांस सहसा[६] पाठवूं नये. " ते समयीं सौभाग्यवती गोपिकाबाई-साहेब यांणीं अनुमोदन दिलें कीं, त्यांस रवाना केलें पाहिजे. सबब दृढ निश्चय करून, मागील पराक्रम मनांत आणून पुढेंही रूमशाम[७] येथें स्वराज्य करणें हीच उमेद भाऊसाहेबांचेही मनात आहे, दुसरा निजध्यास[८] नाहीं; इराणीही अटकेपार होता तो अटकनदी उतरून अलीकडे आला, त्यास अटकेपार घालवावा या कारणास्तव राजश्री सदाशिवपंत भाऊ व

(१) अटक–सिंधुनद. (२) एकंदर–मुळीच. (३) हावभाव–धमक. (४) खातजमा–खात्री. (५) सहसा–बहुधा. (६) सहसा–घाईने. (७) रूमशाम–कॉन्स्टॅंटिनोपल. (८) निजध्यास–निदिध्यास.

चिरंजीव विश्वासराव साहेब यांची रवानगी केली पाहिजे. अशी मसलत करून, समागमें प्रमुख सरदार नामांकित देऊन हिंदुस्थान प्रांती रवानगी केली. त्यांची नावनिशी बितपशील असामीः––

| | |
|---|---|
| १ मल्हारजी होळकर. | १ जनकोजी शिंदे. |
| १ दमाजी गायकवाड. | १ यशवंतराव पवार. |
| १ समशेर बहादर. | १ त्रिंबकराव सदाशिव. |
| १ नाना पुरंदरे. | १ सोनजी भापकर. |
| १ विठ्ठल शिवदेव. | १ उमाजी माहारणे. |
| १ तुकोजी पवार. | १ रामराव खंडोजी देवकांते. |
| १ सिधोजी कामरे. | १ सयाजी ठानगे. |
| १ गोपाळराव. | १ गोविंदराव बुंदेले. |
| १ सुलतानराव निंबाळकर | १ हणमंतराव सोनवणकर. |
| १ रघुनाथजीबावा. | १ बहिरजी शेडगे. |
| १ गोविंदपंत. | १ अप्पाजी जाधवराव. |
| १ संताजी आटोळे. | १ नारायणराव मोहिते. |
| १ देवजी शिवनेरे. | १ बळवंतराव गणपत. |
| १ शामराव गणेश. | १ आनंदराव पवार. |
| १ लिंगोजी नारायण. | १ नरसिंगराव बांडे. |
| १ मानसिंगराव बांडे. | १ बळवंतराव विनायक. |
| १ विसाजी महारुद्र. | १ बाजे[1] लोक. |
| | १ हुजरात. |
| १७ | १८ |

३५

### ३. फौजेचा बंदोबस्त, यमुनातटाकास भाऊ दाखल

सदर्हूप्रमाणें[2] नामांकित सरदार बरोबर व या खेरीज चाळीस हजार

(१) बाजे लोक–किरकोळ–लोक. (२) सदर्हूप्रमाणे–याखेरीज पुणे प्रत २ मध्ये अधिक नावे आहेत ती–नागोजी रणदिवे, रामचंद्र नरहर, शिवाजी गंगाधर, गोपाळ गणेश.

धारकरी[१] शिवाय सरदार, याप्रमाणें फौजेचा जमाव करून रवानगी केली. गंगापार[२] होतांच नबाबांनीं कटकट काढिली. त्यांचें पारिपत्य करून, चवसष्ट लक्षांचा मुलूख सोडवून पुढें नर्मदेपार गेले. तों फौजेचा तळ उज्जनी पावेतों पडत चालला. त्या प्रांतींचे जे जे सरदार व अप्पाजीराव व अंताजी माण. केश्वर वगैरे पतके[३] होते ते येऊन भेटले. संपत्ति-दारा-मित्र भावें करून अनुकूल जाहले. वरचेवर आला स्वार घोडाराऊत ठेवीत चालले. क्षिप्रापार होऊन मजल दरमजल पुढें चालले. हजिरी गणतीस एकंदर लहान थोर सरदार मिळून साडेतीन लक्ष घोडेराऊत जमले. याखेरीज पायदळ साठ हजार. ऐसा एकंदर जमाव जाट व मराठे आदिकरून सव्वा चार लक्ष फौज गणतीस लागली. राजश्री मल्हारराव होळकर यांचा तोफखाना जरबा[४] सुमारें ३०० तीनशें व सरकारी तोफखाना बरोबरचा सुमारें ४००. या खेरीज उज्जनीतील व पायगडांतील व झांशींतील व नरवरांतील मिळोन सुमारें ५०० पांचशें. ऐसा तोफखाना जरबा सुमारें १२०० बाराशें. या खेरीज जेजाला[५] व सुतरनाला[६] फूठमढिया[७] एकूण आवाज[८] दोन हजार व बाणांच्या कैच्या[९] सुमारे ४०,००० चाळीस हजार, शिवाय दारूगोळा. पुरें सामान. शिलेंपोस[१०] करून, शहाण्णव[११] कुळींचे मराठे जमा करून. अंगी ज्यांच्या मर्दुमी, समशेरबहादूर, रणपंडित. रणधुरंधर, याजप्रमाणें फौजेचा बंदोबस्त करून, दिल्लीचे सुमारे सदाशिवपंत परम तवेशें[१२] करून हर्षभरित चालले अंतर्वेदीपासून तहत बंगाला आदि करून बादशाहीगिरीचा पेशजीचा[१३] खालीसा अंमल मुलूक मारून दक्षण राज्य केलें. इतुक्या लष्करास खर्चास व

(१) धारकरी–वीर पुरुष. (२) गंगा–गोदावरी. (३) पतके–१०० स्वारांचे एक पथक, त्यावरील सरदार. (४) जरबा–नग. (५) जेजाला–लांब नळीची फिरवता येणारी बंदूक. (६) सुतरनाला–उंटावरील तोफ. (७) भिवंडी प्रत फूटमढिया पुणे. प्रत १ फटमडलिया नागपूर प्रत व पुणे प्रत २ फटकडिया–हा पाठ बरा अर्थ फटाके. (८) आवाज–नग. (९) कैच्या–दारूच्या २४ बाणांची जुडी. (१०) शिलेपोस–तयार. (११) ब्रह्म, शेष, सूर्य आणि सोम या ४ वंशांची प्रत्येकी २४ कुळे. (१२) तवेशे–त्वेषे, (१३) पेशजी–पूर्वी, मागे.

दाणा वैरणीस कांही मुलुकांत बाकी राहिली नाहीं, सात आठ गांवची जागा मुक्कामास पाहिजे. सेनासागर दिवसेंदिवस अधिक उचंबळत चालला. पुढें जाट आदिकरून जे जे भुमे[1] त्या प्रांतींचे होते तितके अनुकुळ जहाले चोहोंकडील फौजा मिळोन यमुनातटाकास सदाशिवपंत भाऊ दाखल जाहले.

## ४. इराणी आणावयाचा संकेत

बुंदेलखंड व बंगाला येथील रजपूत यांनीं व मांडलिक राजे यांनीं आपलाले सरदेशीं[2] फौजा घेऊन, दोहींकडे अंग न देतां सलूख राखून, मित्रत्व संपादून आपआपले स्वस्थलास स्वस्थ राहिले. इराणीस किंवा सदाशिवपंतासही सामील जहाले नाहींत. तसे अंतर्वेदीकर जयसिंग यांणीं आपली फौज दोघांसही कुमकेस न देतां आपल्या स्वस्थानावर होते. हस्तनापुरवसी पातशाहा[3] यांणी बदनजर[4] धरून, इराणी व आपण एकत्र होऊन दक्षिणी फौजेचा उपमर्द करावयाचा विचार आरंभून मनसूरअली[5] व महमदखान व भोलीभुजसिंग राजे अयोध्येचे यांणीं व सुजात दौले या सर्वांनीं कुमती[6] कथून इराणी आणावयाचा संकेत केला.

## ५. सुजात दौला याजकडे वकिली

हा मजकूर तपशीलवार सदाशिवपंतांस कळला तेव्हां सदाशिवपंतांनीं सुजात दौला याजकडे मातबर[7] माणूस वकिलीस पाठवून बोलणें घातलें कीं, "मागें अवदल्ली इराणी बेइमानी होऊन बादशाहीचा ऱ्हास[8] केला. दिल्लीपत बादशाहींत बाकी राहिली नाहीं व तुम्ही व मनसूरअली मिळोन इराणीस घेऊन येतां ही गोष्ट अनुचित, यांत काही ताजकी[9] होतां दिसत

---

(१) भुमे–त्या देशचे रहिवासी. (२) नागपूरप्रत–सरहद्दीस. (३) पातशाहा–आलमगीर दुसरा. (४) बदनजर–वाईट दृष्टी. (५) मनसूरअली–सफदरजंग. नजीबखान रोहिला याच्याबद्दल ग्रंथकारानें चुकीनें हें नाव घातलें आहे. पुढेंही हाच उल्लेख आहे. (६)कुमती कथून–कट रचून. (७) मातबर–प्रतिष्ठित. (८) भिवंडी प्रत हाराष–ऱ्हास वरून हाराष. भाऊसाहेबांच्या बखरीत अनेकदा 'गनिमांचा हर्षकाल' असे आले आहे, (९) ताजकी–भलेपण.

नाहीं. इराणीस पेश[१] होऊं न देतां तुम्हीं व आम्हीं एकत्र होऊन, पेशजीचें उसनें घेऊन अगदीं नेस्तनाबूद[२] करावा. अबदल्ली इराणी[३] मोठ्या उल्हासें मजल दरमजल येतो, त्यास ठायींचे ठायीं ठेविल्यास उत्तम आहे. इराणी यांणीं लाहोर फत्ते[४] केली. बादशाही सिंहासनें मोडीत चालिला. असे असतां तुम्हीं इराणीस आंग[५] दिल्हें, हें उत्तम केलें नाहीं" म्हणोन बहुतां प्रकारें वकिलांनीं बोध केला. परंतु सुजात दौले यांणीं व मनसूरअली यांणीं स्वहित न पाहतां न ऐकतां, पेशवे बहादूर यांचा व जाटांचा उपमर्द करावा हा दृढोत्तर[६] विचार करून वकिलाबरोबर गुर्मीचें बोलणें सांगून पाठविलें, तदनंतर सुजात दौले व मनसूरअली या उभयतांनीं आपले वकिलाबरोबर सांगून पाठविलें कीं, "रजपूत व जाट दिल्लीपत बादशाही चाकर असतां त्या बादशहाबरोबर बदमस्ती[७] करितात, त्यांसही जरब देऊन व तुम्हीही बंडें [करून] दरवर्षी या प्रांतीं येऊन बादशाही बळजोरीनें कायम करूं पाहतां, येविशीं तुम्हांस इजा द्यावी हा मतलब आमचा आहे. या परता दुसरा मतलब आमचा कांहीं एक नाहीं" याप्रमाणें आपल्या वकिलाबरोबर भाऊसाहेबांकडे सांगून पाठविलें आणि आपण बादशाही अनुमतांत[८] रजपूत राजे व राजवाडे व पठाण वगैरे वागत होते, त्यास फिसात[९] करून, आपणांस अनुकूल केलें व चितोडकर राणे व उदेपूरकर[१०] व अमेरीकर व रामनगरकर व मारवाडकर असे एक मतांत आणून सदाशिवपंतांवर व जाटांवर बदनजर धरिली.

## ६. जाटाशीं बुद्धिवाद, जाट अविश्वासू

तेव्हां सदाशिवपंत अटीनें फौजेसुद्धां दिल्लीस दाखल जहाले. दिल्लीचा बंदोबस्त उभयतांनीं[११] करावा हा विचार करून सर्वांची आणभाक क्रिया बेलभंडार झाले कीं, इराणीस नेस्तनाबूद करावा. हा सिद्धांत करून जाट

(१) पेश–वरचढ. (२) नेस्तनाबूद–नायनाट. (३) इराणी–अफगाणांचा वंश दुराणी. (४) फत्ते करणे, जिंकणे. (५) आंग दिल्हे–हातभार लावला. (६) दृढोत्तर–पक्का. (७) बदमस्ती–बंडखोरी. (८) अनुमतात–संमतीनें. (९) फिसात–फितूर. (१०) उदेपूरकर–हेही चितोडकरच. (११) उभयतांनी–जाट व मराठे यांनी.

जामदार बादशाही सलतान्यांतील[1] होते त्यांस सांगितलें कीं, "आमच्या सलतान्यास खर्चास पाहिजे सबब बादशाही जामदारखान्यांतून खजीना देववावा." असें बोलणें पडतांच जाट [यानें] चित्तांत समजून उत्तर केलें कीं, "बादशाही खजीना हुकमाबिगर खर्च करावयाचा नाहीं. तुम्ही लुटावयास सिद्ध जहाले असता पुढें मागें आम्हांस नामोशी[2] येईल" असा घाट बोलण्यांत आणून जाटानें फेरबदलीची गोष्ट सांगितली कीं, "आम्ही बादशाही चाकर बहूत दिवसांचे असतां, आमचे डोळ्यांदेखत ही गोष्ट घडावी, ही रीत आम्हां जाट-रजपुतांस अनुचित. बादशाही तक्त आमचें आम्हीं रक्षावें. येथें एकनिष्ठपणें वर्तावें. हुकमाबिगर खजीना फोडावयास दक्षणी बारग्यांची[3] फौज आली असतां बेलाशक तरवार[4] चालेल आणि तुमचा आमचा भाईपणा राहाणार नाहीं. आम्ही बादशाही पूर्वापार चाकर तुमचें एकंदर ऐकणार नाहीं या उपर समजोन राहाणें." अशीं भाषणें नोकेझोकेचीं[5] जाटांनींही भाऊसाहेबांकडे सांगून पाठविलीं. तीं सर्व भाऊसाहेबांनीं श्रवण करून सावध जहाले आणि चित्तांत समजलें कीं, जाटाचा विश्वास नाहीं. हा कार्यवादू[6] समयास फिरून पडेल. आम्हांस हाच शत्रू याचा भरंवसा नाहीं. तेव्हां दृढोत्तर विचार करून मनोधारणास्तव भाऊसाहेब यांनीं उत्तर सांगून पाठविलें कीं, "तुम्हांस जें मान्य तें आम्हांसही मान्य." असें सदाशिवपंत भाऊ यांणीं व मल्हारजी होळकर यांणीं सांगून पाठविलें. "यांत अणुमात्र तफावत[7] नाहीं. या उपर तुम्ही कराल तेंच प्रमाण, ही खातरजमा असों देणें. बादशाही कायम करावी आणि शत्रूचा पराभव करावा. मागें फिसाइतामुळें[8] बुबुबेगम[9] यांणीं बादशाहीचा नाश बहूत केला आणि सगळी बादशाही बुडविली. कांहीं स्वहित पाहिलें नाहीं. बेटी[10] देऊन इराणी शेर[11] केला. अटकपार होऊन हा काल पावेतों आला

(१) सलताना–फौज. (२) नामोशी–नामुष्की, बेअब्रू. (३) बारगे–लुटारू. उत्तर प्रांतांतील लोक मराठ्यांना बारगे म्हणत. (४) तरवार चालणे–युद्ध होणे. (५) नोकेझोकेची–खोचक. नागपूर प्रत व पुणे प्रत २–निष्ठुर. (६) कार्यवादू–कार्यसाधू. (७) तफावत-अंतर. (८) फिसाइत–फितूर. (९) बुबुबेगम–महमदशहाची बायको मलकाजमानी. (१०) बेटी–चंदाजमानी अबदालीपुत्र तैमूरशहाला ही दिल्ली. (११) शेर–वरचढ.

नवता. शाहा [जहान] बादशाहा यांणीं बावन्न बादशाहा काबीज केले. अलमगीर[१] बादशाहांनीं प्रौढ प्रताप सामान्य केला नवता. इराणी, दुराणी, मुलतान, मस्कत, पुर्तकाल[२] ज्यांचे दहशतीनें थरथर कांपत होते, त्या बादशाहांची अब्रू गृहकलहामुळें अगदींच गेली. बादशाहीची जागा इराणी दुराणी आणि गिलचा यांस केवळ पायवाट जहाली. दौलतींत मुरबी[३] अमीर व दिवाण समजदार शाहाणा, नीतिवंत माणूस कोणी राहिला नाही. आम्ही फरजंद[४] लहान माणूस न हों. जेणेंकरून बादशाही सलामत[५] राहील तेंच करावयास आलों आहों. ही गोष्ट पसंतीस न आणितां आमचा तुम्हांस बेविश्वास वाटून आला. हें तुमचे प्रत्ययास दिवसेंदिवस येईल. इराणी परम बादशाहीचा नाशकर्ता अबदल्ली यांणीं भर देऊन अगदींच बादशाही बुडवावी या विचारावर प्रवृत्त जाहला. आणि मनसूरअली व सुजात दौला [व] अवांतर कारभारी इराणी दुराणीकडे मिळाले. तुम्ही बादशाहीचे दुवागीर[६], इमानी आहां. आमचा वसवसा[७] काडीमात्र न धरितां सर्व जमातीनिशीं एकदील होणे. इराणीचा हिशेब कोण धरितो ? आमचे खातरेंत नाहीं. तुम्हांजवळ आम्हांविषयीं हरएक बाबेविशीं कफारत[८] पडते, त्या गोष्टीवर न जावें. जे बदनजर धरून वर्तणूक करितील त्यांस त्यांचा कुलस्वामी पाहून घेईल. तुम्ही मुरबी सर्व जाणत असतां अगदीं छान[९] न केला. नजरेनें पाहून आम्हांस मग दोष ठेवावा. हें चांगलें नव्हे " याप्रमाणें बहूत प्रकारें युक्तिप्रयुक्तीनें बुद्धिवाद केला. परंतु जाट अविश्वासू, त्यांणीं भाऊसाहेबांस विश्वास दाखवून मनसूरअलीकडे व सुजात दौला याजकडे परस्परें सूत्र लावून इराणी सुद्धां भारी फौजेनिशीं एकाएकीं दिल्लीस आणिलें. ते काली महासंकट दुर्घट प्राप्त जाहलें. जाट याचा भरंवसा पूर्ण सदाशिवपंत यांसि कळला.

(१) अलमगीर–औरंगजेब, (२) पुर्तुकाल–पोर्तुगाल. (३) मुरबी–जाणता. (४) फरजंद–पुत्र, पुत्रवत मानलेले. शाहू महाराजांस औरंगजेबाची कन्या पुत्रवत लेखी. (५) सलामत–सुरक्षित. (६) दुवागीर–हित चिंतणारे. (७) वसवसा–संशय, भीती. (८) कफारत–तंटा, तेढ. (९) छान–शोध,

## ७. दिल्ली-कुंजपुरा लुटून फस्त

या समयीं दोन शह रक्षून निघावें यांतच उत्तम आहे, याप्रमाणें मनसोवा[१] करून सदाशिवपंत परम सक्रोध होऊन, बादशाहाचे तख्त[२] जडित नवरत्नाचें सुवर्णाचें होतें तें फोडून, त्यांतील मुबलख द्रव्य काढून, फौजेस वांटून, आपले बुद्धीनें फौजा सांभाळून निघोन कालिंदीतटाकास[३] दाखल जहाले. जाटांत व सदाशिवपंतांत पादशाही तख्तामुळें अंतर्यामीं परस्परें विकल्प वाटून आला. स्नहेभाव रक्षिल्यामुळें व्यंगोक्ती[४] दिसों दिली नाहीं. केवळ सदाशिवपंतांनीं व जाटांनी एकमेकांस विरोध दिसों न दिला. परभारें जाट निघोन आपले देशाचे सरदेस[५] गेले. इराणीसही आपलें भय अणुमात्र जाटांनीं दिसों दिले नाहीं. याप्रमाणें सुरजमल्ल जाटाचा मजकूर पूर्ण सदाशिवपंतास कळोन आला. सदाशिवपंत यांनीं आपलीं फौज व मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे वगैरे सारी फौज दक्षणची कराराची[६] सव्वा दोन लक्ष उरली व उत्तर खंडांतील मराठी फौज व रजपूत व रांगडे[७] व मेवाती[८] आदिकरून एक लक्ष एकूण सव्वातीन लक्ष फौज[९] येणेंप्रमाणें जमाव एक ठिकाणीं करून, शिवाय पायदळ साठ सत्तर हजार, तोफखाना वगैरे कारखाना[१०] सुद्धां यमुनातटाकास इराणी येण्याचा रस्ता कोंडून, तोफखाना पसरून[११] फळी[१२] धरून चौफेर फौजा उतरविल्या. दाणावैरणीकरितां बादशाही खालचा मुलूख अगदीं वीस पंचवीस गांवपर्यंत चौफेर बेचिराख[१३] झाला. दाणावैरण अगदीं बंद जहाली. शेराची धारण झाली. तेही मिळेनाशी झाली. वीस पंचवीस हजार फौज चौफेर[१४] दिवसाचे मजलीस जाऊन भरस्वती गांव असतील ते लुटून आणावे तेव्हां अन्नपाणी मिळावें, याप्रमाणें जहालें. खजीना ही चालेनासा

(१) मनसोबा–विचार. (२) तख्त–सिंहासन–रुप्याच्या छताचा हा उल्लेख आहे. (३) कालिंदी–यमुना. (४) व्यंगोक्ती–उघड वैर. (५) सरद–सरहद्द. (६) कराराची–निश्चयाची. (७) रांगडे-गुजराथ, मेवाड येथील राहेवासी (८) मेवाती–बंडखोर. (९) फौज-घोडदळ. (१०) कारखाना–परिवार. (११) पसरून-मांडून. (१२) फळी–दाट रांग. (सैन्याची). (१३) बेचिराख–ओसाड. (१४) याबद्दल नागपूर प्रत व पुणे प्रत २–फौज चार दिवसांचे.

जाहला. अगोदर श्रीमंतांनीं दोन कोट रुपये हिंदुस्थानचे मोहिमेस भाऊसाहेबांकडे पाठविले व मल्हारजी होळकर यांजकडील खजिन्यांतील एक कोट व जनकोजी शिंदे यांजकडील खजीना दोन कोट व शिवाय सरकारी दोन कोट रुपये मागाहून[1] आले. एकून सात कोट रुपये लष्करांत पावले. आणखी ऐवज शहर पुण्याहून रवाना जाहला, तो लष्करात पावलाच नाही. वीस पंचवीस हजार फौजेला मार्ग फुटेनासा जहाला खजीना पाठविला तो सुरंजेस व उज्जनीस व नरवरास व भेलशास व अवांतर जागजागीं अटकून राहिला. लष्करचे कागदपत्र अगदीं बंद जहाले. तेव्हां कुंभेरीकर जाट सुरजमल्ल- यांनीं बंदोबस्त आपल्या तर्फेनें करून एक कोट रुपये लष्करांत पावते[2] केले बुंदेले आणि बागलकोटकर यांणीं, व बंगालेखंडकर[3] यांणीं, व सवाईराम जयसिंग यांणीं, चितोडकर यांणीं गुप्तरुपे खजीना पाठविला; तो कुंजपुरावरच होता. त्याची बातमी बारग्यांचे फौजांस लागतांच एकाएकीं जाऊन धोशा[4] घालून खजीना लुटून नेला. तेथें मातबर अमिरांचे व पठाणांचे व रोहिल्यांचे कबिले[5] होते, ते अगदीच सांपडले ते लुटून फस्त केले आणि अटक करून ठेविले. सावकारी द्रव्य मातब्रांचें व अमिरांचे वगैरे मुबलक बादशाही खजीना शहाजाफराचे[6] वेळचा होता तो जोरावारीने[7] लुटून फस्त केला. एकूण नऊ कोट रुपये सरकार जामदारखान्यास दाखल जहाले. कुंजपुरा लुटून दरोबस्त फस्त केला. द्रव्याची लष्करात महामुरी[8] जहाली. तेव्हां तीन शेर धान्य मिळों लागलें. खाण्यापिण्याची वगैरे सरंजामाची उठवण[9] मोडली. या विरहित दिल्ली संस्थानचा मुलुख दरोबस्त मारून लुटून फस्त केला.

## ८. दुराणी यमुनातीरास, तोफांची सरबत्ती

ही हकीकत सुजात दौला यांणीं इराणीस तपशीलवार लिहून पाठविली.

(१) याला आधार नाही. (२) जाटासंबंधीच्या पूर्वीच्या वर्णनाशी हे विसंगत आहे. (३) भिवंडी प्रत–बंगालखडीकर. (४) धोशा–झपाट्याचा हल्ला. (५) कबिले–कुटुंबे. (६) भिवंडी प्रत शहाजाद्याचे. नागपूर प्रत शहाजहाचे पुणे प्रत २, शहादानचे (७) जोरावारी–जबरदस्ती. (८) महामुरी–समृद्धी. (९) उठवण–आपत्ती.

इराणी दुराणी दरकूच यमुनातीरास आले. पश्चिमेकडून घाट नदीचा उतरून, दोन तीनशे नावांचा पूल बांधोन, नदी उतरू लागले. तेव्हा दमाजी गायकवाड व समशेर बहादर व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व यशवंतराव पवार व जनकोजी शिंदे वगैरे सरदार व पथके व इभ्रामखान गाडदी यांजकडील सरदार पंचवीस हजार लोकांनिशीं बराबर सात आठशें[१] तोफा मोठ्या पल्लयाच्या व जेजाला व जंबुरे[२] गरनाळा[३] पुढें देऊन सरबत्ती[४] केली. त्या सरबत्तीचे धडाक्यानें शत्रूकडील फौज जितकी यमुना उतरत होती तितकी ठार जहाली; कोणी जिवंत राहिला नाही. मागील दुमाल्यावर[५] जी फौज होती त्या फौजेनें भाऊसाहेबांकडील मारगिरीची दहशत खाऊन पळोन गेली.

### ९. भाऊंचा 'लढाई व्हावी हाच संकल्प'

तदनंतर इराणीकडे सदाशिवपंतांनीं वकिलाबरोबर सांगून पाठविलें कीं, तुम्हीच चढाई करून आलां तसेंच यमुना उतरून आलीकडे यावें अथवा आम्हीच तिकडे येतों. एकवेळ तुम्हांशीं व आम्हांशीं लढाई व्हावी हाच संकल्प आमचे अंतःकरणापासून आहे. यांत तफावत नाहीं. असा सिद्धांत करून वकील पाठविले. त्या वकिलांनीं पत्राप्रमाणें वगैरे मुखजबानीचे जाबसाल[६] निवेदन केले. अबदल्ली व सुजात दौला व मनसूरअली या त्रिवर्गांनीं तीं पत्रे वाचून पाहून म्हणूं लागले कीं, " मराठे बडे कट्टे लढनेवाले. उनके आं गु खुदा खडा रहनेका नहीं. अनाजका[७] दुकाळ पडा तोबी लढनेकू हटेले खडे रहते है. इस लढाई खातर सबने बडी धूम मचा[८] दीई. सल्ला करनेके कुच लोक भेजते नहीं. मराठे लोगोंका बडा जोर नजर आता है. लढाईके खातर सो दोन सो कोस दुनयाबी बेचिराख हो रही. क्या करना ! " अशीं उत्तरे दिलगिरीचीं त्रिवर्गाचीं पठाण रोहिले यांणीं श्रवण करून उत्तर दिलें

(१) नागपूरप्रत-सातआठ. (२) जंबुरे-लहान तोफ. (३) गरनाळा-मोठी तोफ. (४) सरबत्ती-भडिमार. (५) दुमाला-पिछाडी. (६) जाबसाल-संभाषण. (७) अनाज-अन्न. (८) मचा दीई-माजवली.

कीं, " या उपर बारग्यांची फौज चढून लढाईच्या उद्देशें आली असतां बेलाशक मोहरम[१] करूं यांत अंतर नाहीं. गलीम[२] बहूत बदमस्त[३] जोरावर जाहला. त्यास आम्ही यमुना उतरून पैल तीरास येतों. " याप्रमाणें पत्रांचीं प्रतिउत्तरें लिहून सदाशिवपंत भाऊंस वस्त्रें व घोडा व मोत्यांचा तुरा व जडावाची कंठी व शुभ्रवर्ण ऐरावतीतुल्य हत्ती, मुलतानी तरकस कमाना[४] दोन, येणेंप्रमाणे वकिलाबरोबर देऊन सदाशिवपंत भाऊच्या लष्करांत आले.

## १०. तवईचा वक्त गुजरला

वकील रवाना केल्यानंतर अबदल्ली व सुजात दौले व मनसूर अली या त्रिवर्गानीं फौजेसहवर्तमान जीवित्वाचा[५] संकल्प करून, दोन लक्ष सेनासहित तोफखाना मागें टाकून, पांच सातशें नावांचा पूल बांधोन लष्कर तमाम उतरूं लागलें. तें समयीं तेथें बहूत मारामार जाहाली. बारग्यांकडील[६] तोफखाना सुरू जाहाल्यामुळें इराणीकडील लोक फारच जायां जाहले. परंतु तितुका अग्नीचा पर्जन्य पिऊन, लढाईचा गुमान[७] न धरितां, इराणीकडील फौज दरोबस्त यमुना उतरून दक्षणतीरास आली. मागें कौरव-पांडवांचें युद्ध जाहलें तें पुराणोक्त थोर वक्ते सांगतात आणि श्रोते ऐकितात. तें वर्तमान प्रत्यक्ष पाहाणें प्राप्त जाहालें. कुरुक्षेत्रीं पश्चिमेकडे इराणीकडील सरदार फौजेनिशीं व पूर्वेकडील बाजूस सदाशिवपंत बहादर सेनासहवर्तमान उभे राहिले. अघाडीपिछाडीस गोठास[८] गोठ भिडले. इराणी दगेखोर म्हणून सदाशिवपंत सावध रितीनें राहिले. कामाठी[९] व बेलदार[१०] आणून लष्कराभोंवती खंदक रुंद पंधरा हात व उंच दहा हात याप्रमाणें तयार केला. सर्व

(१) मोहरम–कत्तल. (२) गलीम–गनीम. (३) बदमस्त–बंडखोर. (४) तरकस–कमाना–तर्कश–बाणांचा भाता, कमान–धनुष्य. (५) जीवित्वाचा संकल्प करून–जिवावर उदार होऊन. (६) बारगे–लुटारू हा शब्द शत्रूने मराठ्याबद्दल वापरला तोच लेखकाने उचलला आहे हे खटकते. भाऊसाहेबांच्या बखरीत ' गनीम ' हा शब्द सर्वत्र असाच येतो. (७) गुमान–पर्वा, (८) गोठ–सैन्याची छावणी. (९) कामाठी–लष्करात डेरे लावणारे मजूर. (१०) बेलदार–गवंडी.

तोफखाना लष्कराभोंवता पसरून रात्रंदिवस सावध राहिले. कोणी युद्धास प्रवर्तेना. दोन महिनेपर्यंत मुक्काम पडला. लष्करांतून तफावतीनें मुक्काम करावा तो न करितां इराणी हांवभरी[1] होऊन पिच्छा पुरवूं[2] लागला. याजकरिता पेशवे बहादूर हटातटानें इराणीच्या लष्कराजवळच राहूं लागले. मुलूख अगदी वीस पंचवीस गांवर्यंपत बेगर्द[3] बेचिराख जाहाला. दाणावैरण मिळेनाशी जाहली. सदाशिवपंतावर मोठा तवईचा[4] वक्त गुजरला.

## ११. लढाईची मर्दुमी

[तिव्हां] प्रथम सदाशिवपंतांनीं आपली फौज व सरदार तयार करून गोठ सोडून बाहेर निघाले. तीन टोळ्या केल्या. एक पूर्वेकडें गोठ पाठीशीं घालून मल्हारराव होळकर पन्नास हजार फौंजेनिशीं पुढें तोफखाना देऊन उभे राहिले. उत्तरेकडे खांसा विश्वासराव व समशेर बहादर व जनकोजी शिंदे साठ हजार फौजेनिशीं उभे राहिले. व पश्चिमेकडे खुद्द सदाशिवपंत व यशवंतराव पवार व अप्पाजी जाधवराव वगैरे साठ हजार फौजेनिशीं उभे राहिले व इराणी दुराणी यांणीं आपला गोठ सोडून तयार होऊन आले. त्यांणींही आपले फौजेच्या तीन टोळ्या केल्या. अबदल्ली व सुजात दौले व हस्तनापूरवासी, मनसूरअली वगैरे उभे राहिले. प्रातःकाळच्या पांच तास दिवसापासून सूर्य अस्त पावेतों युद्ध जाहाले. सदाशिवपंतांकडील तोफखान्याच्या अग्नीचा मार जबरदस्त जाहला. तितकी आग पिऊन[5] गिलचे चालून आले. ते समयीं सदाशिवपंतांनीं मागें पुढें अणुमात्र न पाहतां इराणीच्या फौजेवर चालून घेतलें. तेथें हातघाई[6] मोठी जाहाली. नामी नामी सरदार सदाशिवपंतांकडील ठार जाहाले. धारकरी शिपाई हजार बाराशें रणांत पडले. जखमी हजार बाराशें जाहले व हजार बाराशें घोडे तळावर राहिले. हस्ती नग पंचवीस ठार पडले. अबदल्लीकडील पठाण चार हजार ठार जाहले. या शिरहित उंट नफर[7] पांचशें व बाणांच्या कैच्यांचे व दारुगोळ्यांचे व बातमीचे सांडणी-

(१) हावभरी–अतिशय उत्सुक. (२) पिच्छा पुरवणे–पाठलाग करणे. (३) बेगर्द–वृक्षरहित. (४) तवई–संकट, (५) पिऊन–सोसून. (६) हातघाई–जोराची हालचाल. (७) नफर–नग.

स्वार[१] मिळोन बहूत जायां जाहले. जखमी माणूस बहूत जाहले. सुजात दौले याजवर लढाईचा मोठा कहर वर्षला. मनसूरअलीकडे लढाईचा प्रसंग थोडा बहूत पडला. हातघाईमुळें मनसूरअलीकडील लोक साडेसातशें कामास आले. शिवाय सहस्रा वधी[२] जखमी जाहाले. हस्ती नग पंधरा व उंट नफर दीडशें, येणेंप्रमाणें ठार पडले. अबदल्ली शिकस्त[३] खाऊन फौजेसुद्धां मागें सरून आपले गोठांत गेले. सुजात दौले व मनसूरअली आपआपले गोठांत गेले. मराठे यांणीं लढाईची शर्थ केली. आजपर्यंत तिमिरलंगापासून[४] बहूत दिल्लीच्या सिंहासनावर बादशाहा जाहाले. पुंड पाळेगार[५] व रजपूत, रांगडे व मेवाती, मारवाडी इत्यादिक जाहाले, परंतु अशी लढाईची मर्दुमी कोणीही केली नसेल. मराठी फौज आम्हांस मोजता दिसत नाहीं याजकरितां मोठ्या तर्तुदीनें आपल्या लष्कराभोंवते छबीने[६] रात्रंदिवस मोठ्या मोठ्या सरदारांचे नेमून देऊन हुशारीनें राहिले.

## १२. इराणीतर्फे वकिलो

या उपर इराणी व सदाशिवपंतांनीं दम खाऊन, आपल्या गोठासमीप चवक्या पहारे कडोविकडीचे[७] ठेवून तयारींतच उभयतां होते. अशा अवकाशांत इराणी यांणी आपल्या तर्फेनीं आणखी एक वेळ वकील पाठवावा असा सिद्धांत करून, सुजात दौले व मनसूरअली या उभयतांचे संमत घेऊन, रहिमतखां व रसूल पठाण व मणिराम रजपूत व महादाजी[८] सुभानराव ऐसे चौघेजण पाठविले, कारण कीं, " तुम्ही जोरावर होऊन अटकेची सरहद्द व मारवाड व लाहूर प्रांत व बंगाला व अंतरवेद व काशी व प्रयाग व गया व काश्मीर पावेतों मुलूख काबीज करावयाची उमेद धरून बादशाई खजीना

(१) सांडणीस्वार–उंटावरील, डाकेचे शिपाई. (२) नागपूर प्रत व पुणेप्रत २ रजपूत, रांगडे व पठाण व कायस्थ व मारवाडी. (३) शिकस्त–पराभव. (४) तिमिरलंग–तैमूरलंग. (५) पाळेगार–डोंगरात राहणारे लुटारू–महालकरी. (६) छबीना–पहारा. (७) कडोविकडी-नाना प्रकार. (८) महादाजी सुभानराव इकडे कसा ? अशी शंका का. ना. साने यांनीं काढली आहे.

बंद केला. अटकेपलीकडे ठाणीं घालावीं, चितोड व द्वारका व गुजराथ आदिकरून खालसा मुलूख केला. आग्रा प्रांतांतील खंडणी घेऊन अंमल करितां. या खेरीज दिल्ली म्हणजे बादशाई तख्ताची जागा, तेथील अमर्यादा करून, फौज दरवर्षी पाठवून कैदकानू[1] तुम्ही आपली बसविली. याप्रमाणें काशीपलीकडे दमाऊकमाऊचे पहाडापर्यंत अंमल सुरू करू पाहतां. बद्रिकाश्रम पावेतो जावयाची उमेद धरितां. रूमशाम येथें एकछत्री राज्य करावें, चतुःसमुद्र पावेतों पृथ्वी पादाक्रांत करावी, ही इच्छा [तुमची.] रूमशामचे बडे बादशाहा यांणीं नऊशेनऊ सदींत[2] पैगंबर सुलतान महंमद यांणी फर्जदास[3] हुकूम केला की, दिल्लीपत बादशाहांनीं आम्हांस कुमकेस बोलाविलें. तुम्ही अटकपार होऊन दक्षणेंत जाऊन दिल्लीपत बादशाहीचा मुलूख काबीज करून बंदोबस्तानें दिल्लीपतीची हुरमत[4] राखावी. या कारणास्तव आम्ही फौज घेऊन दिल्लीपतीच्या कुमकेस आलों. दिल्लीश्वर म्हणजे केवळ ईश्वरी अंश, संस्थान सर्व हिंदु-मुसलमानांस वंद्य; असें असतां बादशाहींत फितूर जाहला. रजपुत रांगडे व अवांतर थोरथोर संस्थानकरिते जबरदस्त आहेत, ते तुम्हीं कसोसीत[5] आणून दिल्लीपत बादशाहीचा व सुरळीतपणाचा जवा[6] बसवून देऊन, तुम्ही आपले स्वारीचा खर्च दिल्लीपतीपासून घेऊन आपले स्वदेशास जावें. व चितोडकर राणे संग्रामसिंग व उदेपूरकर व अमेरीकर व सवाई जयसिंग जैपूरकर या शिवाय बावन्न उमराव यांणीं बादशाहीच्या जाहागिरी बंद केल्या आणि तुम्हांशीं मिळून संपूर्ण हिंदूमय करू पाहतात. बादशाही सिंहासन अनादि होतें, तें ज्यांनी बुडविले त्यांची पारिपत्यें करावी, व तुम्हांसही बेकैदी[7] चालल्यास इजा द्यावी, सबब आमच्या खावंदांनीं आम्हांस रूमशामाहून बिदा[8] करून पाठविलें. तुमचा षिच्छा पुरवावा लागेल. कारण की तुम्ही अमर्यादा करून दक्षणेंतींल बादशाहीचे खावंद निजाम उल्मुलूख व तुकुमशा[9] व विजापूर येथील इदलशा तैशीच बेदर व दौलताबाद सारिख्या

---

(१) कैदकानू–अंमल. (२) सदी–सद्दी शतक. (३) फर्जंद–पुत्र, पुत्रवत मानलेला अब्दालीस उद्देशून. (४) हुरमत–अब्रू. (५) कसोशीत–जरबेत. (६) जवा बसवणे–समेट करणे. (७) बेकैद–गैरशिस्त. (८) बिदा करणे–रवाना करणे. (९) तुकुमशा–कुतुबशहा ?

जागा, अमदानगर व कर्नाटक काबीज करून हैदराबादेस मोर्चे लाविले. सहा[१] सुभे दक्षणचे किलिजखां मुतालक व फत्तेजंग बहादूर व तोलेजंग बहादूर व शिद्दी अमीर वगैरे बादशाहाजादे दिवसेंदिवस खाली आणले व ब-हाणपूरकर व औरंगाबाद व सोंदे बिदनूर व त्रिचनापल्ली व श्रीरंगपट्टण व मछलीबंदर व समुद्रतीर व गोमांतक व तमाम कोंकण व खंबायत अवांतर समुद्रांतील किल्ले महाकुबल[२] जागा, एका परीस एक बांक्या[३] सुरंज, गढेमंडळें, खानदेश, नेमाड, व मनमाड व व-हाड व खेचीवाडा व हडोती मुलूख काव्या-दाव्याने[४] सर करून, हांवभरी भरून, दिल्लीस हिंदूपत बादशाहा बसवून, बेवीस उमराव पिढीजादे नांव विनांव केलेले, तुमच्या दहशतीनें कितीक मांडलिक राजे आपल्या जागा सोडून, फकीर होऊन देशांतरास गेले. सर्व बादशाही तुम्ही मराठियांनीं वेकैदी करून बुडविली. अलमगीर बादशाचे वेळेचे नामी नामी उमराव शास्तेखां व अस्तखां व झुलपुकरखां नबाब नसरतजंग व हिंमतखां व फत्तेसिंह व मनसूर अलीखां पठाण व खानखां व इम्रामखां व हफ्तहजारी[५] जामत अलीखां व फर्दुल्लाखां व फत्तेखां व हसनखां व रणमस्तखां व महमदखां व खावंदखां व कासमखां व किलिजखां, जैसिंग व संग्रामसिंग, जोरावरसिंग व महिपतसिंग, असे थोरथोर यांचे बेटे व भाई व जांवई यांस गर्दीस मिळवून नेस्तनाबूद केलें. तसा हा मजकूर नव्हे. एवढी बादशाही, अनादि तक्त, याच तक्तावर युधिष्ठिर बसत होते, ते तक्त तुम्हीं फोडून बादशाहा परागंदा करवून, आणखी अटकपार होऊन, रूमशामची बादशायत घ्यावयाची मसलत करून, तेथीलही सरदेशमुखीची कैदकानू बसवून हक्क घेऊं पाहतां. यांत कोणती किफायत[६] आपण पाहिलीत ? पेशजी बादशाहा कृपावंत होऊन साडेसहा सुभे दक्षणेंतील सरदेशमुखी तुम्हास करार करून दिल्ही, तो वंत[७]

(१) सहासुभे—औरंगाबाद, व-हाड, खानदेश, विजापूर, गोवळकोंडे व बेदर. (२) कुबल—मजबूत, (३) बांक्या—दुःसाध्य, (४) कावादावा—कपट, (५) पुणे प्रत १ हपतीत, भिवंडीप्रत-हैपतीन, नागपूर प्रत—इतप्ते. मूळ शब्द कळला नाही म्हणजे वेडेवाकडे रूपांतर कसे होते याचे हे उदाहरण असे का. ना. साने म्हणतात. हफ्तहजारी—सप्तसहस्त्री ७ हजार स्वारांचा सरदार, (६) किफायत—फायदा, (७) वंत—वाटा.

अनुभवून सुखरूप राहाणें. जाजती उपद्रव मुलुखास व बादशाह स द्यावयाची गरज नाहीं. नर्मदा दक्षणतीरापासून पलीकडील हद्द तुम्ही आपली संरक्षण करून असावें. आणखी तुमचे फौजेस घासदाण्याबद्दल दोन कोटी रुपये व एक कोटी रुपये स्वारीखर्च, येणेंप्रमाणें रोख देऊन, बादशाही सनद नवीन करून देतों. त्याबरहुकूम घेऊन बादशाहाची नोकरी करीत जाणें. हा करार असल्यास सलूख संपादिला जाईल. ही गोष्ट तुमचे खातरीस न येई तरि लढाई करावी लागेल. याचा पक्केपणें विचार करून, सांगितलेल्या गोष्टी मान्य असल्यास लिहून पाठवाव्या. त्यासारिखें आम्ही बादशाहाची खातरजमा करून येतों. सेवकपणाचे धर्मानें बादशाहाचे पायांजवळ वर्तणूक करून, बादशाहाचे खिजमतींत[१] एक साल राहून, सरफराई[२] करून घेणें. जिद[३] वाढविल्यास कामास येणार नाही. त्यांत तुम्ही माकूल[४] आहां.

## १३. 'बंदोबस्त करणें तो आम्हींच करू'

याप्रमाणें सर्व मजकूर इराणीच्या वकिलांनीं सदाशिवपंतांस समजाविला. तो मजकूर सदाशिवपंतांनीं श्रवण करून, मातबर सरदार व मल्हारजी होळकर यांचे विचारें ठरवून सांगितलें कीं, " हिंदूपत बादशाही येथील बंदोबस्त करणें तो आम्हीच करूं. तुम्ही पर-पादशाहीचे असतां आपली हद्द सरद टाकून मनसूरअली व सुजात दौले यांचे विचारें हांवभरी होऊन आलीकडे आलां. मागें तुम्हीच येऊन अगदीं बादशाही बुडविली. हल्लीं मिराबुबु बेगम यांचे अनुमतें येऊन व्यर्थ दंगा आरंभिला. ही गोष्ट इनसान[५] नव्हे. मागे[६] आलां ते समयीं आम्ही असतों तर बादशाहीची खराबी होऊं न देतों. आतां तुम्ही आमचे मसलतीस अडथळा करणार कोण ? आमचे चित्तास येईल त्याप्रमाणेंच करावयास श्रीमंत नानासाहेब समर्थ आहेत. रूमशामची खबर आम्ही घेणार, येथें तुमचा मजकूर[७] कोठें ? तुम्हीं आल्या मार्गें अटक उतरून जावें. भाईचारा[८] राखावयाचा असल्यास लौकर फौजेसुद्धां

(१) खिजमत–चाकरी, (२) सरफराई–शिफारस, गौरव. (३) जिद–जिद्द, हेका. (४) माकूल–उचित, समंजस, (५) इनसान–न्यायाची, (६) मागे–इ. १७३९ मधील नादिरशहाच्या स्वारीचा हा उल्लेख आहे. (७) मजकूर–किंमत, (८) भाईचारा–बंधुत्व

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ, ... ...
... पुणे–४११ ०३०

माघारें जावें. जे जे तुम्हांस आमचे पारिपत्यास्तव घेऊन आले असतील त्यांनीं तरी कोणती किफायत पाहिली ? आम्ही तुम्हांस एकंदर दबून राहणार नाहीं. आम्हीं सर्व गोष्टींनीं तरतूदार[१] आहोंत. हिंदूपत बादशाहीचे वगैरे माणूस मातबर उमदे दौलतकर्ते पंतप्रधान बहादूर आहेत. त्यांजवर सर्व राज्याचा भार आहे. चार लक्ष फौजेचे बादशाहा श्रीमंत छत्रपती महाराज सातारकर, त्यांचा जय प्रताप विक्रम वरदहस्त आमचे मस्तकीं आहे. सर्व धरित्रीचें राज्य स्वामिकृपेनें संपादितों. आजपर्यंत संपादीतच आलों. तुमचे हुकुमाची तमा[२] धरीत नाहीं. लढाई करावी हाच आमचा निश्चय आहे." असें साफ सांगितलें. व सदाशिवपंतांनीं आपले तर्फेनें लक्ष्मण बल्लाळ व बुरूणशा या उभयतांस इराणीकडे वकिलीस पाठविलें. त्यास तेथें बोलण्याची आज्ञा झाली जे, "तुम्ही फौजेसुद्धां माघारें जावें, उद्यां येथें राहावयास दरकार[३] नाहीं." आज्ञेप्रमाणें वकिलांनी मजकूर निवेदन करितांच अबदल्लीस परम विषाद आला. आणि तेच क्षणीं भाऊसाहेबांकडील वकिलांस अवकाश न घेतां माघारें रवाना केलें. आणि सांगोन पाठविलें कीं, उदईक लढाईस तयार होणें. आम्ही चालून येतों.

## १४. सरदार बोलावून सरफराई

याप्रमाणें वकिलांचीं कठोरपणाची भाषणें सदाशिवपंतांनीं समजून घेऊन, मजालस[४] करून, तमाम लहान थोर सरदार बोलावून आणून सरफराई केली. मोत्यांच्या कंठया व शिरपेंच व जडावाचीं कडीं व कलग्या[५] व तुरे, चौकडे व मंदील[६] व शालजोडया व बादली[७] चिरें व घोडे व हत्ती व पालख्या व वस्त्रें व अबदागीर[८] व फत्ते जाहल्यावर मानपानाच्या ताजिमा[९] व कोणास गांव व परगणा व कोणास सचंतर[१०] एक देशींचें राज्य, अवांतर सरदार लोकांची मनाधारणेची बोलणीं बोलून, सदरहूप्रमाणें बक्षिसें देऊन,

(१) तरतूददार–उपायवान, व्यवस्थापक. (२) तमा–धास्ती, पर्वा. (३) दरकार–गरज. (४) मजालस–सभा. (५) कलगी–पागोटयावर खोचण्याचे रत्नभूषण. (६) मंदील–जरीचा फेटा. (७) बादली चिरे–जरतारी वस्त्रे. (८) अबदागीर–मिरवणुकीच्या वेळी धरावयाची छत्री. (९) ताजिमा–अभ्युत्थान, बहुमान. (१०) सचंतर–स्वतंत्र, मुक्त.

एकदील होऊन, सर्वांस स्तुतीनें गौरवून नांवाजिलें. तेव्हां थोर थोर सरदारांनीं उत्तर केलें कीं, “ भाऊसाहेब महाराज ! आम्ही तरी जीवित्वाची तमा धरीत नाहीं. इराणीची कथा किती ? मारून गर्दीस मिळवून देऊ. ” हाच निश्चय सर्वांचा होऊन आपापल्या शिबिरास गेले.

## १५. रणांगणाचा शृंगार

पहांटेची दोन तास रात्र उरली, तेव्हां सरकारी साहेबनौबत[1] लढाई प्रसंगाची करून नकीबांस[2] ताकीद करावयास सांगितली. नकीबांनीं सर्व लष्करांत फिरून ताकीद केली. प्रातःकाल होतांच तमाम फौजेसुद्धां सरदार शिलेपोस तयार होऊन आले. एकापरीस एक, भीमार्जुनासारिखे महावीर, दर-रिकिबीस[3] तरवार गाजविणारें, अंगीं वीरश्रीचीं वारीं, रणांगणाचा शृंगार करून, घुग्या[4] व बखतरें[5] व टोप[6] व चिलखतें, बिन्या[7] व बिरजे[8] व वस्त्रें तकटी[9] व मुक्तमाला व मस्तकीं तुरे व कलग्या व अंगींचे बारा अलंकार व जरीचे अबदागिरें करून शोभायमान, हातीं पट्टे व गुरगुज[10] व फिरंगाणा[11] व बिचवे व कटारा व पेशकब्जे[12] व वाघनखें व भाले व कोयते व परिघ[13] व पट्टीश[14] व फरश[15] व गारभांडीं[16] व सांगा[17] व बरच्या व बंदुका कटितटीस शस्त्रसंभार बांधून आपआपलाले वाहनारूढ होऊन, अंगीं स्फुरणें अतिशय, युद्धास जावयास अति उदित, स्वामिसेवेशीं तत्पर, अशा आवेशाचे पुरुष हजारों हजार सिद्ध झाले. अनसूट[18] नव्या उमेदीचे

(१) साहेबनौबत–मोठा नगारा, डंका. (२) नकीब–भालदार चोपदार. (३) दररिकिबीस–रिकीब–स्वारी, वारंवार. (४) घुगी–राजव्यवहार, कोशातील अर्थ शिरस्त्राण; मोल्स्वर्थचा अर्थ–अंगत्राण–सर्व अंगाचे रक्षण करणारें. (५) बखतर–जाळीदार पोलादी चिलखत. (६) टोप–शिरस्त्राण. (७) बिनी–नासास्त्राण. (८) बिरजे–बाहुभूषण. (९) तकटी–वर्ख, जर. (१०) गुरगुज–गदा. (११) फिरंगाणा–फिरंगी तलवार. (१२) पेशकब्ज–कट्यार. (१३) परीघ–लोखंडाचे गदेसारखे हत्यार. (१४) पट्टीश–पट्टा. (१५) फरश,–परशु कुऱ्हाड. (१६) ‘व गारभांडी’ हे शब्द पुणे प्रत १ व भिवडी प्रत यात नाहीत. गारभांडी–गारेच्या चापाची बंदूक. (१७) सांगा–भाला. (१८) अनसूट–अनुच्छिष्ट, ब्रह्मचारी.

शिपाईगिरीची शर्थ व्हावी म्हणून उमेदवारीने बिरदें बांधून, शिरीं समले[१] सोडून, घोड्यास जडावाचे अलंकार करून, एकाहून एक आगळे, जीवित्वास तृणप्राय मानणारे असे शहाण्णव कुळींचे मराठे घोड्यास नटनागर,[२] जरीबादली पाखरा[३] व शिऱ्या[४] व सडका[५] व पायीं तोडर[६] बांधून घोड्यांस थोपटून उभे राहिले. तसेच हवदे व अंबाऱ्या व नवरत्नांच्या मुक्ताभरणी झालरा याप्रमाणें गजभार सिद्ध जाहले. जंबुरे व ऱ्हेकले[७] व जेजाला, सुतरनाले व थोरली भांडीं एकूण आवाज दीड हजार, याप्रमाणें आराबा[८] पसरून व बाणांच्या कैच्या उंटांवर लादून, बाण लावणारे सहवर्तमान, एकादांच सकल समुदायानिशीं सिंहनादें गर्जना करून रणास जावयास निघाले.

### १६. सैन्याचे चार भाग

नंतर सैन्याचे चार भाग करून दक्षिणचे बाजूस खांसे विश्वासराव साहेब वीस हजार एकांड्यानिशीं,[९] त्यांचे डावे बाजूस मल्हारराव होळकर पन्नास हजार फौजेनिशीं, व पूर्वेस भाऊसाहेब साठ हजार फौजेनिशीं, व पश्चिम दिशेस जनकोजी शिंदे पन्नास हजार फौजेनिशीं, व उत्तरचे बाजूस तोफखाना साठ हजार पायदळासहित इभ्राईमखान गारदी याजकडील लोकांनीं मस्तकावर ढाला घेऊन नग्न हत्यारें करून, सावधतेनें, जुम्मस[१०] न खातां, मांडीस भांडी देऊन, एक[११] घोडाराऊत न मिसळे अशा बेताने निशाणांचे फरारे सोडून उभे राहिले.

### १७. महाधुरंधर संग्राम

इराणी दुराणी व हस्तनापुरवासी व दिल्लीपत बादशाहा यांनीं फौजेच्या चार टोळ्या केल्या. एक्या टोळीस खांसे अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं

(१) समला–शेमला. पटक्याचे पदर. (२) नटनागर–नटलेले. (३) पाखरा–अश्वकवच. (४) शिरी–खोगीर नीट राहावे म्हणून लावलेले बुरणूस. (५) सडक–अश्वचामर. (६) तोडर–तोरड्या पाठभेद तोरड. (७) ऱ्हेकले–रेकले तोफ. (८) आराबा–तोफखाना. (९) एकांडा–स्वतंत्र शिलेदार. (१०) जुम्मस–धास्ती. (११) नागपूर प्रत–एक राऊत व एक माणूस न फुटतां–शत्रूचा स्वार आपल्यात न येई असे.

व दुसरे टोळींत सुजातदवले पन्नास हजार फौजेनिशीं व तिसरे टोळींत मनसूरअली तीस हजार फौजेनिशीं, मध्यभागीं मुख्य इराणी पाऊण लक्ष फौजेनिशीं, याप्रमाणें आपआपले सरदारांस व पायदळांचे जमातदारास[1] निक्षून ताकिदी रणप्रसंगाच्या होऊन बेलाशक चालून घेतलें. तोफखान्यावर जाऊन पडले. एक रंजकेची[2] सरवत्ती होतांच दोहों दळांत धुंधःकार होऊन एकमेकांस दिसेनासें जाहालें. धुरानें दिवाकर अगदींच आच्छादित जाहाला. आपपर कोणी ओळखेनासें जाहालें. दोन प्रहरपर्यंत एकसारिखा तोफखाना उभयतांकडील सुरू होता. धूर निवारण होतांच पाहू लागले तों अमित्राकडील[3] पठाण वीस हजार कामास[4] आले, व सदाशिवपंत भाऊंकडील लोक पायदळ व घोडेस्वार अजमासें वीस पंचवीस हजार कामास आले. श्रीमंत विश्वासराव साहेब व सदाशिवपंत भाऊ व मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व अप्पाजी जाधवराव व विठ्ठल शिवदेव विंचूरकर, समशेर बहादूर वगैरे धारकरी व हुजरातीचे लोकांनीं व एकांड्यांनीं एकदांच सर्वांनीं श्री-जाश्वनीळाचें[5] स्मरण करून व शाहू महाराज छत्रपती यांचें नांव घेऊन, हर हर महादेव ! ! ही गर्जना करून घोडे घातले. इराणी दुराणी व अबदल्ली व सुजातदौला व मनसूरअली व अबदल्ली नादरशहाचे बेटे व दिल्लीपत बादशाहाकडील खासे खासे बादशाहाजादे व राठोड, रांगडे व रजपूत व मेवाती व हस्तनापूरवासी यांणीं "या अल्ला खुदा ! या रहिमान रहीम[6] ! " याचा उच्चार करून एकदां नीट कमरग्यांत[7] शिरले. तेव्हा तीस हजार फौजेनिशीं जनकोजी शिंदे व समशेरबहादूर यांनीं त्यांजकडील सर्व फौज पोटीं घालून घोडे घातले. तेथें मोठी झोटधरणी[8] होऊन वरकड हत्यारांची लढाई व तिरंदाजी ही राहिली. लढाईची हातघाई झाली. भाला व बिचवे व गुरगुजे व जमदाडा[9] व वाघनखें यांचे चपेटे[10]

---

(१) जमातदार–नायक. (२) रंजक–स्फोटक दारू. (३) अमित्र–शत्रू. (४) कामास येणे–लढाईत पडणे. (५) जाश्वनीळ–शिव. (६) नागपूर प्रत–या अल्ला या खुदा या रहिमान दिन् दिन् (७) कमरगा–सेनामध्य. (८) झोटधरणी–खटपट. (९) जमदाड–लांब तलवार. (१०) चपेटे–हल्ले.

फार झाले. एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून पुढचे पाय पुढें टाकूं लागले. कोणी मागें फिरेना. सक्रोध होऊन, अवसानें धरून एकमेकांवर पर्जन्यप्राय कोसळू लागले. मल्लयुद्धाचें मारणेंच कडोविकडीचें परस्परें दाखवूं लागले. या युद्धांत वांचून पुनः दक्षणेंत जाऊन संसार करावा हीं अरुता[1] कोणी ठेविली नाहीं. कोणी महाकाल, कोणी कृतांत असे भासले. कितीकांस मूर्च्छना येऊन रणभूमीस निचेष्टित पडले. कितीकांचीं शरीरें त्या गर्दीच्या रवंदळींत[2] चिरडून गेलीं. कितीकांचे हात पाय तुटून नुसते कोथळे रणांत राहिले. कितीक वीर रक्तबंबाळ होऊन भयंकर दिसूं लागले. कितीक वीरांच्या पाठींतून भाला हृदयपार होऊन आपआपले पुण्यानें कोणी विष्णुलोकास गेले, कोणी कैलासास गेले, कोणी सत्यलोकास गेले, कोणी इंद्रलोकास गेले. याप्रमाणें दुसरी लढाई सात तासपर्यंत झाली. मोठे मोठे सरदारांहीं व शिपायांनीं लढाईची शर्त केली. रक्तोदकें भूलिंगास अभिषेक झाला आणि शिरकमलें हींच भूलिंगास कमलें अर्पण जाहलीं. मल्हारराव रामचंद्र त्या रणांत आक्रंदत पडले होते. तें दुःख त्यांचे चिरंजीव गणपतराव मल्हार यांणीं डोळ्यांनीं पाहून, आपले पित्यास पुरे[3] करून, आपण आपला शिरच्छेद करावयास उदित झाले. ते समयीं सदाशिवपंतांनीं पाहून सद्गद होऊन उत्तर केलें कीं, " आत्महत्या करूं नये. उदईक सर्व आपण इंद्रसभेस जाऊं " असें म्हणून राहविलें. सदाशिवपंताकडील व शत्रूकडील एकंदर माणूस पस्तीस हजार ठार पडलें ! दहा बारा हजार घोडा मोकाट फिरूं लागला ! मदोन्मत्त हत्ती पाऊणशें रणप्रसंगीं पडले. इराणी दुराणी वगैरे शत्रूकडील उंट नफर दोन हजार कारखान्याचे जायां झाले. याप्रमाणें संग्राम महाधुरंधर जाहला. या युद्धांत बळवंतराव गणपतराव मेहेंदळे यांजवर वार पडला. त्यांचे मुर्द्यावर मोठी गर्दी गुजरली. तें सदाशिवपंतभाऊंनीं पाहून, घोड्याखालीं उडी टाकून, दोहों हातीं पट्टे चढवून, जिवाची तमा न धरितां, धीट होऊन नीट फौजेंत चालून घेतलें. कत्तल करीत चालले. ते समयीं जनकोजी शिंदे व त्र्यंबकराव मार्तंड व सदाशिवपंत पुरंदरे व महिपतराव चिटणीस व

(१) अरुता–आशा. (२) रवंदळ–चेंगराचेंगरी. (३) पुरे करून–पूर्णपणे मारून.

विठ्ठल शिवदेव व फकीर महंमद व फिरंगोजी पवार व राणोजी जाधवराव, अण्णाजी जाधवराव व धर्माजी पासिलकर व संताजी आटोळे व नरसोजी खैरात व हैबतराव साळसकर व सयाजी पायघुडे व नरसाजी बिरजे व गुणाजी भापकर व लिंगोजी केशव व सदाशिव अप्पाजीं व जानमहंमद व भागोजी डफळे व इंद्रोजी रसगळ व रस्तुमराव पांढरे व इंद्रोजी कदम व बळवंतराव सासवडकर या सर्वांनीं घोडचाखालीं उडचा टाकून पायउतारा[१] झाले. मागें पुढें पाहिलेंच नाहीं. तेथें मारामारी कांहीं सामान्य जाहाली नाहीं, ते समयीं स्वर्गीं इंद्रलोकींचे इंद्र सुद्धां सुरगण विमानांत बसून अंतराळीं पाहावयास आले. धन्य त्या वीरश्रीवैभवाची ! बळवंतराव यांचा मुर्दा बळजोरीनें सदाशिवपंतांनीं आपले जमातींत आणिला. मर्दुमकीचा वहमा[२] इराणीचा जिरला. त्या सपाटचांत सदाशिवपंत भाऊंकडील व इराणीकडील व दिल्लीपत बादशाहाकडील व सुजातदौले व मनसूरअली व हस्तनापूरवासी यांजकडील खांसा खांसा मोहोरा, एका ताटांतील जेवणारा, साडेसातशें कामास आला. यांणी[३] इराणी दुराणीचा मोहोरम[४] केला. वीरांच्या मर्दुमीचा कळस जाहला ! एवढी लढाई जाहली. परंतु काही तफावत पडली नाहीं ! याजकरितां इराणी दुराणी अंतरीं दिलगीर होऊन म्हणूं लागले कीं, " दखनी मराठे लोक बडे हरामजादे ! तरवारीस आपणास ऐकत नाहींत. बादशाही लियाबिगर हं बी पीछे जानेके नहीं. सब सलतनत[५] समेत हक्क[६] होना ये अच्छा. " असें म्हणोन फिरून चालून येण्याची उमेद धरावी तों एवढचांत सदाशिवपंतानी कुतरतोड[७] करून सर्व शत्रूंस आपल्या लष्करांत शर्तबेशर्त[८] करून दामटून[९] घातलें.

(१) पायउतारा होणे–पायांनी चालणे. पुणे प्रत १ व भिवंडी प्रत– ' पायउतारा होऊन मोठे नेटाची तरवार करून जवामर्दीने पंत मशारनिल्हेचे प्रेत बाहेर काढून आपले जमातींत आणिले. वीरश्रीवैभवाची शर्त झाली ' असे आहे. (२) वहमा–वहीम, शंका. (३) यांणी–मराठचांनी. (४) मोहोरम–कत्तल. (५) सलतनत–राज्य किंवा फौज. (६) हक्क होणे–मरणे. (७) कुतरतोड–त्रेधा, घाई (८) शर्तबेशर्त–परिश्रम. (९) दामटून घातले–पिटाळले.

## १८. पेशव्यांकडील सरदार पडले त्यांची नांवनिशी

इकडे सदाशिवपंत आपल्या लष्करांत जाऊन नामी नामी धारकरी व सरदार व पागे व पतके व गाड्यांतील जमातदार पडले होते ते रणांतून शोधून काढून कोणास पुरलें, व कोणास अग्नि-डाग दिले, व ज्याची ओळख पुरली नाहीं असें जे सरदार चाकरमाने[1] होते त्यांस एकेक्या गर्तेत शेंपन्नास व शेंदोनशें घालून खांचा बुजविल्या. ब्राह्मण-मंडळीस शेले दीड हजार कफनास[2] लागले. या कलियुगीं दुसरें प्रत्यक्ष भारती युद्ध झाले.[3] इराणी दुराणी व दिल्लीपत बादशाह वगैरे यांजकडील व सदाशिवपंत भाऊंकडील लोकांविषयीं व घोडेस्वाराविषयीं व तोफखान्याविषयीं व पायदळाविषयींची बहूत खराबी जाहली ती लिहितां पुरवत नाहीं. पेशवे बहादूर यांजकडील थोरथोर सरदार व मानकरी व एकांडे व धारकरी व हुजरातींतील लोक पडले, त्यांची नांवनिशी मात्र लिहिली. इराणी दुराणी दिल्लीपत बादशाह वगैरे यांजकडील लोक पडले, त्यांची नांवनिशी ल्याहावी तर या कलियुगीं दुसरें भारत होईल ! यांकरितां श्रीमंतांकडील लोक लिहिले गेले त्यांची नांवनिशी तपसिलवार अशी कीं :-

१ बळवंतराव गणपत. १ गंगाधर नारायण १. बाळाजीं भोईटे[4]. १ नारायणसिंग रेडे. १ शिवराव अंबीकर. १ कृष्णाजी मोरे. १ चिमणाजी बाळके. १ अमृतराव चवळे. १ जयाजी भालेकर. १ दयाळ सिंग, १ सोनजीं शिरके. १ नारो हरी. १ सिधोजी भोसले रुजू शेवळे. १ तुकाजी गाढवे. १ सयाजी थोरात. १ हणमंतराव शितोळे. १ हरजी रणदेव. १ हणमंतराव मोचले.[5] १ पदाजी मोहिते. १ लक्ष्मणराव मानगिरे. १ रहिमान गोरी. १ नरसिंगराव चोपडे. १ भिकाजी रासळे. १ भिवराव पवार, १ भिकाजी नळवडे. १ कृष्णाजी विष्णू. १ कमाजी सुरवे. १ लखमाजी गोडे. १ सिदोजी घारघे.

(१) चाकरमाने–आश्रित. (२) कफन–मृताला गुंडाळण्याचे वस्त्र–अंत्यसंस्कार हा अर्थ. (३) नागपूर प्रत–यापुढे 'भाऊसाहेबांनी भूलिंगाची पूजा आरक्त नरांची शिरकमले आणून केली, असें वाक्य आहे. (४) भोईर पाठभेद. (५) मोचले–मचाले ?

१ मल्हारराव कोतकर. १ बहिरराम रजपूत. १ मानाजी रणदिवे. १ गिरजोजी देवळे. १ आनंदराव माने. १. मलकोजी माने १ लखमाजी सावत. १ जावजी दमेकर. १ बयाजी शिरके. १ गंगाजी दाभाडे. १ रामराव साटम. १ येशवंतराव वाघ. १ सिदोजी थोरात. १ कणोजी पालेकर. १ हटेसिंग. १ शंकाजी कांटे. १ संताजी वाघ. १ रामराव शिरके. १ शिवरांव कडू. १ रामराव घुगरे. १ सजनाजी वागवे. १ मोरारजी पडवळ. १ अमृतराव मोरे. १ निळकंठराव माने. १ रामराव राणे. १ यमाजी शिरोळे. १ भुजावरसिंग. १ धोंडाजी पवार. १ शिवजी शेळके. १ पिलाजी नवरे. १ दुल्लभजी पालेकर. १ मानाजी रणनवरे. १ अप्पाजी जिरगे. १ रामराव काळे. १ यमाजी जगिरे. १ लखमाजी गाजरे. १ सयाजी माने. १ रामराव माने. १ तुकोजी थोरात. १ बापूजी काटेकर. १ सयाजी गुजर. १ लिंगोजी थोरात. १ सदाशिवराव राजे. १ बाबाजी घुगरे. १ मुकुब शास. १ सखाराम मोरेश्वर. १ काशिराम तोडगे. १ गोपाळराव शेळके. १ पोथीराम रजपूत. १ यमाजी गोफणे. १ रंगराव शिगाडे. १ अमलशाहा. १ गणोजी मांजरे. १ शिदोजी कापशे. १ अप्पाजी पोवळे. १ यशवंतराव भापकर. १ जावजी जाधव. १ भानाजी मोरे. १ संताजी नळगे. १ म्हसाजी मोरे. १ मल्हारराव शिंदे. १ मणीराम रजपूत. १ अप्पाजी हळदे. १ लिंगाजी कुराडे. १ कृष्णराव पवार. १ बिरदाजी पवार. १ हरी विठ्ठल. १ अप्पाराव बांडे. १ भिमराव हरी. १ सटवाजी पिसाळ. १ देवीदास रजपूत. १ पद्माजी पाटणकर. १ सयाजी म्हसके. १ विठ्ठलराव हरी. १ सदाशिव गोपाळ. १ विठ्ठलराव पांढरे. १ धावजी माने. १ भरमाजी वाघ. १ नरसो व्यंकटेश. १ जोत्याजी रणनवरे, १ रंगराव बांडे. १ यमाजी भापकर. १ चिंतामणराव. १ गंगाजी शिगाडे. १ शिधोजी नवरे. १ यमाजी टकले. १ मल्हारराव वाघ. १ दामोदरसिंग. १ सयाजी आभळे. १ भवानजी सोनवणी. १ चिंतामणराव गोविंद. १ चिमणाजी विठ्ठल. १ यशवंतराव घोगले. १ जावजी माने. १ सिदोजी साळवी. १ बाजीराव मोहिते. १ यमाजी मुरगे. १ नारायणराव पांढरे. १ मानाजी बांडगे. १ नवसोजी वाळवेकर. १ मल्हारराव धुमाळ. १ माधवराव पाटणकर. १ लक्ष्मण शिवदेव. १ जगन्नाथ मल्हार. १ गणेश रामचंद्र शिरोळे. एकूण १३४ आसामी.

## १९. दुराणीकडील सरदार पडले त्याची नांवनिशी

येणेंप्रमाणें सरदार मातबर दहा हजारांचे व पांच हजारांचे व पांचशांचे व सातशांचे व शें दोनशांचे असे ठार झाले. या वेगळे दोनतीनशें जखमी जहाले. ते वांचतां कठीण आहे. पायदळापैकीं बेवीस सहस्र माणूस कामास आलें. या प्रकारचें रणकंदन झालें घे घे[1] मार ऐशी ध्वनी उठूं लागली. युद्ध दारुण झालें. अबदल्ली व इराणीकडील व मनसूर अलीकडील व सुजातदौले यांजकडील खांसे खांसे सरदार पडले, त्याची नांवनिशी तपशीलवार असामी बितपशील :–

१ खिरखान रयाजी. १ गोरखानजी बकल. १ महंमद हुसेन. १ जिराइतखां पठाण. १ अबदूलखां पठाण. १ अनवारीखां पठाण. १ अमृतराव पवार.[2] १ अर्जुनसिंग परदेशी. १ रुस्तुमखां पठाण. १ मुसायदखां पन्हीपठाण. १ गयालखां पठाण. १ भिकाजी राम. १ अजसिंग मारवाडी. १ दाउदखां. १ दावलखां गोरी. १ निजामखां. १ इमामखां खंदारी. १ फकीर दाऊद. १ धनसिंग रजपूत. १ केशवसिंग. १ धर्माजींसिंग. १ भुजावरसिंग रजपूत. १ गलेफखां पठाण. १ लाडखां पठाण. १ तमालखां पठाण. १ दाउदखां पठाण. १ इजाफतखां पठाण. १ दुदुखां पठाण. १ फत्तेसिंग. १ इजावतखां पठाण. १ दाऊदखां पठाण. १ लालखां पठाण. १ मजितखान पन्ही. १ गंगासिंग. १ घेलासिंग. १ हुसेनखां पठाण. १ बद्री जमालखान. १ किराईतखां. १ गलेफखान रयाजी. १ सुलतानखां पठाण. १ चंदीरखां पठाण. १ अजमत्दौला. १ गुलाबखां पठाण. १ किराई रुजू संभासिंग. १ बळरामसिंग. १ फत्तेखां गोरी. १ लक्ष्मण महादेव. १ माधवसिंग. १ मीरखां पठाण. १ गाजरखान पठाण. १ हटेसिंग. १ चांदखां. १ खान रस्तखा १ भीमसिंग हजारी. १ मनीखां पठाण. १ खानम्याजखां. १ रूपखान पठाण. १ रूपसिंग. १ शादुल्लाखां. १ शामकाठी. एकूण ६० आसामी.

(१) घे घे मार–वीरश्रीचे शब्द. (२) इराणी कडील पडलेल्या सरदारात –अमृतराव पवार, भिकाजीराम व लक्ष्मण महादेव ही मराठे लोकांची नावे आहेत. याबद्दल का. ना. साने यांनी शंका प्रगट केली आहे.

## २०. दुतर्फा नाश बहूत झाला

येणेंप्रमाणें नामी नामी सरदार दहा पांच हजारांचे व हजार दोन हजारांचे व चारशें पांचशांचे अमित्राकडील ठार पडले व मनसूरअली व सुजातदौला व अबदल्ली व हस्तनापूरवासी यांजकडील लोक पडले, त्यांची गणना लागली नाहीं. अजमासें[1] पठाण वगैरे तीस हजार ठार झाले. दिल्ली-पद बादशाहाचे वकिलांनीं टीप[2] लिहून सदाशिवपंत भाऊंस दाखविली व सदाशिवपंतांकडील वकिलांनीं याद पडल्या लोकांची नांवनिशीवार इराणी व दुराणी व मुख्य बादशाहा दिल्लीपती यांस दाखविली. याप्रमाणें दुतर्फा नाश बहूत झाला.

## २१. 'मराठे बडे जोरदार हटेले'

इराणी अंतर्यामीं हिय्या न सोडितां सुजातदौला व मनसुरअली यांस बोलला कीं, "बम्हननें बडा गजब किया! मराठें बडे जोरदार हटेले! अटपले जातात असें दिसत नाहीं. सलूख करावा ये अच्छा. इस बातमें खुबी है." असें बहूत प्रकारें सांगितलें. त्याजवरून त्या उभयतांनीं सलूखाचें सदाशिवपंत भाऊंकडे सूत्र लाविलें. परंतु सदाशिवपंत भाऊंच्या चित्तांत सर्वथा सलूख करावयाचा नाहीं. त्यांचीं हत्यारें हिसकावून घेऊन देशोधडी लावावे हाच निश्चय. दुसरा अर्थ नाहीं.

## २२. जखमी लोकांची उस्तवारी

पहिले लढाईंत, दुसरे लढाईंत व तिसरे लढाईंत जे जे सरदार नामी नामी व धारकरी व एकांडें हुजरातीचे लोक व शागिर्दपेशा[3] व राजमंडळींचें मानकरी पडले त्यांस तर मुठमाती दिली; व घायाळ जखमी होते त्यांस औषधपाणी तबीबापासून[4] करवावें त्या उस्तवारीस[5] भाऊसाहेब एक महिना लागले. तसेंच दिल्लीपद बादशाहा व इराणी दुराणी व हस्तनापूरवासी इत्यादिक उस्तवारीस लागले. सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव साहेब या उभयतांनीं जखमी लोकांच्या दिवसांतून एक वेळ राहुटीस स्वतः पायउतारा

(१) अजमासे. हे वाक्य नागपूर प्रत व पुणे प्रत २ मध्येच आहे. (२) टीप–नोंद, यादी. (३) शागिर्द–परिचारक, नोकरचाकर, (४) तबीब–शस्त्रवैद्य. (५) उस्तवारी–व्यवस्था.

जाऊन समाचार घ्यावा, याप्रमाणें पंथ चालविला, व जखमा ऱ्या झाल्या त्या शिपायांस पाणी घालून, नवीन बक्षिसें देऊन, संतोष करून हुशार केलें.

२३. दाणा वैरणीकरतां फिकीर

परंतु दाणावैरणीकरितां पेशवे बहादूर मोठ्या फिकिरींत पडले. लष्करा-भोंवतीं दोनशें कोस उजाडीं पडली. उपाय चालेनासा जाहाला. शत्रूच्या लष्करांत यमुने पलीकडून हर जिन्नस येत होता. कांहीं तोटा नव्हता. सदाशिवपंत भाऊंस मात्र मोठें संकट पडलें. त्याकाळीं गोविंदपत बुंदेले मामलेदार प्रांत सागर निसबत पंतप्रधान यांनीं खजिना व दाणा मरून समागमें फौज रखवालीस पंधरा हजार घेऊन खाविंदाचे कुमकेस जावें असा सिद्धांत करून निघाले. ही बातमी शत्रूच्या लष्करांत दाखल होतांच पाळथ राखून, शास्तेखां[1] जुलपुकरखां हे दोघे सरदार पाठवून, यमुनापार होऊन सूर्योदयाचे समयीं एक रात्रींतून चाळीस कोस येऊन छापा घातला. तेथें मोठी लढाई झाली. परंतु बुंदेले यांजकडील फौज बेसावध होती याजमुळें गिलचानें लढाई देऊन पंत मशारनिल्हेचें शीर कांपून नेलें, आणि ताटांत घालून भाऊ-साहेबांकडे नजर पाठविलें. त्याचें वर्तमान असलें वाईटपणाचें भाऊंनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून केवळ कंबरच बसली. बुंदेले यांचीं स्त्री समागमेंच होती तिनें प्रेताबरोबर सहगमन केलें. आणि दिवसेंदिवस अन्न मिळेनासें जाहलें. चार चार फांके[2] पडूं लागले. घोड्यांस दाणा वैरण अगदींच मिळेनाशी झाली. मग महर्गतेची वार्ता त्यांणीं[3] श्रवण करून सलूखाची वार्ता व युद्धाची तयारी करणें ही गोष्ट अगदींच टाकिली. चलबिचल न करितां थंड राहिले. भाऊसाहेब मोठ्या संकटांत पडले, तीन उपोषणें सारे लष्करास घोड्यामाणसासुद्धां पडलीं.

२४. 'या हट्टानें सर्व लयास गेलें. कांही आहे तेंही जाणार.'

तेव्हां मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व संताजी अटोळे वगैरे लहान थोर मिळून सदाशिवपंतांपाशीं विचार करावयास आले. तों सदाशिवपंत भाऊ व

(१) ही नांवे चुकली आहेत. अताईखान व करीमदादखान यांना पाठविले होते. (२) फाक–उपास (३) त्यांणीं–शत्रूने.

विश्वासराव साहेब बिचव्यांत[1] बसले होते. तेथून कचेरीचे डेऱ्यांत येऊन खलबतास बसले. तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं, "आज सव्वा महिन्यांत तवाई सर्वांनीं सोसली. अन्नपाण्यावांचून घोड्यांमाणसांचे प्राण जातात. पुढें महाराज काय तजवीज सांगणें ती सांगावी! अन्नावांचून हात पाय सुजले. तरवार कोणत्या रितीनें करावी? साहेबीं[2] आजपर्यंत यश संपादून शत्रू पादाक्रांत केला. आतां सर्व दौलत बुडवून नाश आरंभिला. दुसरें कांहीं एक नाहीं. विनाशकाळासारिखी तुमची बुद्धी झाली. आपणांबरोबर आम्हां सर्वांचीं घरें बुडतात. आमचीं रांडापोरें आमच्यां डोळयांदेखत इराणी घेऊन जातो, असा समय प्राप्त जाहला. तुमचे बुद्धीस भ्रंश झाला, म्हणून आपण तिळमात्र कोणाचें ऐकत नाहीं. उगीच हेका केला तो या समयीं फळास आला. सारांश आपण सर्वांचें मान्य करून सलूख करून देशीं गेलों म्हणून गांडू जाहलों असा अर्थ नाहीं. या हट्टानें सर्व लयास गेलें कांहीं आहे तेंही जाणार. नकळे ईश्वराचा महिमा! होणार [ त्या ] सारखी बुद्धी उत्पन्न होते. विचार हरल्यामुळें नैषधास व श्रीरामचंद्रजीस अपाय घडला, तसा प्रकार आपणासही घडोन आला. तुम्हांस श्री सांबानें अजरामर ऐश्वर्य दिलें असतां, भाऊसाहेब! तुम्हीं बुडविलें. आज तो प्रसंग प्राप्त झाला. सुबुद्धी सांगतां तुम्हांस श्रम वाटतात. पुढें कर्माची गती दुस्तर ओढवणार त्यासारखें घडोन येतें. 'होणार तें कधी चुकत नाहीं,' ऐसी वडिली म्हण आहे. ते वेळेस जनकोजी शिंदे यांणीं दृष्टांत दिला कीं, "रावणास श्री सांबानें चवदा चौकड्यांचें राज्य करणें म्हणून वर दिला असतां, श्रीसीता-देवी आणिल्यामुळें सर्व राज्य बुडविलें. बिभीषण आणि कुंभकर्ण वगैरे मंडळींनीं मंडोदरीसुद्धां सीता देण्याविषयीं उपदेश केला. परंतु कोणाचें न ऐकतां लक्ष पुत्र व सव्वालक्ष पौत्र व ऐंशी सहस्र स्त्रियांसहित कुलक्षय केला. त्याचप्रमाणें भाऊसाहेब! तुम्ही केलें." त्याजवर मल्हारराव होळकर यांणीं दृष्टांत दिला जे, "द्वापारयुगीं राजा दुर्योधन शत बंधूसहित राज्य करीत असतां द्रौपदीमुळें सर्व राज्य लयास गेलें. ते काळीं व्यासांनीं व विदुरांनीं व श्रीकृष्ण परमात्मा यांनीं बहूत प्रकारें सांगितलें. परंतु राजाचें म्हणणें कीं,

(१) बिचवा–लहान तंबू काठी नसलेला. (२) साहेबी–स्वामींनी.

'सुईच्या अग्रीं मृत्तिका देणार नाहीं.' या हट्टामुळें मार्गशीर्ष[1] वद्य ३० अमावास्या सांयकाळीं राजा दुर्योधन गदायुद्धांत पडून राज्य हारविलें. तसेंच भाऊसाहेब ! आपणांस घडून येतें असें दिसतें. आतां अंत राहिला नाहीं. तुमच्या लष्करची खराबी इराणीस कळली. आतां सर्वस्वीं बुडवितो. काळ-चक्रांत सर्व पडलों. उत्तम गोष्ट बनून न आली. पहिल्यानेंच सलूख संपादिला नाहीं, आतां इराणी तुम्हांस खातरेंत आणीत नाहीं. हेका केल्यामुळें दौलत सारी बुडाली. या समयीं या ठायीं श्रीमंत राजश्री नानासाहेब असते तरी कसच्या गोष्टीचा हेका न करिते. तुम्ही प्राणानिशीं जातां. तुमचे चित्तांत असें येत असेल, इराणीचा मजकूर किती ? मारून धुडकावून देऊं ! ही गोष्ट सांगतां खरी, परंतु तो प्रसंग आतां नाहीं. हा जीव तुमचे अन्नाचा या प्रसंगीं खर्च जाहाला असतां चांगला, परंतु अगोदर अन्नावांचून डोळ्यापुढें अंधाऱ्या येतात. तेव्हां युद्धाची उमेद कशी धरावी ? आतां जीवित्वाची तमा धरून रांडापोरें वांचतात असा अर्थ नाहीं. तुम्हीं सर्वांचा घात केला. आपल्या हातें सर्व वैभव बुडविलें. आमच्या डोळ्यांदेखत आमची रांडापोरें गिलचा बाटवितो तें दुःख प्रत्यक्ष दृष्टीनें पाहावें. आपण आपला कुटुंबघात आपल्या देखत करून उद्यांच्या लढाईंत आम्ही सर्व प्राणांनिशीं गेल्यानें आपली स्वारी फत्ते होते कीं काय ?"

२५. **'सत्कीर्ती करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे ?'**

अशा प्रकाराची सर्व समुदायाचीं उत्तरें जिकिरीचीं[2] रायांनीं ऐकून घेऊन प्रतिउत्तर दिलें कीं, "होणारास उपाय काय ? कोणीं आपण आपलें अनिष्ट चिंतीत नाहीं. दैवगतीनें घडून आल्यास उपाय कोणाचा ? यश किंवा अपयश महाराज छत्रपतींकडे आतां शरीर तृणप्राय मानून, मर्दुमीचा हिय्या न सोडितां, समशेरीची शर्थ करून दाखवावी. कौरव पांडव सकल सेनेसहित

(१) मार्गशीर्ष वद्य या ऐवजी नागपूरप्रत व पुणेप्रत २ मध्ये 'या कुरुक्षेत्री हाच मास हाच दिवस विक्रमनाथ संवत्सर पौष शुद्ध ८' असे शब्द आहेत. का. ना. साने म्हणतात, 'कौरव–पांडवांच्या युद्धास मार्गशीर्ष शुद्ध १५ च्या सुमारास प्रारंभ होऊन पौष शुद्ध ३ स दुर्योधन पडला, असे भारतावरून होते.' (२) जिकिरीची–असहायतेची.

कुरुक्षेत्रीं धारातीर्थी सुस्नात झाले, तदनुरूप आपणही व्हावें. या परता पराक्रम कोणता ? सर्व सत्ता श्रीकैलासनाथाची ? त्याप्रमाणें घडून येतें. दूषणें लावितां तीं प्रमाणच. गेल्या गोष्टी पुढें येतात असें नाहीं. प्रस्तुत पुढची विचारणा चित्तांत आणून यश छत्रपतींचें सांभाळावें. हें यश तुम्हां समस्तांचें आहे ? निदान समयसागरतारक पिनाकपाणी आहे, मग इराणीची तमा ती काय ? आतां भय धरल्यानें काय होतें ? श्रीसांबकृपेनें इराणीस मारून गर्दीस मिळवून देऊं. सत्कीर्ती करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे ? उद्या सर्वांनीं खंदकपार होऊन मारतां मारतां कटून मरावें. या भूषणापरतें दुसरें काय आहे ?" हा निश्चय सदाशिवपंतांनीं करून लहान थोर सरदारांची क्रिया[१] घेऊन सर्वत्रांस विडे देऊन बोळविलें.

## २६. भाऊसाहेब व विश्वासराव यांची भाषणे व प्रतिज्ञा

नंतर विश्वासराव साहेब सदाशिवपंत पुरंदरे व महिपतराव चिटणीस व बाबा फडणीस यांचे चिरंजीव नाना फडणीस व अप्पाजी जाधवराव व अंताजी माणकेश्वर व रामाजी अनंत दाभोळकर व समसेर बहादर व सदाशिव अप्पाजी पागे दिमत सुलतानखां वगैरेचें ममतेचें मंडळ एकांतीं घेऊन त्यास विचारलें कीं, " समय तर तुटक व दुर्घट प्राप्त झाला. प्राणावर येऊन बेतली. होणार तेंच घडून येतें. चिरंजीव विश्वासरावसाहेब, तीर्थस्वरूप नानासाहेबांचे व सौभाग्यवती गोपिकाबाईंचे प्राणांचेही प्राण ! अगोदर विश्वासराव साहेब यांस आमचे बरोबर पाठवीत नव्हतीं[२] सौभाग्यवती गोपिकाबाई साहेबांनीं माझे मनोधारणास्तव [ पाठविलें व ] विश्वासराव साहेब आमचे ममतेस्तव हेंका करून स्वारीस आले. आणि आतां तरि गोष्ट अनुचित बनून आली. विश्वासराव साहेब ! तुमचें वय लहान. तुम्हीं सुखाची जाती तिलप्राय अनुभवली नाहीं. तुम्हांसारखे सगुण पुत्र, उभयतांची ममता तुमचे ठायीं विशेष, असें असतां हें महत्तर अपेश श्रीसांबानें माझे विभागास आणिलें " असें बोलतांच भाऊसाहेबांच्या नेत्रांस पाणी आलें कीं, " रावसाहेब ! तुम्हास मीं मरणाचे घरीं आणिलें. ही गोष्ट सर्वोपरी[३] आमचे

(१) क्रिया–शपथ. (२) नागपुर प्रत– ' नानासाहेब अगोदर विश्वासराव यांस आमचे समागमें पाठवीत नव्हते '. (३) सर्वोपरी– सर्व प्रकारे.

पासून गेली !" ऐसीं भाषणें ऐकून सर्वांस गहिंवर आला. त्याजवर विश्वासरावांनीं उत्तर केलें कीं, "माझे प्राणांविषयी मजला तिलमात्र काळजी वाटत नाहीं. परंतु हा समय आपल्यावर गुजरला. मागें नानासाहेब तुम्हांवाचून घटकाभर प्राण ठेवणार नाहींत ! आपण उभयतां बंधू एक धर्मराज व एक अर्जुन, किंवा एक श्रीरामचंद्र व एक भरत, याप्रमाणें पराक्रमी असतां हा प्रसंग घडून आल्यास श्रीमंत नानासाहेबांची काय गती होईल ती कळेना. तुम्हीं उभयतां बंधू कायम असल्यास माझे सारिखे पुत्र बहुत होतील !" ऐशी उदासपणाचीं भाषणें विश्वासरावाचीं राव भाऊंनीं श्रवण करून विश्वासरावास आलिंगन देऊन बहूत श्रमी जाहाले. भाऊसाहेब म्हणू लागले कीं, "आम्ही तरि सतीचे[1] वाण घेतलें, आतां तुम्हांस ईश्वर साह्य आहे." त्याजबर विश्वासरावांनी उत्तर केलें कीं, "आपण वडील संनिध असतां मला भय काय ? त्यांतून ईश्वरी इच्छेकरून ही गोष्ट बनून आली असतां दुसरा मराक्रम जन्मास येऊन कोणता करावा ? आतां प्रतिज्ञा हीच कीं, रूमशामची बादशहात करून रूमशाम येथील सरदेशमुखीच्या वतनाचीं वस्त्रें श्रीछत्रपतींच्या नांवें घेऊन, आजपावेतों हक्काचा ऐवज राहिला आहे तो घेऊन ढाला[2] माघाऱ्या देऊं ! नाहीं तरि जो प्राणी जन्मास आला त्यास तरि मृत्यु आहेच. परंतु या कुरुक्षेत्रीं रणांगणाचेठायीं पराक्रम करून मृत्यू आल्यास दुसरें काय पाहिजे ? याजकरितां मजविषयीं अणुमात्र चित्तांत कांहीं एक आणूं नये. जें ईश्वरानें नेमिलें असेल तें कदापी टळावयाचें नाहीं. मग खेद करावयाचें कारण कोणतें ? नानासाहेबाहून मला तुम्ही वडील अधिक ! त्यापेक्षां श्रमी होऊं नये. तेव्हां समस्त सैनिकांस निश्चयात्मक कळलें.

### २७. लढाईस तयार

ते दिवशीं सदाशिवपंतांनीं व विश्वासराव यांणीं कडकडीत निश्चक्र[3] केलें. उदकही घेतलें नाही. रात्रीचे ठायीं विश्वासराव साहेबांनीं व राव भाऊंनीं साखर, बतासे, फळफळावळ मात्र भक्षिली. तों मध्यरात्रीचा समय

(१) सतीचे वाण– दृढ प्रतिज्ञा. मरावयास सिद्ध होणे. (२) ढाला– निशाणे. (३) निश्चक्र– 'उपवास' पाठ.

जाहला तीन प्रहरांचा समय होतांच उभयतांनीं निद्रा संपादिली. कांहीं निद्रा लागली न लागली एवढ्यांत जागृत होऊन, शौचविधी करून, मुखप्रक्षालन करून खिजमतगारास आज्ञा केली कीं, नकिबास बोलावणें करून हुकूम द्यावा कीं, लहान थोर सरदारांनीं तयार होऊन लढाईस चलावें. याप्रमाणें नकिबांस ताकीद होतांक्षणींच ते संपूर्ण सैन्यांत फिरून, ताकीद करतांक्षणीं सर्व सरदार लहान थोर एकदील होऊन झिलेपोस सरंजामानिशीं तयार जाहाले.

## २८. 'आजचा निदान समय'

तदनंतर विश्वासराव साहेब व भाऊसाहेब या उभयतांनीं तैलाभ्यंग करून मंगलस्नानें केलीं. देवतार्चनें संपादून, फलाहार अल्प करून, पिकले पानांचे विडे घेऊन, जामदारखान्यांत[1] जाऊन, रणांगणींचीं पीत बस्त्रें घेतलीं. शिरपेंच व तुरे व चौकडे व बाजूबंद, व मोत्यांच्या कंठचा व शस्त्रास्त्रें ठायीं ठायीं बांधून तरकसकमाना हातीं घेऊन सज्ज झाले. नंतर निशाण बारदारांनी[2] निशाणें घेऊन नगारा नौबदी करून एकदांच गर्जना केली. तेव्हां भूमंडळ[3] नादेंकरून तुंबळ जाहालें. तेणेंकरून रणरंगधीरांस वीरश्रीची स्फुरणें आलीं. प्रातःकाळ होतांच दुसरा नगारा जाहाला. तेव्हां तमाम सरदार तयार होऊन येऊन, सदाशिवपंतांस मुजरे करून आपआपले घोड्यावर स्वार जाहाले. भाऊसाहेबांनीं मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड यांस सन्निध बोलावून आणून सांगितलें कीं, "आजचा निदान समय, शंभर वर्षें पूर्ण भरलीं. आणि आज सतीचें वाण घेतलें. त्यापुरती दुसरी गोष्ट अणुमात्र चित्तांत आणूं नये. तुम्ही पुरातन कैलासवासी रावसाहेब[4] व आपासाहेब यांचे वेळचे यख्त्यारीं[5] आहां. आजपर्यंत अन्न भक्षिलें त्याचें आज सार्थक करून दाखवावें. स्वर्गीं रावसाहेब व आपासाहेब भलें म्हणतील तें कर्म करावें! रायांनीं[6] दौलत सुद्धां आम्हांस

(१) जामदारखाना–वसनागार. (२) निशाण बारदार–निशाण धरणारा. (३) पुणेप्रत–नभमंडळ. (४) रावसाहेब–बाजीराव, आपासाहेब चिमाजी. (५) यख्त्यारी–अधिकारी. प्रमुख सरदार. (६) रायांनी–बाजीराव चिमाजीआप्पा यांनी.

तुमच्या हवालीं करून कैलासभुवनास गेले. त्या गोष्टीची शरम तुम्हांस असावी. यश किंवा अपयश हें तुमचें तुम्हीं सांभाळावें।" म्हणून भाऊसाहेबांनीं सर्वांस पदर पसरून सांगितलें. तेव्हां होळकरादि सरदार यांनीं उत्तर दिलें कीं, "आम्ही जीवित्वाची तमा धरीत नाहीं ! महाराजांचें पुण्य आमचे मस्तकीं असतां इराणीची विशाद काय ? मारून गर्दीस मिळवून देऊं. आपण कांहीं चिंता न करावी." याप्रमाणे बोलून मुजरा करून आपआपल्या मिसळेस[१] उभे राहिले.

## २९. खंदकपार जाहाले

पेशजी इराणीनें शुभ्र कुंजर भाऊसाहेबांस दिला होता तो ऐरावतातुल्य भयंकर, दुसरा शामसुंदर गज कज्जलप्राय शूरत्वांत आगळा रणरंगधीर, तिसरा गजानन बक्ष. हे तीन हत्ती शृंगारून आणून उभे केले. पंचरंगें करून चित्रविचित्र शुंडादंड मस्तकावर रेखिले व बादली पाखरा गजपृष्ठीवर घालून सुवर्ण मंडित पिपळवनें मुक्तलडांच्या[२] झालरी व गळ्यांत रुप्याच्या घंटा व रुप्याच्या वांकी, तोडर पायीं रुप्यासोन्याच्या अंबाऱ्या हत्तींवर ठेवून चौफेर मोत्यांचे घोस लाविले. ते मदोन्मत्त वारण विलोकितां केवळ सुरेश्वराचे ऐरावत भासले. रणरंगधीर[३] गजावर सदाशिवपंत भाऊ आरूढ जाहाले व गजानन वक्षावर खांसे विश्वासराव साहेब स्वार जाहाले, व शुभ्रवर्ण गजबक्षावर जरीपटका ठेविला. तिसरी नौबत करवून, भीमा ऐशी गर्जना करून खंदकपार जाहाले. पुढें बाणांच्या खोंचेचे[४] तफावतीनें उभे राहिले; व संपूर्ण सरदार लहान थोर भाऊसाहेबांजवळ येऊन फिरून मुजरे केले. सर्वांचे[५] मुजरे घेऊन सेनासमेत उभे राहिले. भाऊसाहेब यांनीं सारी सेना गोचर केली. तों फौज असंख्यात, नजर पुरेनाशी झाली. तेव्हां भाऊसाहेबांनीं मल्हारजी होळकर यांस विचारलें की, कोणते तऱ्हेनें सैन्याचा विभू रचावा ? शत्रू आपले कबजांत कोणते तऱ्हेनें आणावा ? एकदांच चालून

(१) मिसळेस–नेमलेल्या जागी. (२) मुक्तलगाच्या–पाठभेद. (३) पुणे १ व भिवडी प्रत– एकदा रणरंगधीर एकदा रणवीर असे नांव आढळते. (४) खोंच– मारा. (५) सर्वांचे– हे वाक्य पुणे प्रत १ व भिवंडी प्रतयांत नाहीं.

घ्यावें किंवा तीन टोळ्या कराव्या ? कोणते टोळीस कोण नेमावा ? याचा विचार सांगावा." त्याजवर मल्हारजी होळकर यानीं विनंती केली कीं, "फौजेच्या तीन टोळ्या कराव्या." डावे बाजूस विश्वासराव साहेब यांजकडे लोकांच्या नेमणुका जाहाल्या. तपशील मोठे मोठे नामांकित सरदार असामी:--

१ यशवंतराव पवार. १ संताजी आटोळे. १ जंगी समशेर. १ जिवाजीपंत. १ गोविंदराव निंबाळकर. १ गोविंदराव व्यंकटेश. १ दत्ताजी वाघ. १ संकाजी वाघ. १ बुधकर मंडळी. १ फिरंगोजी पवार. १ चिमणाजी माधवराव. १ सोनजी भापकर. १ व्यंकाजी मोहिते. १ हिराजी पवार. १ भगवंतराव रणदिवे. १ धारराव पाटणकर. १ यमाजी बांडे. १ मानसिंगराव मुळे. १ मायाजी बाडगेकर. १ चिमणाजी जनार्दन. १ सदाशिव विष्णू[१] १ चिमाजी मोहिते. १ हसनखां. १ फरदुल्लाखां. १ रहिमतखां. १ कमालखां. १ चंदूखां[१]. पायदळ, १ फूट पथके. १ सफेजंग जमादार. १ मीरबेग. १ हसनखान. १ बडेखां. १ सुजातखां. एकूण ३४ आसामी.

सदर्हूप्रमाणें जाहाल्या. यशवंतराव पवार पंचवीस हजार फौजेनिशीं केवळ महाभारतींचा वीर, नामांकित, जगत्प्रसिद्ध, ज्याच्या पराक्रमाचा लौकिक वडिलोंवडिलीं सरकार-चाकरी करून संपादीतच आले. याप्रमाणें नामी नामी सरदार व धारकरी मिळोन एकंदर राऊत चाळीस हजार. शिवाय पायदळ इभ्रामखां गाडदी यांजकडील, प्रमुख सफेजंग जमादार व हसनखां व फरदुल्लाखां व चंदूखां वगैरे गार्दी लोक पंचवीस हजार व फूटपथके पांच हजार एकूण[२] विश्वासराव साहेबांचे टोळीस फौज सत्तर हजार.[३] दुसरी टोळी सदाशिवपंत भाऊ खांसे अंबारींत बसून[४] [अंबारीच्या] खांबास नवरत्नांचे

(१) नागपूर प्रत—सदाशिव विष्णू वगैरे फूटपथके (२) नागपूर प्रत—'एकूण फौज घेऊन विश्वासराव खांसा गजपृष्ठावर आरूढ होऊन वामकटी चापबाण आकर्षण करून वीरश्रीतकें उभे राहिले.' (३) नागरपूर प्रत—यापुढे 'सव्यभागीं' असा शब्द आहे. (४) नागपूर प्रत- बसून हाती शरचाप घेऊन ठाण मांडिले.

फर्श[१] बांधिले कारण कीं, संपूर्ण वसुंधरेचें राज्य करीन किंवा इंद्रपदीचें घेईन ! अंबारींत[२] बसतांच सर्व शरीर लाल झालें व नेत्रही आरक्त झाले. त्या समयीं भाऊ कसा भासला कीं केवळ कल्पांतींचा आदित्य ! याप्रमाणें भयानक दिसूं लागला. त्या वेळेस कोणाच्यानें पाहावेनासें झालें. हा केवळ कलियुगीं कर्ण जन्मला यांत संदेह नाहीं. सभोवतीं फौज ५० हजारांचा गलोल घेऊन मध्यभागीं इराणीसमूर परम आवेशें उभे राहिले. तिसरी टोळी तपशीलवार असामी बितपशील:–

| | |
|---|---|
| १. जनकोजी शिंदे. | १. समशेर बहादूर. |
| १. दमाजी गायकवाड. | १. किरकोळ पथक. |
| — | — |
| २ | २ |

—
४

सदर्हूप्रमाणें जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व समशेर बाहादूर व किरकोळ पतके मिळोन साठ सत्तर हजार घोडेस्वार, याप्रमाणें जमाव करून उभे राहिले. याप्रमाणें तीन टोळचा करून निशाणें सोडून, जुंभस न खातां उभे राहिले. श्रीमंत भाऊसाहेबांची स्त्री सौभाग्यवती पार्वतीबाई-साहेब व इतर सरदारांचे कबिले[३] व बुणगेबाजार[४] यांचे संरक्षणास मल्हारराव होळकर दहा हजार फौजेनिशीं मागें ठेविले.

### ३०. दुराणीच्या तीन टोळचा

हें पाहून इराणी दुराणी व दिल्लीपत बादशाहाकडील व सुजातदौले व मनसूर अली यांणीं आपले गोठ सोडून, फौजेच्या पुस्तपन्हा[५] राखून, त्यांनींही तीन टोळचा करून, लढाई प्रसंगास खांसा इराणी मध्यभागीं सत्तर

(१) फर्श–परशु. का. ना. साने म्हणतात, 'सदाशिवराव हा परशुरामाचा अवतार असे म्हणत असत. परशुरामाचे मुख्य शस्त्र परशु हे होय. (२) अंबारीत–उभे राहिले या वाक्यांबद्दल पुणे प्रत १ व भिवंडी प्रत यात 'याप्रमाणें दीडलक्ष फौजेनिशी उभे राहिले' हे वाक्य आहे. (३) कबिले–स्त्रिया (४) बुणगेबाजार–गैरलढाऊ माणसे. (५) पुस्तपन्हा–पाठबळ.

हजार फौजेनिशीं व डावेकडे मनसूरअली चाळीस हजार फौजेनिशीं व उजवेकडे सुजातदौले व हस्तनापुरवासी इसाफतखां, येणेंप्रमाणें दीड लक्ष फौजेनिशीं उभे राहिले. खांसा अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं मागें गोठांत राहिला. दोघे पुत्र मात्र पुढें आले होते त्यांचीं नांवें, एकाचें नांव तेजूरशाहा व दुसऱ्याचें नांव नजीमखां. यांजवळ रोहिले यांची खांसी खांसी जमेत[1] एकदिलाची होती. त्यांतून तेजूरशाहा यांनीं पन्नास हजार फौजेनिशी दिन् ! दिन् ! म्हणून नीट चालून घेतलें.

### ३१. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली

तेव्हा युद्धास तोंड[2] लागलें. दारुण संग्राम जाहाला; हवद्यांस हवदे, राउतांस राऊत, एकमेळ जाहाला; व सुतरनाले बाणाच्या कैंच्या व करोलाच्या[3] गोळ्या व गरनाळा व तोफांचा मारा एकदांच जाहाला. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली. धुरेंकरून दिनमणींचा अस्त झाला असा भास पडला. घे घे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना. पुढचा पाय पुढें. कोणास कोणी हरेना. एका परीस एक आगळे. इराणीची जात अरबुज[4] आपपर म्हणावयाची नाहीं. महाबळी, महापराक्रमी, मोगल, पठाण व रोहिले रांगडे व रजपूत व पंजाबी, बिलंदे[5] माळवी व काठेवाडी वगैरे नाना जातीचे, त्यांनीं संग्रामाची सीमा केली. बहूत मराठे–दळ खपलें. रक्तोदकाचे पाट रणभूमीस वाहूं लागले. बीभत्स शरिरें दिसों लागलीं. देहाभिमान कोणांत उरला नाहीं. चौफेर लढाईची बेहद्द होऊन गेलीं. थोर थोर अमिरांचे हौदे खालीं[6] जाहाले. इराणी हांवभरी होऊन फिरून नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां मराठी फौज कच खाऊन माघारी सरली.

### ३२. रणमद चढला

तें पाहातांच भाऊसाहेबांनीं फौजेसुद्धां आपला अंबारीचा हत्ती फौजेंत

(१) जमेत–समुदाय. नागपूर प्रत–जमेत ५० हजारांची. (२) तोंड लागणे–प्रारंभ होणे. (३) करोल–बंदुका. (४) अरबुज–रानटी, (५) बिलंद–अट्टल–विशेषणाचा विशेषनामासारखा उपयोग. (६) खाली होणे–रिकामा पडणे.

लोटला. तेव्हां डावी टोळी विश्वासराव साहेबांची होती, ती बेजरब[1] उठली. उजवेकडून जनकोजी शिंदे कमरग्यांत शिरून मोठी मारामार जाहाली. शरसंधान अगदींच राहिलें. निमचे[2] व समशेरा चालूं लागल्या. तीन चार तासपर्यंत एकच घाई शस्त्रसंधानाची झाली. मुर्द्यांवर मुर्दें पडूं लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखेनासे जाहाले. वीर रणामध्यें माजले. रणमद चढला. खांशा खांशांचें हौदे एकास एक लागून जोरावारीनें लढो लागले. केवळ दशाग्नी[3] शताग्नीशीं मारूं[4] लागले. ते समयीं सदाशिवपंत [ यांणीं ] अंबारींतून उतरून, दोहों हातीं पट्टे घेऊन, नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां नामी नामी सरदार व धारकरी नांवाबिनावांचे यांणीं जीवित्वाची तमा न धरितां बेलाशक हैदोसच[5] केला. कोणास क्षतें वर्मीं लागलीं, ते विष्णुलोकास गेले. व कोणी रणांगणीं मूर्च्छित पडले व कोणांचीं शिरें तुटोन धडांवेगळीं झालीं. व कोणांची उदरें फुटोन अंतरमाळा[6] लोंबूं लागल्या. परंतु अणुमात्र कोणीं लढाईविषयीं कसर केली नाहीं. एकच गर्दी होऊन गेली. खांसे विश्वासरावसाहेब अगदींच गर्दीत गर्द होऊन गेले. सदाशिवपंत पायउतारा होते ते घोडयावर स्वार होऊन सैन्यांत मिसळले. मोठी तरवार करून विश्वासराव साहेब अंबारीसुद्धां संभाळून माघारे आपले जमातींत पाठविले. परंतु कायम आहेत किंवा वैकुंठवासी जाहाले याचें वर्तमान पुरतेपणें लागलें नाहीं. आपण तसेच पुढें चालून गेले. तेथें नामी नामी लोक दोन हजार ठार पडले. इराणीनें नामोहरम[7] होऊन पाठ[8] दिली.

---

(१) बेजरब-बेधडक. (२) निमचा-लहान तरवार. (३) दशाग्नी शताग्नी-याचा बरोबर अर्थ समजत नाही. 'दशघ्नी शतघ्नी अशा शस्त्रांनी मारू लागले किंवा दहा दहा गोळ्या (अग्नि) शंभर शंभर गोळ्या लागून मरू लागले' असा कदाचित् अर्थ संभवेल–का. ना. साने. (४) पुणे प्रत २ सोडून इतर सर्व प्रतीत 'मरूं लागले' असें आहे. (५) हैदोसच केला याबद्दल नागपूर प्रतीत 'चालून घेतले. रक्तांवर लोक झाले' असे आहे. हैदोस-विध्वंस. (६) अंतरमाळा-अंत्रमाळा आंतड्यांची वेटोळी. (७) न.मोहरम–पराभूत. (८) पाठ देणे–पळून जाणे.

## ३३. कलियुगीं असा योद्धा कोणी जाहाला नाहीं

त्या युद्धांत इकडील व तिकडील एकंदर चाळीस हजार लोक कामास आले. खेरीज केवळ जखमी लोक दहा हजार. याप्रमाणें युद्ध जाहालें. या मागें या कलियुगीं असा योद्धा कोणी जाहला नाहीं. पुढेंही होणें जरूर.[१] भारती युद्धासमान सदाशिवपंतांनीं युद्ध केलें. या कलियुगीं मानवकृतींत ब्राह्मणकुळांत जन्म घेऊन पराक्रम थोर केला. धन्य त्यांची जननी कीं असा पुत्र प्रसवली ! येणें करून सप्त पुरुष उद्धरून विष्णुलोकास गेले. धन्य त्या पुरुषाचा पिता ! त्यास साम्यता दशरथाची, किंवा पंडूची ! चिमाजी आपाची धन्य कीं हा पुत्र रामाप्रमाणें निर्माण जाहाला ! हें युद्ध पाहून स्वर्गी इंद्र व देवगण व गंधर्व स्तुती करूं लागले कीं मानवी होऊन, जातीचा विप्र असतां, प्रताप कर्णाप्रमाणें केला !! केवळ राम रावण यांच्या युद्धा समान युद्ध झालें. इराणीकडील लोक तीस सहस्र कामास आले व आठ हजार जखमी जाहाले. शिवाय घोडीं वीस हजार, उंटें सातशें व हत्ती दोनशें. येणें-प्रमाणें अमित्राकडील तळावर राहिले. भाऊसाहेबांकडील नामी सरदार व धारकरी, एकांडे हुजरातीचे लोक वीस हजार ठार पडले. शिवाय उंटें पांचशें व घोडे पंधरा हजार व हत्ती नग सव्वाशें ऐसा संग्राम जाहाला[२], मुख्य अवदल्लींचा पुत्र तेजूरशाहा बहादर व नजीमखां वगैरे मातबर पठाण व रोहिले हक्क[३] होऊन गेले. खांसे सुजातदौले यास चार जखमा जाहाल्या. इराणीचे फौजेनें शिकस्त[४] खाऊन माघारी फिरली. अवसान[५] अगदीं खत्ता[६] जाहलें. भाऊंनी सेना-सहित पिच्छा पुरविला आणि इराणीच्या गोठांत फौज नेऊन घातली. एकीकडे पठाणांची टोळी होती ती नेस्तनाबूद केली. सदा-शिवराव भाऊ अभिनव यश पावले. आनंदसागरास पारावार नाहीं. शत्रू पराभवातें पावून, भाऊसाहेब व विश्वासराव साहेब उभयतां आपआपल्या अंबारींत बसून, महागर्जना करून रणतुरें[७] व नौबती आणखी जय-वाद्यें

(१) जरूर–कठीण. (२) पुणे प्रत १ व भिवंडीप्रत–' एकूण लढाया चार ' असें यापुढे आहे. (३) हक्क होणें–पतन पावणे. (४) शिकस्त खाणें–पराभूत होणे. (५) अवसान अगदी..यश पावले–ही वाक्ये पुणे प्रत १ व भिवंडी प्रत यात नाहीत. (६) खत्ता–नाश. (७) रणतुरा–रणवाद्य.

बाजवीत आपले गोटांत चालिले. एकच सिंहनाद झाला. त्यांची[1] फौज शिकस्त खाऊन मागें गेली.

### ३४. विश्वासराव वैकुंठवासी

त्या संधींत मागें अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं आपले गोटांत तयारच होता. त्याचे पुत्र उभयतां लढाईंत हक्क जाहाले, त्यांचें वर्तमाव श्रवण करून वाईटपणाचें ऐकतांच अबदल्ली यानें फौजेसहवर्तमान या अल्ला! या खुद्दा! या रहिमान! याप्रमाणें देवाचा धांवा करून, जीवित्वाचा संकल्प सोडून, एकदांच वाद्यें वाजवून फिरून सदाशिवपंतांवर चाल केली. तेव्हां भाऊसाहेब यश संपादून आपले गोटांत जात होते. इतक्यांत शत्रू पाठीवर आला, हें वर्तमान कळतांच महातास सांगून खाशांचे हत्ती माघारे फिरविले. तें संपूर्ण फौजेनें पाहून सर्व लढाईच्या प्रसंगें नीट चालिले. लढाई सुरू होतांच विश्वासराव साहेब अंबारींतून तिरंदाजी करीत होते, एवढ्यांत कोणी दुष्टानें बंदुकीची जोडगोळी घातली. ती हृदयापार होतांच विश्वासराव साहेब लागलेच वैकुंठवासी जाहाले. तेव्हा त्या महातानें व जो खवासखान्यांत[2] चौरीबारदार[3] होता त्यानें कमरेचा दुपेटा काढून, विश्वासराव साहेबांस अंबारीचे खांबाशीं दृढ बांधून बसलेचे बसले तीर कमाणी सुद्धां तसेच ठेविले. पुढें लढाई होतच होती. या आकांताचें वर्तमान उजवे बाजूस भाऊसाहेब होते त्यांस विदित जाहालें.

### ३५. भाऊसाहेबांस परम दुःख.

नंतर भाऊसाहेबांनीं आपला अंबारीचा हत्ती खालीं बसवून, विश्वासराव साहेब यांचे हत्तीजवळ जाऊन, तो हत्ती बसवून, रायाचें शरीर छिन्नभिन्न जाहालें होतें. तें दृष्टीनें पाहून परम दुःख जाहालें. तें पत्रीं लिहिणाराची

(१) पुणे प्रत२–'येथपासून तो ती उपलब्ध आहे तेथपर्यंत अगदी निराळा मजकूर आहे. हिचा व दुसऱ्या तीन प्रतींचा येथपासून मुळींच मेळ पडेना, सबब तो मजकूर स्वतंत्रपणे पुढे देऊं.' असे का. ना. साने यांनी म्हटले आहे व शेवटी तो मजकूर घातला आहे. (२) खवासखाना–अंबारीच्या पाठीमागें खिजमतगाराची उभी राहण्याची जागा. (३) चौरीबारदार–चौरी धरणारा.

कल्पना[1] कुंठित जाहाली. श्रीराम अयोध्यापूर सोडून वनवासास जावयास सिद्ध जाहाले, तें वर्तमान ऐकतांच दशरथानें कैकेयीच्या मंदिरांत अंतर्धान केलें, तसेंच भाऊसाहेबांस जाहालें. तेव्हां मल्हारजी होळकर यांस आज्ञा जाहाली कीं, 'तुम्हीं पुण्यास जावें. बरोबर आमचें कुटुंब व इतरांचे कबिले घेऊन जाऊन, श्रीमंत नानासाहेबांस व[2] श्रीमंत सौभाग्यवती गोपिकाबाई-साहेब यांस माझे साष्टांग नमस्कार सांगून विज्ञापना माझ्या तर्फेनें करावी. "तुमचे चिरंजीव विश्वासराव साहेब व भाऊसाहेब तीन लक्ष सेनेसहित इंद्रलोकीं सुखरूप आहेत, कांहीं चिंता न करावी. उभयतां वडिलांनीं आज-पासून लोभ चिरंजीव माधवरावसाहेबांवर करीत जावा पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचे हातून संपूर्ण शत्रू लयास जाणार. मी परशुरामअवतार आणि चिरंजीव माधवरावसाहेब केवळ अर्जुनाचा अवतार. आमचा संकल्प यांचे पराक्रमानें परिपूर्ण होणार. याप्रमाणें सांगितलेलें वर्तमान नानासाहेबांस व सौभाग्यवती वहिनीबाईस श्रुत करावें. कदाचित् शत्रूंनीं तुमचा पिच्छा पुरविला असतां आमच्या कुटुंबाचा शिरच्छेद तुम्हीं आपलें हातीं करावा, परंतु शत्रूंचे हातीं जिवंत लागूं देऊं नये." तसेंच जनकाजी शिंदे यांस सदहू अन्वयें निरोपण जाहालें. शिंदे मजकूर यांणीं उत्तर केलें कीं, "मी पुण्यास माघारा जावयाचा नाहीं. खावंद जर माघारे पुण्यास येतील तर मी जाईन. नाहीं तर मी जेथें खावंदाचा जोडा पडेल तेथें माझें शिरकमल पडेल! यांत तिळमात्र अंतर नाहीं." तें ऐकून समागमें स्वारीबरोबर गंगोदकाच्या कुप्या चालत होत्या त्या सदाशिवपंत भाऊंनीं आणवून, खालीं गाशा[3] घालून शेलापागोटें, जामानिमा[4] ढालतलवार सुद्धां सचैल स्नान करून एके कुपीचें उदक प्राशन केलें आणि उत्तर केलें कीं, "आमचे पारणे जाहालें!" मग मल्हारराव होळकर यांस रामराम करून "आतां लोभ असों द्यावा." असें बोलोन हयपान घोडा अर्बी होता, तो आणवून, वर स्वार जाहाले. एव-ढ्यांत होळकर वगैरे यांणीं विनंती केली कीं, "एवढे हट्टास पडावयाचें

(१) नागपूर प्रत–'कलम'– म्हणजे लेखणी. (२) 'व श्रीमंत.. साष्टांग' हे शब्द पुणे प्रत १ व भिवंडी प्रत यात नाहीत. (३) गाशा–खोगीरावरची पातळ गादी. (४) जामानिमा–सर्व पोषाख.

कारण नाहीं. आपण उज्जनीस साल मजकुरीं छावण्या कराव्या, पेस्तर सालीं शत्रू आपण पाहातच आहों. पुण्यास जावयाची खावंदांस शरम वाटेल तर अलीकडे गंगा अथवा नर्मदा अथवा क्षिप्रा एवढ्या स्थळीं मुक्काम वर्ष सहा महिने करून, सर्व सरदार, घोडे, हत्ती व उंट व तट्टें, पायदळ, व तोफखाना यांचे बैल व अवांतर सेना खाऊन पिऊन हुशार होऊन पेस्तर सालीं रूमशामची खबर घेऊं ! हिंदूचे मुसलमान होऊं परंतु छत्रपतीचे नांव राखूं' यांत अंतर नाहीं ! आणि आपण कांहीं पदरचे सरदार यांचें ऐकत जावें. कारण पेशजी साष्टी, वसई कैलासवासी चिमाजी आपा यांनीं फत्ते केली. आणि प्रतिज्ञा मोठीच केली होती, परंतु चौघां सरदारांचे मतें कोणतीही एकादी गोष्ट शेवटास नेत. तसेंच आपण वर्तावें." तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं "चिरंजीव विश्वासरावसाहेब गोळी लागून कामास आले. आतां आपण मोठा पराक्रम जरी करून पुण्यास गेलों तरी सौभाग्यवती गोपिकाबाई साहेब माझे मुखावलोकन करणार नाहींत. कारण त्यांचे केवळ जिवाचे जीव विश्वासराव साहेब ते लढाईत पडले असतां त्या वडिलांचे भेटीस आपण जावे हें अयोग्य.

## ३६. मलकाजमानीचा हुकूम

एवढ्या संधीत मलका जमानीन बिबीसाहेब, दिल्लीश्वराची बादशाहाजादी, हिणें जी फौज रूमशामचे बादशाहाकडून कुमकेस इराणी व दुराणी गिलचे नादिरशाहा व तंबूरशा वगैरे आली होती त्यांस पदर पसरला कीं, "तुम्हीं जर लढाईस कमकसर केली तर दिल्लीचे बादशाह फकीर होऊन देशांतरांस जातात. हें समजून एक वेळ आणखी लढाई रणखंदल[1] करावी, त्यांत खुदानें यश दिल्यास पुन: दिल्लीस जाऊं. नाहींतरि दिल्ली सोडून परागंदा होऊं. तुमचे लष्करासन्निध उतरलों आहों. मुसलमानी बादशाहीची शरम ठेवून बेजरब लढाईस भिडावें. बारग्यांची फौज दरवर्षी येऊन बादशाहास इजा देऊन, घासदाण्याचे ऐवजीं खंडण्या घेतात, आणि रात्रंदिवस बादशाहा दिलगीर होतात, हें दुःख सोसवत नाहीं. आपण बादशाहत करूं अथवा

(१) रणखंदल–निकराची लढाई.

बारगे करतील, हाच संकल्प !" तेव्हां सरदारांनीं तसलिमात[1] करून, बिबीसाहेबांचा हुकूम घेऊन, एकदांच घोडयांच्या अनीना[2] उठवून मोहळाच्या माशा उठतात त्याप्रमाणे सर्वत्रांनीं उडी घातली. तोफा व बंदुका आणि बाणांचा कैच्या व गरनाळा आदि करून अगदींच राहिल्या. तरवार चालती जाहाली.

### ३७. कल्पांतीचा आदित्य

तेव्हां राव भाऊंनीं त्या रोहिल्यांप्रमाणेंच उडी घातली. पहिल्या लढाईच्या वेळेस सव्वा चार लक्ष फौज गणतीस लागली होती. त्या आलीकडेस सर्व सैन्य लढायांत खपून तीस सहस्र घोडा स्वार शिल्लक राहिला. त्या सुद्धां भाऊसाहेबांनीं उडी घातली. तेव्हां [ भाऊ ] केवळ कल्पांतींचा आदित्य भासला. ग्रीष्म ऋतूच्या दिवसांत मेघांचे ढग उठतात आणि विद्युलता चमकून लागलीच नाहींशी होते, त्याप्रमाणें भाऊसाहेबांनीं संग्रामांत उडी घातली ते समयीं सर्वांस दिसले. तिकडील खांसा अबदल्ली व मनसूरअल्ली व सुजातदौले इराणीकडील नादिरशाह, तंबूरशाह, वगैरे उरल्या फौजेसहित त्यांणींही उडी घातली. ते समयीं श्रीहरी त्या अमित्राकडील फौजेस सन्मुख जाहला. श्रीमंत[3] पेशवे बहादूर यांस विन्मुख झाला. याजमुळें सर्व नाश झाला.

### ३८. सूर्य असतांच अंधःकार

हत्ती घोडयांनीं व उंटतट्टांनीं संपूर्ण खंदक भरला. खंदक भरल्यावर जे लोक भिकारी होऊन अन्न अन्न करीत दुसरा वेश धरून पुण्यास आले ते आले. कितीकांचे तोतये जाहाले. हजारों हजार त्या कुरुक्षेत्रीं रणमंचकीं निजलेच राहिले ! पुढें असा संग्राम होणें कठीण आणि अशा पुण्यभूमीस मरणही येणें कठीण. त्यांत धारातीर्थ ! भाऊसाहेब केवळ परशुराम-अवतार, लढाईची या मृत्यूलोकीं कीर्ती करून, मोठमोठ्या शत्रूंची[4] पारिपत्ये करून, मरणकाळपर्यंत

(१) तसलिमात–प्रणाम, नागपूर प्रतीत 'मान तुकावून' असे आहे. (२) अनीना–लगाम. (३) श्रीमंत..विन्मुख झाला–हे वाक्य पुणे प्रत १ व भिवंडी प्रतीत नाही. (४) नागपूर प्रत–शत्रूचे नक्षे उतरून.

नानासाहेबांची आज्ञा न उल्लंघितां, दररिकिबीस तरवार फत्ते तरून, जन्म-प्रभृती जय संपादून शके १६८२ विक्रमनामसंवत्सरीं मंगळवारीं पौष शुद्ध[1] अवतार संपविला. ते दिवशीं मागील चारघटिका दिवसास सूर्य असतांच अंधःकार पडला. रण रात्रीस हा कालपर्यंत घुमत असतें !

### ३९. नानासाहेबांचा शोक

तें तहकीक वर्तमान एक वारनिसाने[2] डाकेबरोबर पुण्यास नानासाहेबांस लिहून पाठविलें. वर्तमान नानासाहेबांनीं श्रवण करून भाऊसाहेबांची बहूत खंती करूं लागले. रात्रंदिवस जेवितां व स्नानसंध्येंत व कारभाराचे कचेरींत व झोपेंत भाऊ ! भाऊ ! म्हणून डचकून उठूं लागले. केवळ भाऊसाहेबांचें वेड लागलें. " हाय ! हाय ! भाऊ ! माझं दृष्टीस केव्हां पडशील ? केव्हां भेटशील ? माझा पुत्र विश्वासराव गेला. त्याचें मला फारसें स्मरणही होत नाहीं. परंतु भाऊसाहेबांनीं मला मागें टाकून आपण स्वर्गवास केला. माझी अंधळयाची काठी चोरून नेली ! माझे धनाचा[3] चरू कोणी चोरून नेला तो कळेना ! ! आतां प्रपचांत राहून कांहीं एक नफा नाहीं. आतां देहत्याग करावा अथवा संन्यास घ्यावा अथवा वैराग्य घेऊन जिकडे भाऊसाहेब गेले तिकडे जावें, हा हेतू. यापरता दुसरा विचार नाही. " असा शोक जाहला.

### ४०. भाऊसाहेबांचें उसनें घ्यावें

तदनंतर सर्व कारभारी यांणीं परोपरी विरापना केली. तथापी नानासाहेब शोकार्णवीं पडोन भ्रांत जाहाले. अन्न, पांणी, तांबूल, विलास, नृत्य, कारभार व कोणत्याही गुणें करून व कोणत्याही विषयेंकरून मर्जी शांत होईना. सबब पुणें मुक्कामीं दुसरी फौज होती ती सिद्ध करून भाऊसाहेबांचें उसनें घ्यावें या कारणास्तव हिंदुस्थान प्रांतीं मोहिमेस चालले. कोण्या कारभाऱ्यांचें पुढें चालेना. रामचंद्रासाठी भरतानें अयोध्यापूर सोडून नंदिग्रामीं राहून वैराग्यवत् उदास जहाले; तद्वत् राव नानांनीं आरंभिलें. मजल

(१) भाऊसाहेबांच्या बखरीत 'तो दिवस शके १६८२ पौष शुद्ध ८ बुधवासर होता' असा उल्लेख येतो. (२) बारनीस-सरकारी नोंद करणारा. नागपूर प्रत-बारसनिसाने व वकिलाने. (३) नागपूर प्रत-' माझे निधनाचे (निर्धनाचे) धनाचा चरू ' चरू-तांब्या.

V. P. Bhagwat

दर मजल करीत चालले. खेचेवाडीपर्यंत गेले. तेव्हां कोणे एके दिवशीं रात्रौ भोजन करून मजलसीस बसले असतां रायास भाऊसाहेबांचें स्मरण जाहालें. तेव्हां गहिंवर येऊन अश्रुपात करू लागले. इतक्या समयांत कोणी कलावंतिणी नृत्य करावयास आल्या. त्यांनीं उत्तम प्रकारचें गायन करून रायाची मर्जी सुप्रसन्न केली. तेव्हां साहेबांनीं म्हटलें कीं, " जी इच्छा असेल ती आज मागावी. मी देईन, " अशी आज्ञा जाहाली, तेव्हां त्या कलावंतिणीनें पुढें पदर पसरून अर्ज केला कीं, " आपण दक्षिणचे ब्राह्मण, बादशहा, ज्या ठिकाणीं भाऊसाहेब गेले आणि गर्क जहाले तें ठिकाण आपण दृष्टीनें पाहू नये व खावंदांनीं मोहिमेस स्वतां जाऊं नये. दुसरे सरदार पाठवून शत्रुंचीं पारिपत्यें करावीं हेंच आम्हास बक्षीस द्यावें. आणखी कोणे गोष्टीची इच्छा नाहीं. सर्व कांहीं खावंदाचे चरण प्रतापें करून आम्हांस आम्हांस घरीं अनुकूळ आहे. " त्या समयीं पुरंदरे वगैरे ब्राह्मण मंडळी कारभारी व मराठे व मुसलमान सरदार यांनीं रायास विनंती केली कीं, " महाराजांनीं इच्छा असेल तें मागावें, मी देतों, असें वचन दिलें; त्यापेक्षां हें बक्षीस कलावंतिणीस देणें प्राप्त, अशा भागास गोष्ट आली. याजवर धनी समर्थ आहेत. " याप्रमाणें सर्वांचीं भाषणें रायांनीं श्रवण करून माघारां ढाला[1] फिरविल्या.

### ४१. नानासाहेब कैलासवासी

फिरून स्वारी पुण्यास येऊन विक्षिप्त भाऊसाहेबांचे वियोगें करूनच जाहाले. काम कारभार कार्याकारण[2] होऊं लागले, गादीवर बसणें त्याचाही त्याग केला. दिवसेंदिवस शरीर कृश झालें. इहिदे[3] सितैनांत जेष्ठमासीं नानासाहेबांनी कैलासवास केला.

### ४२. विश्वासरावांचे प्रेत गोसाव्यांचे हवाली

भाऊसाहेब व जनकोजी शिंदे, यशवंतराव पवार व आपाजी जाधवराव व बापूजी बल्लाळ फडके वगैरे मंडळीचे ठिकाण लागलेंच नाहीं ! विश्वासराव साहेब यांचा हत्ती प्रेतासुद्धां शत्रूंनीं वळवून नेला. आणि विश्वासराव

(१) ढाला-निशाणे. ढाला फिरविणे-सैन्य मागे फिरणे. (२) कार्याकारण-जरूरीपुरता. (३) इहिदे सितैन-सुरू सन ११६१ इ. स. १७६१.

साहेब यांचे स्वरूप गिलचे अबदल्ली व मनसूरअली आणि सुजातदौले व इराणीकडील सरदारांनीं पाहून बहूत श्रम[१] पावले, आणि म्हणू लागले कीं, "असल्या मोहऱ्यास कोणी गोळी घालून मारिला? जिवंत अंबारीसुद्धां धरून आणावयाचा होता. तुम्हीं मारिला हें ठीक केलें नाहीं." असें म्हणून सर्वांनीं धरणीवर शरीरें टाकून हाय हाय! करूं लागले. कोणी आपल्या पदरानें अशुद्ध पुसूं लागले. कोणी मुखाशीं मुख लावूं लागले. तेव्हां शत्रूकडील सरदारांनीं तसलिमात[२] केली कीं, "त्यांजकडील लष्करांतून गोळी लागली आणि हक्क जहाले. याचा दोष आमचेकडे नाहीं." मग अबदल्ली वगैरे यांणीं कबर[३] बांधावयास हुकूम दिला. तेव्हां अनुपगीर गोसावी, चरणगीर[४] गोसावी वगैरे रजपूत व रांगडे यांणीं अबदल्लीस अर्ज केला कीं, "आमचा हिंदूचा मुर्दा, त्यांत पेशवे बहादूर यांतील खासा धनी, यांचें थडगें किंवा छत्री काय करणें ती आम्ही करूं. मुसलमानास एकंदर करूं देणार नाहीं. याविषयीं आम्ही सर्व हिंदू लढाईस मजबूत आहों, यांत अंतर नाहीं" अशी प्रत्युत्तरें गोसांवी यांचीं वगैरे अबदल्ली व दिल्लीपत बादशाहा वगैरे यांनीं ऐकून प्रेत त्यांचे हवाली केलें.

### ४३. सर्वस्व बुडालें

पुरुषात देखणा विश्वासराव साहेब किंवा बायकांत देखणी मस्तानीबाई साहेब, समशेर बहादूर यांची मातोश्री, अशीं दोन माणसें दक्षिणेत स्वरूपानें जाहालीं. श्री० नानासाहेब अंशधारी[५] पुरुष, त्यांत शाहू महाराज छत्रपती यांचा वरदहस्त मस्तकीं, तेणेंकरून सर्व पेशव्यांचे वंशातील पुरुष जय संपादीतच आले. शेलके घोडें व शेलके माणूस व शेलके हत्ती, शेलक्या सांडणी साठ कोस नित्य चालणार व शेलकें जवाहीर व शेलकी तलवार व शेलक्या तोफा वगैरे शेलकें साहित्य सोनपत पानपत कुंजपूर व दिल्ली वगैरे ठिकाणीं सर्वस्व बुडालें. कितीएकांचीं घरें बसलीं. कितीएकांच्या नकला[६]

(१) श्रम पावणें–दुःखी होणें. (२) तसलिमात–प्रमाणपूर्वक विनंती. (३) कबर बांधणे–पुरणे. (४) पुणे प्रत १ व भिवंडी प्रत– यात 'चरण गीर' हे नांव नाही. भाऊसाहेबांच्या बखरीत 'उमरावगीर' हे नांव आले आहे. (५) अंशधारी–अवतारी–ईश्वराच्या अंशाचा अवतार. (६) नकला होणे–निर्वंश होणे.

जाहाल्या. कितीएक पुरुष शिपाईगिरीचे अहंकारीं ते बद्रिकाश्रमास वगैरे पवित्र जागां तपस्वी तपश्चर्येस गेले. कितीएक हातापायांनीं अधू जाहाले आणि भाऊबंद लढात इंगर्क जाहाले, आतां देशीं काय जावें, या कारणास्तव गंगाप्रवाहीं व यमुनाप्रवाहीं कितीएकांनीं घालन घेतलें. कितीएकांनीं राज्यलोभें प्रयागीं जाऊन करवत[1] घेतले. कितीएक आभर[2] जहाले. कितीक दरिद्री जाहाले. तें पत्रीं कोठवर लिहावें ?

### ४४. यथामतीनें बखर सजविली

एक बारनीस शत्रूकडील व श्रीमंतांकडील या उभयतांच्या दिनचर्येचें वर्तमान दफात्यास[3] चिटणिसांनीं बार केली त्यांची संगत पाहून, कच्चा मजकूर सेवेशीं निवेदन करावयाकरितां यथामतीनें बखर सजवून सेवेशीं पाठविली आहे. शके १६८४[4] चित्रभानुनाम संवत्सरे माहे फाल्गुन शुद्ध ५ मंदवासर मक्काम पुणें. मागून नवल विशेष वर्तमान होईल तें सेवेशीं सेवक निवेदन करतील. बहूत काय लिहिणें ? सेवकावर लोभाची वृद्धी दिवसेंदिवस निरंतर व्हावी सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. ही किताबत[5].

पृष्ठ ४० ओळ १ टीप यांत दर्शविलेला प्रत ४ मधील मजकूर निराळाच आहे तो येणेप्रमाणें:-

तिकडे अब्दलल्लीच्या पुत्राचें वर्तमान कीं, पुत्र अपमान होऊन सेनेचा पराभव केला. असें ऐकून दुर्घट दुःख प्राप्त झालें. ते समयीं पुत्रशोकाची

---

(१) करवत घेतले-संगमांत जलसमाधी घेतली. का. ना. साने म्हणतात, 'पुढील जन्मीं राज्य मिळावें एतदर्थ गंगा आणि यमुना यांच्या संयुक्त प्रवाहाच्या कत्रीमध्ये जलसमाधी घेतली. (२) आभर-संपन्न; श्रीमंत. (३) दफातें-स्मरणवही. या वहीत ज्या ज्या गोष्टी घडतील त्या त्या टिपून पत्रे व इतर कागदही नोंदून ठेवायचे. (४) नागपूर प्रत-शके १६८३ वृषानाम संवत्सरे फाल्गुन शु॥ ५ मंदवार. (५) पुणे प्रत १-इतकेच अपुरे वाक्य आहे. पुढील प्रत कोणाची, कधी लिहिली हा मजकूर फाटलेला दिसतो. भिवंडी प्रतीतील शेवटची माहिती-प्रत कोणाची, कोठे लिहिली प्रस्तावनेत दिली आहेच.

ममता अतिशय दाटली. सद्गदीत होऊन म्हणों लागला जे, " आतां आम्हीं वांचून काय करावे ? आपण मरावे यांत उत्तम आहे. " म्हणून सक्रोध-भरित होऊन, परमप्रतापी रणरंगाचीं वस्त्रें शस्त्रें तरकस कमाना चढवून अंबारींत बसला, आणि माहुतास हुकूम फर्मविला जे, " हत्ती फौजेंत ढकलणें. मारतां मारतां मरावें. " हा सिद्धांत अबदल्ली आपले मनांत करून गोठांतून शिलेपोस होऊन पन्नास हजार फौजेनिशीं निघाला. त्या समयीं इराणी व मनसूरअली वगैरे तेही लक्ष दीड लक्ष फौजेनिशीं निघाले. हे वर्तमान सदाशिवपंत व नामी नामी सरदार यांस कळलें. तेव्हां फौजेनिशीं माघारीं फिरले. फौज अगदी जर्जर जाहली. प्रात:काळापासून तासपर्यंत[१] संग्राम करून शिणोन गेले. सायंकाळ एक तास दिवस राहिला. अगदींच दिवसाचे उपवासी, लोक व घोडीं शिणोन गेलीं. आणि अमित्र शत्रू तो इराणी माघारीं फिरले. तेव्हां सदाशिवपंत सर्वांस बोलावून बोलले जे, " होणार तें वळोत्तर, तें कदापि सुटणार नाहीं. तदनुरूप घडून येतें. श्रीसांबाचे मर्जीस आलें असेल तें तसेंच घडून येईल. आतां यमाजी चिठ्ठी घेऊन खासा खिजमतगारच आला असा दिसतो. कांहीं घेऊन गेल्याशिवाय जात नाहीं. पुन्हा युद्ध [ न ] करितां गती नाहीं. तेव्हां मल्हारजी होळकर व जनकोजो शिंदे यांनीं विचार केला कीं, " आतां मागें न फिरावें· तो असा पाठीवर घेऊन गोटांत आणावा. आणि निशा समयीं निशाचर यांचा नि:पात करावा." ते समयीं सदाशिवपंत भाऊ यांणीं उत्तर दिलें जे, "होणार तें होते त्यास इलाज नाहीं. " सदाशिवपंत माघारे फिरले. आणि बोलले कीं, पुन्हा तीन टोळ्या करणें आणि युद्धास प्रवर्तोन, डावे बाजूस विश्वासराव, उजवे बाजूस जनकोजो शिंदे लहान थोर सरदार, मध्यभागीं सदाशिवपंत, पंचवीस हजार फौजेनिशीं किरीटीप्रमाणें[२] सांवरून रणरंगधीर उभे राहिले. तों परम आवेशें इराणी व अबदल्लीनीं एक लक्ष पठाणांनिशीं विश्वासराव यांजवर चालून घेतलें. प्रथम तोफखान्यावरच आले. तोफखाना तयारच होता· त्याजवर पडले. तेथे मुख्य इभ्रामखान याने धीर धरून एकदांच तोफांची सरबत्ती

(१) तासपर्यंत–किती तो आकडा गाळलेला. (२) किरीटी–अर्जुन.

केली. तेव्हां लष्कर धूम्रें करून आच्छादून गेलें. दोन हजार भांडी[1] व पंचवीस हजार जेजाला व -हेकले व सुतारनाला व जंबुरे, पंचवीस हजार बाण व करोळाचा मार दुरस्ता निमिष न लागतां एकाएकीं केला. आधीं गारदी शस्त्रसंधानीं चतुर, वावगा[2] यावाज जाऊं द्यावयाचा नाहीं. भडिमाराची सीमाच केली. परंतु तितका आगीचा मार पेऊन, जिवाची आशा न बाळगितां, तोफखान्यांत अबदल्ली सरमिसळ जाहले. तेथें इराणी कडील मातबर सरदार पडले. याशिवाय पठाण रोहिले यांसि गणित करितां वीस हजार तेथेंच ठार पडले. याजखेरीज दहा हजार पठाण जखमी जाहला. तितक्यासही आंग देऊन बहूत मारामारी केली. वीस हजार गारदी अगदीं मारून कत्तल केली. खांसा इभ्रामखान त्यांचा सरदार खांसा ठार पडला. इराणीने तोफखाना मागें टाकून विश्वासरावावर चालून आला तो यशवंतराव पवार व मातबर सरदार यांनीं सतीचें वायन घेऊन म्हणों लागलें कीं, "आतां कांहीं ज़ीव वांचावयाची आशा नाही; मारून गर्द होऊन जावें". असा निश्चय करून आपले कबिले यांच्या समशेरी करून शाकाप्राय[3] केल्या आणि नीटच पुढें चालले. एका आंगीं[4] आले; कांहीं जिवाची तमा धरिली नाहीं. तीन चार घटका शस्त्रांचे खणखणाट जाहले. कोणी कोणास हाटले नाहीं. पुढील पाय पुढें, याप्रमाणे वीरश्रीच्या तवके[5] करून रक्तोदकें सुस्नात होऊन क्षतभूषणे परम भयानक शरीरें शोभलीं. एक धारातीर्थी आ म चे ज ड ले, एक शूरत्व करून विराले, इक मृत्यूपंथास गेले, एक पायातळीं रगडिले, एकाचें शीर तुटून भूमीस पडलें, एकाचीं उदरें विदारलीं, एक रणांगणीं मूर्छित पडले, असें युद्ध महाभारती हि रा णी व रं ना द करिते जाहले. वीर मारामार करून दमले. घे घे ह्या शब्दाची ध्वनी उठली कर्णबधिर जाहले. आपपारखी[6] ओळख न राहिली. अगदी गर्दी होऊन गेली. हणवंताप्रमाणें[7] एका परीस एक जुंझो लागले वीरां अंगी वीरश्रीचा संचार.

(१) भांडीं-नलिकायंत्रे. (२) वावगा-फुकट. (३) शाकाप्राय-भाजीचे तुकडे करतात तसे. (४) एका अंगी येणे-स्वतंत्र युद्ध करणे. (५) तवके-त्वेषाने, आवेशाने. (६) आपपारखी-आपण व परके. (७) हणवंत-हनुमान.

महाराष्ट्र प्रबोधक संस्था
११११ सदाशिव पेठ, ... 
... चौक, पुणे-४११ ०३०

होऊन सिहनादें गर्जो लागले. दोहीं दळांत शस्त्रें एकवटलीं. दोहीं दळां-मध्यभागीं रक्तोदकाच्या नद्या वाहूं लागल्या. तेव्हां पिशाचसमुदाय आनंदें करून नाचूं लागले कीं, चारशें[1] वर्षे झालीं. क्षुधातूर होतों. ते समयीं अठरा अक्षौणी दळांचे रक्तमांस भक्षिलें. त्या आलीकडे फार दिवस भोजन नाहीं. याजकरितां श्रीईश्वरानें आम्हांकरितां हें युद्ध निर्माण केलें." असें म्हणून भक्षावयास लागले. अशी युद्धाची सीमाच जाहली. फौजेचा मार वि[2]–

(३) चारशे कशी ? (२) का. ना. साने टीप देतात–' इतकाच मजकूर एकूणपन्नासाव्या पृष्ठाच्या अर्धाच्या शेवटपर्यंत आला आहे. पुढे बंद किती होते तें खात्रीलायक कळत नाहीं, तरी १० एक असावे.,

# स्पष्टीकरणात्मक टीपा

## संक्षेपांचा खुलासा

| | |
|---|---|
| ऐ. प्र. | — ऐतिहासिक प्रस्तावना. |
| म. रि. पे. बा. | — मराठी रियासत पेशवा बाळाजीराव. |
| म. रि. मध्यवि. ३ | — मराठी रियासत मध्यविभाग ३. |
| पा. संग्राम | — पानिपतचा संग्राम. |
| पा. रणसं. | — पानिपतचा रणसंग्राम |
| पा १७६१ | — पानिपत १७६१. |
| पा. ब. | — पानिपतची बखर. |
| पु. द. | — पुरंदरे दप्तर. |
| पे. द. | — पेशवे दप्तर. |
| स. फॉल | — Fall of the Mughal Empire. |
| भा. ब. | — भाऊसाहेबांची बखर. |
| ना. पे. चरित्र | — नानासाहेब पेशवे यांचे चरित्र. |
| म. सा. | — महाराष्ट्र सारस्वत. |

पृ. १

**गोपिकाबाई**–नानासाहेब पेशवे यांची ही पत्नी. भिकाजी नाईक रास्ते सावकार यांची ही कन्या. शाहू महाराजांच्या पुढाकारानें हिचें लग्न नानासाहेबांशीं झालें. रियासतकार गो. स. सरदेसाई म्हणतात, 'गोपिकाबाई ही मानी, करारी व कांहींशी मत्सरी बाई असावी असें तिच्या चरित्रावरून दिसतें' (ना. पे. चरित्र, पृ. २०९) सदाशिवराव आणि रघुनाथराव या

दोघांचा तिला मत्सर वाटे. राज्यकारभारांत ढवळाढवळ करण्याची तिला हौस होती. पतीच्या निधनानंतर राज्यकारभार आपल्या हातांत घेतां येईल असें तिला वाटत होतें. परंतु माधवरावांच्या स्वतंत्र वृत्तीमुळें तें अशक्य झालें. माधवरावानें रास्त्यांना शासन केलें हें पाहून ही मानी स्त्री नाशिक-जवळ गंगापुरास जाऊन राहिली. रघुनाथराव, नाना फडणीस यांनीं तिला पुण्यास यावें म्हणून वारंवार लिहिलें पण तिनें आपला हट्ट सोडला नाहीं. गोपिकाबाई अतिशय दुर्दैवी स्त्री होती. तिच्यावर मोठे आघात झाले. थोरला पुत्र विश्वासराव पानपतावर पडला. दुसरा माधवराव अकालीं निधन पावला व त्याची पत्नी रमाबाई सती गेली. तिसरा पुत्र नारायणराव याचा खून झाला. यामुळें वैराग्य येऊन ती पंचवटींतील मठांत जोगीणीप्रमाणें कांहीं दिवस राहिली. नातू सवाई माधवराव जन्मला व त्याच्या नांवे बारभाईंनीं राज्यकारभार सुरू केला तेव्हां ती परत गंगापुरास गेली. इ. स. १७८८ मध्यें तिचा मृत्यू झाला.

**शाहू महाराज** (इ. स. १६८२–१७४९) – संभाजी महाराजांचा शाहू हा पुत्र. इ. स. १६८९ त संभाजी महाराजांचा वध झाला आणि शाहू औरंगजेबाच्या हातांत पडला. पुढची १८ वर्षे तो औरंगजेबाच्या कैदेत होता. ऐन उमेदीचा काळ जनानी छायेंत कंठण्याची पाळी त्याच्यावर आली यामुळें त्याचा स्वभाव मृदु व निःसत्व बनला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अझमशहानें मराठ्यांच्या राज्यांत दुफळी व्हावी या हेतूनें इ. स. १७०७ मध्यें त्याला बंधमुक्त केलें. या कठीण प्रसंगीं उदार, परोपकारी स्वभावामुळेंच शाहूचा निभाव लागला. अनेकांचे अन्याय त्यानें पोटांत घातले. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव, चिमाजी यांचा पराक्रम, सेवा जाणून शाहूनें त्यांना हाताशीं धरून उत्तर हिंदुस्थानांत राज्यविस्तार साधला. आपल्या पश्चात मराठी राज्याचा कारभार कसा चालावा यासंबंधीं शाहूनें स्वदस्तुरचे कागद नानासाहेब पेशव्यास करून दिले. त्यांत म्हटलें आहे –

'राजमान रा।। बाळाजी पंडित प्रधान आज्ञा जे. राज्यभार तुम्ही चालवाल हा भरंवसा स्वामीस आहे. तुमचे मस्तकीं हात ठेविला आहे,

वंश होईल तो तुमचे **प्रधानपद** चालवील. राज्य राखने ' हे कागद म्हणजे 'मराठशाहीच्या सूत्रचालकत्वाची शाहूनें पेशव्यास करून दिलेली सनद होय ' असें गो. स. सरदेसाई म्हणतात. ( ना. पे. चरित्र, पृ. ७२ )

**निजधामास जाते समयीं** – शाहूचा निधनकाल गो. स. सरदेसाई १५ डिसेंबर १७४९ हा देतात. पेशव्यांच्या शकावलींत 'मार्गशीर्ष शुद्ध ९ स देहविसर्जन झालें ' अशी माहिती आहे तर थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र यांत 'शके १६७१ . . . मार्गशीर्ष वद्य तृतीया शुक्रवारीं ' असा उल्लेख येतो.

**नानासाहेव** ( इ. स. १७२१–१७६१ ) – थोरल्या बाजीरावाचा हा पुत्र. यालाच बाळाजी बाजीराव असेंही म्हणतात. इ. स. १७४० त नानासाहेबाला पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. यांच्या अमदानींत मराठशाहीचा मोठा विस्तार झाला. उत्तरेंत अटकेपर्यंत आणि दक्षिणेंत कर्नाटकपर्यंत मराठ्यांचा अमल पसरला. गो. स. सरदेसाई राज्यकर्त्यास लागणाऱ्या गुणांच्या दृष्टीनें सर्व पेशव्यांत नानासाहेवास मुख्य मानतात. 'एकंदर मराठशाहीचा विचार करितांही शिवछत्रपतींच्या खालोखाल नानासाहेबांचाच अनुक्रम लावावा लागेल' असें ते म्हणतात. ( ना. पे. चरित्र, पृ. २११) मनुष्य स्वभावाची पारख, व्यक्तीचा स्वभाव ओळखून त्याजकडून काम करून घेण्याचें कौशल्य, दूर विचार, शांत वृत्ती या नानासाहेबांच्या गुणांमुळेंच त्यांच्या हातून राज्याचा एवढा उत्कर्ष झाला. ( ना. पे चरित्र, पृ. २१३ व म. रि. पे. बा. पृ. ४५६-४५७ )

**नानासाहेबांस व भाऊसाहेबांस** — गो. स. सरदेसाई यांच्या मतें यावेळीं भाऊ पुण्यास होते. 'नाना तेथें भाऊ ' हा बखरलेखकाचा समज असल्यानें भाऊसाहेबांचा उल्लेख येथें आला असावा असें स्पष्टीकरण का. ना. साने करतात. शेडगांवकर बखरींत फक्त नानासाहेबांचाच उल्लेख आहे.

**भाऊसाहेब सदाशिवरावभाऊ** ( इ. स. १७३०–१७६१ ) – हा चिमाजी आप्पाचा पुत्र. निस्पृहता, तडफ, निश्चयी स्वभाव, सदाचार हे

गुण त्यांच्यांत होते. गो. स. सरदेसाई म्हणतात, 'बाजीरावाचा दरारा व चिमाजीचे हिशेबी धोरण हे दोनही गुण सदाशिवरावाच्या अंगीं असून हर एक काम तो नेटानें रगडून नेत असे. भाऊ शिपाईगिरी व कारकुनी दोन्ही कसबांत निपुण होता. ( म. रि. पे. बा. पृ. ३४९, ३५१ ) शौर्या-बरोबर हिशेबीपणा, जरब, धूर्तपणा, समयसूचकता, राज्यकारभारकौशल्य हे गुण असल्यामुळेंच भाऊची निवड पानिपतच्या मोहीमेसाठीं झाली असें प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांचें प्रतिपादन आहे. (पा. १७६१ पृ. १३२) बादशहा दुसरा अलमगीर यानें भाऊस एक फारसी फर्मान पाठविलें होतें त्यावरून भाऊंचें कारभारीपण दिल्लीपर्यंत गाजलें होतें हें कळून येतें. निजामाविरुद्ध झालेली उदगीरची लढाई भाऊसाहेबानें जिंकली आणि तहांत मराठ्यांना साठ लक्षांचा मुलुख मिळाला. पानिपतची मोहीम दुर्दैवानें भाऊ हरले. तरी त्यांचें शौर्य आणि त्यांची हिंमत यांचा गौरवपूर्ण उल्लेख अनेक पत्रांतून, बखरींतून पाहावयास मिळतो. प्रा. न. र. फाटक यांनीं पानिपतविषयक साधनें संपादित करतांना भाऊंच्या स्थिरचित्तता आणि धैर्य या गुणांकडे वाचकांचें विशेष लक्ष वेधलें आहे ' अत्यंत विपत्तीच्या कल्लोळांतही पर्वतासारखे स्थिर', 'गडद अंधकारांतही निष्कंप तेवणाऱ्या भाऊसाहेबांचे वीरोचित असामान्य धैर्यशालित्व ' असा निर्देश प्रस्तावनेंत ते करतात. ( पा. संग्राम, पृ. १३–१४ )

पृ. २

**अटकेपर्यंत मुलूख काबीज** — अटक हा सिंधूनदीच्या उत्तरेकडील प्रदेश. अटक ही हिंदुस्थानची हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें हद्द मानली जाई. यापलीकडे जाण्यास अटकाव होता. इ. स. १७५८, मे महिन्यांत राघोबानें अटकेची स्वारी केली. मल्हारराव होळकर, तुकोजी होळकर, साबाजी शिंदे यांनीं त्यात भाग घेतला, अटकेपर्यंत मराठी झेंडा रोविला ही राघोबाची कामगिरी इतिहासांत प्रसिद्धच आहे.

**पुढें होणारें भविष्य बलवंत** – पानिपतावर मराठ्यांचा झालेला नाश आणि भाऊसाहेब विश्वासराव यांचा ओढवलेला मृत्यू याला अनुलक्षून बखरकार हे म्हणतो. बखरकाराची दैववादी वृत्ती येथें दिसते.

**नानासाहेबांस बुद्धी जहाली जे भाऊसाहेबांस रवाना करावें** — 'नानांच्या मनात भाऊंविषयीं वाईट आलें होतें असा बखरीचा आशय दिसतो' हें का. ना. साने यांचें म्हणणें पटत नाहीं.

उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेवर प्रथम राघोबाला पाठविण्याचा विचार होता तो बदलून भाऊसाहेबांना पाठविण्याचा निर्णय विचारपूर्वक चर्चेनंतर घेण्यांत आला असें इतिहासकार सांगतात. पडदूर येथें वाटाघाटी होऊन निर्णय ठरला. भाऊंच्या उदगीर विजयाच्या पार्श्वभूमीवर राघोबाचा नाकर्तेपणा अधिकच खटकला आणि निश्चयी, हिमती, व्यवहारी भाऊसाहेबांना पाठवण्याचा मनसबा झाला. राजवाडे, गो. स. सरदेसाई, त्र्यं. शं. शेजवलकर आणि शं. ना. जोशी या सर्वांचें याबावत एकमत आहे.

राजवाडे यांनीं खंड १ टीप २५४ मध्यें प्रतिपादन केलें आहे कीं, दादांचा भोळेपणा हा भाऊंच्या जाण्याचें मुख्य कारण होय. मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले या वृद्ध हितशत्रूंना खोडणें, मनसबा खोल शहाणपणानें उरकणें म्हणून भाऊंची योजना नानांनीं केली. पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंतही हाच विचार त्यांनीं मांडला आहे. 'मुख्य कारण रघुनाथरावाचा नाकर्तेपणा.... प्रसंग फार बिकट होता. गृहशत्रू व परशत्रूपुढें राघोबासारख्या भोळ्या सांबाचा टिकाव न लागतां ... भाऊसारखा पंचतंत्री मुत्सद्दी हवा होता. तेव्हां हिंदुस्थानांत त्याची रवानगी करून देण्यांत बाळाजी बाजीरावानें आपल्या विचार शक्तीचा केवळ गौरव केला.' (ऐ. प्र. पृ. ६३–६४)

गो. स. सरदेसाई यांनीं जवळजवळ असेच विवेचन केलें आहे. पटदूरचा निर्णय ( म. रि. पे. वा., पृ. ३४८–३५४)

प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर म्हणतात, उदगीरच्या जयाचा राजकीय परिणाम राघोबादादा उत्तरेंत जावयाचा त्या ऐवजीं भाऊसाहेबांची नेमणूक त्या कामावर झाली हा होय. (पा. १७६१, पृ. ४५)

शं. ना. जोशी यांनीं नानासाहेब व भाऊसाहेब यांना उत्तरेंकडील बोलावणीं होतीं याचा उल्लेख केला आहे. प्रकृतीच्या कारणास्तव

नानासाहेब गेले नाहींत. 'परकी शत्रु नाहींसा करणें' या ध्येयासाठीं कर्जबाव गौण मानून भाऊसाहेबांना पाठविलें. (पा. रणसंग्राम, पृ. १६४–१६६)

**महादजीपंत पुरंदरे** – अंबाजीपंत तात्या पुरंदरे यांचा मुलगा. हा पेशव्यांचा दिवाण होता. नानासाहेबांचा निकटवर्ती सल्लागार होता. कांहीं दिवस नाराज होऊन घरीं बसला पण परत समजूत पटली. निजामावरील स्वारींत यानें पराक्रम गाजविला म्हणून पेशव्याकडून सरदारी मिळाली. भाऊंच्या स्वभावाचें मर्म यानें जाणलें आहे व पेशव्यास सल्ला दिला आहे. भाऊसाहेबांना पानिपतावर हलाखीची स्थिती येण्यापूर्वींच त्यांच्या मदतीस जाण्याचा आग्रह यानें पेशव्यास केला होता असें भारतवर्ष शकावलींत आहे. प्रा. शेजवलकर म्हणतात, 'अशी गोष्ट पेशव्यानें केली असती तर इतिहासांतील ती एक नामांकित युद्धशास्त्रीय घडामोड ठरली असती' (पा. १७६१, पृ. १३६) यावरून याचा दूरदर्शीपणा दिसतो.

**भाऊसाहेबांचे कारभाराचा हावभाव ...... राज्याचा भार त्यांजवर आहे** -- भाऊसाहेबांच्या लष्करी व दिवाणी कारभारांतील कर्तृत्वाचा हा निर्देश आहे. भाऊसाहेबांच्या बखरींतही मल्हारराव होळकराच्या तोंडीं 'भाऊसाहेब कर्ते मनुष्य' हे शब्द आहेत. 'सदाशिवराव हा राज्याची जमाबंदी, महसूल व हिशेब या कामांत त्या काळांतील नामांकित अग्रेसर म्हणावा लागेल.' (पा. १७६१, पृ. ८०)

**चिमाजी अप्पा** (मृत्यू १७४०) -- हा थोरल्या बाजीरावाचा धाकटा भाऊ. आपल्या धोरणी स्वभावानें त्यानें शाहू महाराजांचें मन जिंकलें होतें. बाजीरावावर त्याचें प्रेम होतें परंतु मस्तानी प्रकरण मात्र त्याला मान्य नव्हतें. मस्तानीपासून बाजीरावाला दूर करण्याचा प्रयत्न त्यानें केला. वसईची मोहीम चिमाजीनें जिंकली तसेंच माळवा काबीज केला.

**गोपिकाबाई साहेब यांणीं अनुमोदन दिलें कीं ...** पटदूरला वाटाघाटी झाल्यानंतर भाऊंना पाठविण्याचा निर्णय स्वत: नानासाहेब पेशव्यानें

घेतला, त्यांत गोपिकाबाईचा सल्ला घेतला नव्हता असें कांहीं इतिहासकारांचें म्हणणें आहे. गो. स. सरदेसाई म्हणतात, 'या स्वारीची व्यवस्था ठरवितांना नानासाहेबानें आवेशाच्या भरांत किंवा पत्नीच्या शिकवणीमुळें कांहीं गोष्टी ठरविल्या असें प्रवाद बाष्कळ होत.' (म. रि. पे. बा., पृ. ३५३) भाऊसाहेबांच्या बखरींत गोपिकाबाईच्या हस्तक्षेपाचा निर्देश आहे. गोपिकाबाईचा मत्सर अभावितपणें भाऊंच्या पाठवणीला कारणीभूत ठरलेला भाऊसाहेबांच्या बखरींत दाखविला आहे.

पृ. ३

**विश्वासरावसाहेब यांची रवानगी केली पाहिजे** -- भाऊसाहेबां-बरोबर विश्वासरावाला पाठविण्यांत गोपिकाबाईंचा हात असावा. भाऊंच्या अनिर्बंध सत्तेची भीती गोपिकाबाईंस वाटली म्हणून त्यास पायबंद घालण्यास ही योजना झाली असावी असा विचार प्रा. शेजवलकरांनीं मांडला आहे. (पा. १७६१, पृ. १३०) सरदेसायांच्या मतें त्यांत कोती कौटुंबिक स्पर्धा नव्हती, विश्वासरावाला स्वारीचा अनुभव मिळावा म्हणून पाठविण्यांत आलें. (म. रि. पे. बा., पृ. ३५०, म. रि. मध्य - ३, पृ. १३६–१३७)

**विश्वासराव** (इ. स. १७४२--१७६१) – हा नानासाहेब पेशव्यांचा पुत्र. उदगीरच्या मोहीमेंत हा भाऊसाहेबांबरोबर होता. पानिपतवर याला भाऊंबरोबर पाठविण्यांत आलें. भाऊंनीं स्वारींत याला पेशवा म्हणून मान दिलेला दिसतो. दिल्ली काबीज केल्यावर दरबार भरवून भाऊसाहेबानें विश्वासरावाला इतरांकडून नजराणे देवविले. (म. रि. पे. बा., पृ. ३६६) दुर्दैवानें पानिपतच्या संग्रामांत हा गोळी लागून पडला. त्याची पत्नी मात्र परत आली.

**मल्हारजी होळकर** (इ. स. १६९३--१७६६) -- हा जातीनें धनगर होता. पहिल्या बाजीरावाकडे सामान्य हुजऱ्या म्हणून राहिलेला मल्हारराव पुढें पराक्रमानें सरदार झाला. बाजीरावानें त्याच्याकडे माळव्यांतील चौथाई सरदेशमुखी वसूल करण्याचें काम दिलें होतें.

बाजीरावाच्या मृत्यूनंतर याचें वर्चस्व उत्तर हिंदुस्थानांत वाढलें. रोहिल्यांचे बंड मोडण्यांत सफदरजंगाला मदत केली म्हणून अंतर्वेदींत मोठा मुलूख मराठ्यांना मिळाला. मल्हाररावालाही त्यांत भाग मिळून त्याची स्वतंत्र कारभाराची हाव बळावली. दत्ताजी अबदालीशी लढत असतां मल्हाररावानें चुकारपणाचें धोरण स्वीकारलें, त्याला मदत न करतां कालविक्षेप केला याबद्दल राजवाडे व शं. ना. जोशी यांनीं त्याला दोषी ठरविलें आहे. (ऐ. प्र. पृ. ५१--५२, पा. रणसं. पृ. १४५) नजीबखानाला धर्मपुत्र म्हणजे, 'खळी' म्हणून त्याचे संरक्षण करणें व इतर सरदारांना 'धोतरबडवी' मंत्र देणें ही याची सत्तास्पर्धेतून निर्माण झालेली दुष्कृत्यें प्रसिद्धच आहेत. (भा. ब. पृ. ३४, ४०--४१)

**दमाजी गायकवाड** -- हा गुजराथेंतील सरदार. प्रथम हा ताराबाईच्या बाजूनें पेशव्यांविरुद्ध लढला. नंतर पेशव्यांना मिळाला. पानिपतावरून मल्हारराव होळकरानंतर यानेंही पळ काढला.

**समशेर बहाद्दर** (इ. स. १७३४--१७६१) – बाजीराव व मस्तानी यांचा हा पुत्र. पेशव्यांचा तो मोठा पराक्रमी सरदार होता. पानिपतावर तो जखमी झाला. जाटाच्या मुलखांत आल्यावर दीग येथें तो मरण पावला. (म. रि. पे. बा. पृ. ४१२)

**नाना पुरंदरे** -- अंबाजीपंत पुरंदऱ्यांचा पुतण्या. माधवरावाबरोबर हा कर्नाटकच्या स्वारींत होता.

**विठ्ठल शिवदेव** (इ. स. १६७५--१७६७) – शाहू छत्रपतींनीं याला सरदार केलें. बाजीरावाच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांत हा होता. यानें ग्वाल्हेरचा किल्ला सर केला म्हणून बादशहानें याला विंचूरची जहागीर दिली. बादशहाकडून याला मुलुकबहादुर हा किताब मिळाला. निजाम, हैदर यांच्यावरील स्वारींतही यानें पराक्रम गाजविला. पानिपताहून हा पळून आला.

**जनकोजी शिंदे** (मृत्यू १७६१) – जयाप्पा शिंदेचा हा पुत्र. १७५० त यानें अबदालीचा पराभव केला. दत्ताजीबरोबर बुराडी घाटावरील लढाईंत हा होता, दत्ताजी पडल्यावरही हा लढत होता.

जनकोजी गोळी लागून जखमी झाल्यावर युद्धाचा रंग बदलला व सैन्यानें पळ काढला. त्याची पत्नी काशीबाई स्वारीबरोबर होती. पतीचें निधन झाल्यावर तिनें दाखविलेली हिंमत व पोक्त बुद्धी भाऊसाहेबांच्या बखरकारानें वर्णिली आहे.

**यशवंतराव पवार** ( मृत्यू १७६१ ) – धारच्या आनंदराव पवारांचा हा पुत्र. बाजीरावाच्या माळवा, बुंदेलखंड या स्वाऱ्यांत हा प्रमुख सरदार होता. चिमाजी अप्पाच्या कोकण, वसई या मोहीमांतही यानें पराक्रम केला. भाऊंचें व याचें भांडण होऊन याचा सरंजाम इ. स. १७४७ त जप्त झाला. कांहीं काळ यानें निजामाशीं मैत्री केली. पुढें याचा पेशव्यांशीं समेट झाला. १७६० मधील उदगीर लढाईत यानें पराक्रम गाजवला. पानिपतावर याला मृत्यू आला.

**सोनजी भापकर** ( मृत्यू १७६१ ) – हे लोणीचे पाटील. पानिपत युद्धांत यानें होळकरांबरोबर एक बाजू संभाळली होती. सुजाउद्दौल्याचा यानें पराभव केला. रणांगणावर याला मृत्यू आला.

**गोविंदपंत बुंदेले** ( मृत्यु १७६० ) – गोविंद बल्लाळ खेर. हा कऱ्हाडा जातीचा. भाऊबंदांनीं केलेल्या हेटाळणीमुळें सैन्यांत दाखल झाला. बाजीरावाबरोबर हा बुंदेलखंडाच्या स्वारींत होता. बाजीरावानें त्याला बुंदेलखंडाच्या कारभारावर नेमलें. उत्तरेकडील राजकारणांत हा प्रमुख होता. भाऊसाहेबांनीं पैसा पुरविण्यासाठीं वारंवार पत्रें लिहूनही यानें मदत केली नाहीं तसेंच अबदालीची रसद मारली नाहीं म्हणून राजवाड्यांनीं याच्यावर गहजब उडविला आहे. राजवाड्यांनीं पानिपतच्या मोहीमेचें अपयश गोविंदपंत बुंदेल्यांच्या माथीं मारलें आहे. (ऐ. प्र. पृ. ८०, ८५ ) राजवाड्यांचें हें मत खोडतांना साध्या कमाविसदाराकडून फार मोठी अपेक्षा भाऊनें केली असें प्रा. शेजवलकरांनीं प्रतिपादिलें आहे. ( पा. १७६१, पृ. ११७ ) तर सदाशिवरावानें त्याजवर शक्तीबाहेरची कामें टाकली असें सरदेसाई म्हणतात. ( म. रि. मध्यवि. ३, पृ. १४२ )

**बळवंतराव गणपत** ( मेहेंदळे ) ( मृत्यू १७६० ) – नाना फडणिसाचा हा मामा. पेशव्यांचा प्रमुख सरदार. कर्नाटक, म्हैसूर स्वाऱ्यांत

यानें पराक्रम केला. दमाजी गायकवाडाचें बंड मोडलें. पानिपतवरील डिसेंबर ७ च्या लढाईंत याला गोळी लागून मृत्यू आला. मराठ्यांना यश मिळूनही यामुळें मोठी हानी सोसावी लागली. याची पत्नी लक्ष्मीबाई सती गेली. या घटनेचें करुण वर्णन भाऊसाहेबांच्या बखरींत आहे. ( भा. ब. पृ. १२४–१२५ )

( भाऊसाहेबांबरोबर हिंदुस्थानांतील मोहीमेस गेलेल्या सरदारांची यादी बखरकारानें दिली आहे ते सर्वच प्रारंभापासून बरोबर नव्हते. कांहीं नंतर वाटेंत मिळाले. ऐतिहासिक प्रस्तावनेमध्यें इतर कांहीं नांवें आलीं आहेत – महिपतराव चिटणीस, मानाजी पायगुडे, अंताजी माणकेश्वर, माने, निंबाळकर. )

पृ. ४

**नबाबांनी कटकट काढिली** – दत्ताजी शिंदे पडल्याची बातमी मिळाल्यावर निजामानें त्रास देण्यास सुरुवात केली.

**चवसष्ट लक्षांचा मुलूख सोडवून** – इ. स. १७६० मध्ये निजामाशी उदगीर येथें मराठ्यांची लढाई झाली. निजामाचा पराभव झाला. मराठ्यांना तहाअन्वयें निजामाकडून ६४ लक्षांचा मुलूख मिळाला. हा तह घडवून मुलूख मिळवण्यांत भाऊसाहेब यांचा वाटा मोठा होता.

**उज्जनी पावेतों** – याला आधार नाहीं.

**अंताजी माणकेश्वर** (मृत्यू १७६१)– याचें आडनांव गंधे. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता. शाहू महाराजांकडून हा पेशव्यांच्या सैन्यांत आला. बादशहाच्या संरक्षणास पेशव्यांच्या वतीनें हा १७५२-५३ मध्यें राहिला होता. दरबारांतील मराठ्यांचे वकील हिंगणे यांच्याशीं अंताजीचा कलह होता. गैरकारभार, अव्यवस्था यामुळें भाऊसाहेबांचें मत याच्याविषयीं बिनसलें होतें १७५९ मध्यें याच्या कारभाराची चौकशी झाली व पेशव्यानें त्याला निर्दोष सोडलें. पानिपतवरून पळून येत असतां हुल्लडींत हा मारला गला. पानिपतविषयक एक बखर याच्या नांवावर नोंदली गेली आहे. ( म. सा. आवृत्ती ५ वी, पृ. ६०७ )

**जाट सुरजमल** ( इ. स. १७४३–१७६३ ) – भरतपूरचा राजा. बादशहा सफदरजंग यांच्या भांडणांत यानें सफदरजंगाला साह्य केलें. सफदरजंगानें त्याला आग्रयाची सुभेदारी दिली. शिंदे, होळकर यांच्याबरोबर जाटानेंहि अब्दालीकडून मार खाल्ला. भाऊसाहेबांना त्यानें आपल्या मुलखांत उपद्रव देऊं नये असें कळविलें होतें. ( पे. द. २१ क्र. १९० ) भाऊ व जाट यांच्यांत पुढें मतभेद झाला व जाट दिल्लीहून निघून गेला. तरीसुद्धां पानिपताहून पळालेल्या मराठयांना यानें मदत केली. ( भा. ब., पृ. १४२ )

पृ. ५

**यमुनातटाकास सदाशिवपंत भाऊ दाखल जाहले** – भाऊंच्या स्वारीचे टप्पे इतिहासकार पुढीलप्रमाणे देतात.

रियासतकार सरदेसाई ( म. रि. पे. बा., पृ. ३५४–३५५ )

| | | | |
|---|---|---|---|
| १८ मार्च १७६० | सिंदखेड | ६ मे | सिरोंज |
| ४ एप्रिल | बऱ्हाणपूर | २१ मे | नरवर |
| १२ एप्रिल | हंडिया | ८ जून | चंबलपार |
| २४ एप्रिल | सिहोर | १४ जुलै | आग्रा |

शं. ना. जोशी ( पा. रणसंग्राम पृ. ४३–४४ )

| मुक्काम | तारीख | मुक्काम | तारीख |
|---|---|---|---|
| पडतूर | मार्च १३ | ग्वालेर | मे ३० |
| शिंदखेड | मार्च १४ | चमेल पलीकडे | जून ८ |
| बऱ्हाणपूर | एप्रिल ४ | आग्र्याजवळ | जून २५ |
| हंडिया | एप्रिल १६ | मथुरा | जुलै १५ |
| सिहोर | एप्रिल २८ | दिल्ली शहर | जुलै २७ |
| सिरोंज | मे ६ | दिल्ली किल्ला | ऑगस्ट १ |

**रजपूत यांनी . . . स्वस्थ राहिले**–मराठे व दुराणी यांच्या या लढाईंत रजपूत तटस्थ राहिले. भाऊसाहेबांनीं गोविंदपंत बुंदेले यांना उत्तरेकडील सरदारांना आपल्या बाजूस वळवण्याबद्दल लिहिलें होतें. राजबाडे खंड १, पत्र क्र.

१७४ मध्यें रजपुतांकडे पत्रे, वकील, पाठविल्याचा उल्लेख आहे. 'सर्व मंडळी दोही राजकारणावर' असल्याचा तेथें निर्देश आहे. कुंभेरी प्रकरणीं होळकरांनीं रजपुतांना दुखावलें व शिंद्यांनीं मारवाडच्या विजेसिंगाला कुटलें. यामुळें रजपूत मराठ्यांना सामील झाले नाहीत. रजपूतांमधील आपसांतील भांडणांत मराठे सरदार शिंदे होळकर यांनीं भाग घेऊन त्यांना दुखावलें व याचा परिणाम म्हणजे पानिपतावर त्यांना एकाकी लढावें लागलें. प्रा. शेजवलकर व गुलचरणसिंह यांनीं या मुद्यावर विशेष भर दिला आहे. (पा. १७६१, पृ. ५८, ८६). (The Battles of Panipat, p. 76, 77)

**हस्तनापुरवासी पातशाहा** – दुसरा आलमगीर इ. स. १७५४ मध्यें तख्तावर बसला. गाजीउद्दीन वजीराला याचें अब्दालीशीं संगनमत आहे हें कळतांच त्यानें त्याला ठार केलें.

**मनसूरअली** – हें नांव या बखरींत नजीबखान रोहिल्याबद्दल चुकीनें आलें आहे. मनसूरअली म्हणजे सफदरजंग हा अयोध्येचा कारभार पाहत होता. १७५४ त तो मृत्यू पावला व सुजाउद्दौला नवाब झाला.

**नजीबखान रोहिला** (इ. स. १७२८-१७७०) – पानिपतच्या युद्धाचें मूल कारण म्हणजे नजीबखान होय, कंदाहार येथील गरीब पठाणाचा हा मुलगा हिंदुस्थानांत प्रथम साधा शिपाई म्हणून नोकरीस लागला. लौकरच कर्तबगारीमुळें तो फौजेचा प्रमुख बनला. सफदरजंगाविरुद्ध इमाद उल्मुकाला यानें मदत केली. बादशहानें याला मनसबदारी दिली. दिल्लीच्या राजकारणांतील नजीबखानाच्या महत्त्वाकांक्षेमुळेंच मराठे व अब्दाली यांच्यांत तह होणें अशक्य झालें व पानिपतचें युद्ध ओढवलें. हा हिंदु मुसलमानांचा झगडा आहे, हें धर्म युद्ध आहे असें भासवून मराठ्यांविरुद्ध सर्व मुसलमानांना त्यानें एकत्र केलें. नजीबखानाच्या घरभेदी प्रवृत्तीची नेमकी जाणीव भाऊसाहेबांना होती याचें प्रत्यंतर त्यांच्या पत्रांतील मार्मिक वाक्यांवरून येतें.

नजीबखान तो अब्दालीच आहे... नजीबखान तर मूळच आहे. (राजवाडे खंड १, क्र. १८६)

**सुजातदौले** – सफदरजंगाचा मुलगा सुजाउद्दौला. याचें मूळ नांव जलालुद्दीन हैदर. हा अयोध्येचा नबाव होता याच्या जवळ पैसा, फौज व तोफखाना असल्यामुळें पानिपतच्या युद्धापूर्वी मराठे व अब्दाली या दोन्ही पक्षांनीं त्याला आपल्याकडे ओढण्याचें जबरदस्त प्रयत्न केले. मराठ्यांशी याचा प्रथम स्नेह होता पण नजीबखानाच्या दडपणामुळें व मुसलमान म्हणून अब्दालीस मिळाला. दिल्लीची वजिरी मिळविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती त्यासाठीं त्यानें धरसोड केली. (पा. रणसं. पृ. १८४–१९२ पहावी )

**मातबर माणूस वकिलीस** – भाऊसाहेबानें सुजाउद्दौलाकडे श्यामजी रंगनाथ यास पाठविलें होतें ( राजवाडे खंड १, क्र. १८९) भाऊंचे शुजास लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे त्यावरून त्यांची भूमिका, राजकारणी दृष्टी कळून येते. (पा. संग्राम, पृ. १४५ वर हें पत्र आहे.) पत्रांत भाऊ म्हणतात, 'तुम्ही आम्ही एकाच भात्यांतील बाण. तैमूरचे घराण्यांचे मिठाला जागावे. आम्हाकडे यावें. विजयी झालों तर शहा अलम पातशहा व तुम्हास वजिरी देऊं . . . पूर्वापार स्नेह चालू न ठेवणें, दुसऱ्याला मिळणें न्यायाला सोडून होईल.' भाऊंनीं रामाजी अनंत व नारोशंकर यांना सुजाकडे पाठविल्याचा उल्लेख आहे. ( राजवाडे खंड १, क्र. २०४ )

**अबदल्ली इराणी** ( इ. स. १७२४—१७७२ ) — अबदालीला नादिरशाहानें आपल्या सैन्यांत नोकरी दिली. इ. स. १७३९ मधील नादिरशहाच्या स्वारीबरोबर हा होता. नादिरशहाच्या वधानंतर इ. स. १७४७मध्यें यानें कंदाहार काबीज केलें. अबदालीनें इ. स १७४८ त हिंदुस्थानवर पहिली स्वारी केली. पुन्हा १७५२, १७५५ व १७५९ मध्यें त्यानें उत्तर हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या. १७५९ मधील बुराडी घाटावरील युद्धांत दत्ताजी शिंदे मारला गेला. जानेवारी १७६१ मध्यें पानिपतावर अबदालीचे मराठ्यांशी निकरानें युद्ध झालें. सेनानी या दृष्टीनें अबदाली सदाशिवरावाहून वरचढ होता, असें सरदेसाई यांनीं म्हटलें आहे. (म. रि. मध्य वि. ३, पृ. १५४ ) यदुनाथ सरकार अबदालीला Lesser Nadir म्हणून गौरवितात. (स. फॉल २, पृ. २९० ) गुरुचरणसिंह यांनीं

त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व ( Towering Personality ) आणि लष्करी शिस्त ( Military Discipline ) यांचा विशेष उल्लेख केला आहे.

पृ. ६

**सदाशिवपंत ... दिल्लीस दाखल जहाले ...** ३१ जुलै १७६० या दिवशीं ही घटना घडली. ( पा. १७६१, पृ. ४४, पा. रणसं. पृ. ४४ )

पृ. ७

**खर्चास पाहिजे** – भाऊसाहेबांच्या पानिपत मोहिमेंत त्यांचे पशाविना फार हाल झाले. त्यांच्या खर्चाच्या मानानें त्यांना फारच थोडी रक्कम मिळाली. दररोजचा खर्च ५॥ लाख रु. या हिशेबानें या स्वारींत पाऊण कोटीपर्यंत खर्च झाला. परंतु बेताचीच रक्कम भाऊंना उपलब्ध झाली. गोविंदपंतांकडे तगादा लावूनहि फारसा वसूल मिळाला नाहीं. चांदीच्या छताचे ९ लाख, कुंजपुऱ्याच्या लुटीचे ७ लाख, पडदूरहून निघतांना मिळालेले १ लाख, नारोशंकरकडील १ लाख १० हजार, गोविंद पंतांकडील २ लाख, बाबूराव कोनेर याजकडील पाऊण लाख ८० हजार असे काही आकडे उपलब्ध आहेत. ( पे. द. २७, क्र. २५७, स. फॉल २, पृ. २६३ )

**जाटाचा विश्वास नाही** – भाऊसाहेबांना जाटानें 'जमिदारी' कावा कसा दाखविला याची प्रमाणें आतां उपलब्ध झालीं आहेत. ती पाहतां बखरकारानें भाऊंच्या तोंडीं घातलेलें हें शब्द अगदीं योग्य वाटतात. कावेबाज, धूर्त जाटानें भाऊसाहेबांनीं हरतऱ्हेनें त्याला वळविण्याचा प्रयत्न केला तरीहि ओढून धरण्याचाच पंथ चालविला. ( पा. रणसं. पृ. २०५ )

**बादशाही कायम करावी** – भाऊसाहेबांचा उत्तर हिंदुस्थानांतील स्वारीचा उद्देश कोणता होता, त्यांची या मोहिमेमागील भूमिका काय होती यासंबंधीं त्यांनीं गोविंदपंत बुंदेले, गोपाळराव बर्वे यांना जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांतून स्पष्ट उल्लेख येतात. ते म्हणजे मोगल पातशाहीचें संरक्षण करणें आणि त्यासाठींच अब्दालीशीं सर्वांनीं एकत्र होऊन लढणें, त्याला हिंदुस्थानांतून घालवून देणें. ( राजवाडे-खंड १--पत्रें क्रमांक १६७,

१७३, १७९, १८७ ) 'अबदालीची जड हिंदुस्थानचे पातशाहीत रुतो देणें हें अयोग्य' हें एक सूत्र आणि 'पातशाहत दिल्लीस कायम करावी' हें दुसरें सूत्र असें या भूमिकेचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. बखरकारानें भाऊसाहेबांच्या उत्तरांत नेमकीं हीच सूत्रें ग्रथित केलीं आहेत. पुढेंहि म्हटलें आहे, 'आम्ही फरजंद, ... जेणेंकरून बादशाही सलामत राहील तेंच करावयास आलो आहों.' (पा. सं. प्रस्तावना, पृ. १७--१८, पा. रणसं. पृ. १७९–१८० )

पृ. ८

**जाट अविश्वासू ... त्यांणी भाऊसाहेबांस दाखवून ... दिल्लीस आणिलें** – का. ना. साने व प्रा. हेरवाडकर यांनीं हें वर्णन निराधार आहे असें म्हटलें आहे. ( प्रा. हेरवाडकर पा. ब. पृ. १० वरील तळटीप ११ ) परंतु जाटाचा अविश्वासूपणा, धूर्तपणा उघड करणारे भाऊसाहेबांचें पत्र उपलब्ध आहे. ( पा. रणसं. पृ. ५९–६४ भाऊसाहेबांनी बाबुराव राम यास लिहिलेलें पत्र क्रमांक २७ ) यांत भाऊ स्पष्ट म्हणतात 'पलीकडील कारभारी सुज्याउतदौल्याचे व नजीबखानांचे अबदालीचे त्याणे आणविले. आम्हांस तुमच्या कारभारास्तव आणविले म्हणून सांगतो. त्यासी आतस्त काय बोलतो न कले, याप्रमाणे 'जमीदारीवर' आहे.' जाटाचे धूर्त कावेबाज वर्तन, त्याचा जमीदारी कावा शं. ना. जोशी यांनीं विस्तारानें उघड केला आहे. तें विवेचन पहावें (पा. रणसं. पृ. २०४–२०६ ) शेजवलकरांचे विधान– 'सबंध पानिपत मोहिमेंत भाऊ सुरजमल बाबत कोठेंही साशंक असलेला दिसत नाहीं' (पा. १७६१, पृ. ७७ ) हें अर्थातच या पत्राधारें चूक ठरतें.

पृ. ९

**जाटात व सदाशिवपंतात पादशाही तक्तामुळें विकल्प** — चांदीचे छत काढल्यामुळे जाट रुसून गेला हा आतापर्यंतचा समजही ( भाऊसाहेबांच्या बखरीमुळें पक्का झालेला ) योग्य नाहीं असें शं. ना. जोशी यांनीं म्हटलें आहे. भाऊंच्या सैन्यानें दिल्ली ताब्यांत घेतल्यावर

गाजीउद्दीनाला वजिरी व आपल्याला अंमलदारी द्यावी हें जाटाचे म्हणणें भाऊंनीं मान्य केलें नाहीं म्हणून तो गेला. स्वतः भाऊ लिहितात, 'पातशाही हातास आली अशी समज जाटाची ते राहिले, यास्तव जाट कष्टी' ( पा. रणसं. पृ. २०४ ) छत काढल्यासंबंधीं दुसऱ्या एका भाऊंच्या पत्रांत खालील मजकूर आहे.

'तूर्त आम्हास पोटास पाहिजे. बहुतच उपास फौजेस होऊ लागले. त्यास पातशाही किल्ल्यात दिवाणखान्यास रुप्याचे छत होते, त्यास वजिरानें थोडकसे काढिलें होतें बाकी आम्ही काढिले; नवा लक्षाचे रुपे निघाले; त्यांपैकीं कांहीं सरदारास दिल्हे बाकी फौजेस वाटले. त्याणी महिनाभर स्थित राहिली' ( पे. द. २७, क्र. २५७ )

चांदीचे छत काढल्यामुळें तख्ताचा अपमान भाऊंनीं केला ही समजूत अयोग्य होय. भाऊ खर्चाच्या फार मोठ्या पेचांत सांपडल्यामुळेंच त्यांनीं हा मार्ग अनुसरला. पूर्वी वजीरानें छत काढलें होतें. उरलेलें भाऊंनीं काढलें तेंहि सरदारांच्या संमतीनें. यांतून ९ लाख रु. मिळाले व महिन्याचा खर्च कसाबसा भागला. वास्तविक जाटानें त्याच्याकडील येणे दिले असते तर ही वेळ आली नसती.

पृ. १०

**एकूण सात कोट रुपये लष्करांत पावले** — बखरकारानें ७ कोटी रुपये भाऊसाहेबांना मिळालें असें म्हटलें आहे व त्याचा तपशीलही दिला आहे. परंतु या वर्णनाला ऐतिहासिक आधार नाहीं.

**जाट सुरजमल्ल यांनी . . . एक कोट रुपये लष्करांत पावते केले** — जाटानें तर यावेळीं मुळीच वसूल दिला नाहीं असेंच उलटे कागदोपत्रीं नमूद आहे.

**तो कुंजपुरावरच होता . . खजीना लुटून नेला** — दुष्काळ आणि महागाई यांनीं त्रस्त झाल्यावर भाऊसाहेबांनीं दाणागोटा व पैसा मिळवणें आणि अब्दालीचे नाक्याचे ठाणें काबीज करणें या उद्देशानें कुंजपुऱ्यावर स्वारी केली. या स्वारींत 'श्रीमंतांस पांच सात लाख रुपये मिळाले. दाणादुणा लष्करास मिळाला, ( राजवाडे खंड ६, क्र. ४०५ ) असें नमूद

आहे. दत्ताजी शिंदे याचा वध करणाऱ्या निजाबतखानाच्या ताब्यांत कुंजपुऱ्याचें ठाणें होतें. इब्राहीमखानाच्या तोफखानाच्या मदतीनें मराठ्यांनीं हे ठाणें हसतगत केलें ( १६ ऑक्टो १७६० ).

पृ. ११

**इराणी दुराणी . . . यमुनातीरास** —अब्दालीनें बागपताजवळ यमुना पार केली त्याचा हा उल्लेख दिसतो.

**इब्राहीमखान गाडदी** – मुसाबुसीच्या गारद्यांच्या पलटणींत इब्राहीमखान होता. प्रारंभीं निजामाकडे तो नोकरीस होता नंतर १७५६ मध्यें सदाशिवरावानें त्याला नौकरीस ठेवलें. उदगीरच्या लढाईंत त्याच्या तोफखान्याचा प्रभाव विशेष दिसला. पेशवे दप्तरांत याचे उल्लेख आहेत. भाऊसाहेबांच्या बखरींत भाऊसाहेबांनीं त्यास इनाम दिलें होतें अशी माहिती येते. पानीपतच्या मोहीमेवर जातांना भाऊसाहेबांनीं याच्या तोफखान्याची मदत आपल्याला इराणीशीं लढतांना होईल ही अटकळ बांधली होती. प्रत्यक्ष मोहीमेंत खंदक खणून मोर्चे बांधण्याचा त्याचा सल्ला अनुसरला. दिल्ली काबीज करतांना इब्राहीमखानानें तोफांचा असा जबरदस्त मारा दिला की तेव्हा किल्ल्याचा एकेक बुरुज धडाधड कोसळू लागला त्यावेळी अब्दालीनें उद्गार काढले 'एवढा इसम आपल्या बाजूस असेल तर साऱ्या हिंदुस्थानचें राज्य आपण हाकू' ( ना. पे. चरित्र, पृष्ठ १९१ )

**मराठे बडे कट्टे लढनेवाले . . . क्या करना** — मराठ्यांकडून कुंजपुऱ्याला अफगाणांचा झालेला हा पराभव अबदालीला सहन झाला नाही. ( आधार - नुरुद्दीन नजीबखान चरित्र, पा. संग्राम पृ. ६१ )

पृ. १२

**लष्करा भोवतीं खंदक** — इब्राहीमखानाच्या सल्ल्यावरून भाऊसाहेबांनीं खंदक खणून सैन्याभोवतीं गोल बांधले. या पद्धतीनें पानिपतास मराठी सैन्य कांहीं काळ संरक्षित राहिलें तरी नंतर मात्र अवदालीनेंच त्यांची रसद तोडून नाकेबंदी केली व शेवटीं मराठ्यांवर उपासमारीची पाळी आली. खंदक खणून राहण्यावर भाऊसाहेबांच्या

कैफियतीत. 'पुरातन मराठा धर्म सोडन अविधी धर्माचा स्वीकार केला' अशी टीका केलेली आढळते. भाऊसाहेबांची बखर व नाना फडणीसाच्या आत्मचरित्रांत हीच विचारसरणी व्यक्त झाली आहे.

**मुलुख अगदीं . . . तवईचा वक्त गुजरला** — मराठ्यांवर दुष्काळाचे मोठें संकट गुदरलें. १५ नोव्हे. १७६० पासून १४ जानेवारी १७६१ पर्यंत मराठी सैन्याची आस्ते आस्ते उपासमार होत चालली होती. ( ऐ. प्र. पृ ८३ )

पृ. १३

**प्रथम गोठ सोडून बाहेर निघाले** – मराठे–अब्दाली यात १ नोव्हेंबर १७६० पासून बऱ्याच लढाया झाल्या· त्यातील पहिल्या लढाईचें हें वर्णन असावें. रियासतकारांनी ५ लढायांचें वर्णन केलें आहे. त्यापैकी डिसेंबर ७ ची व डिसेंबर २० ची या दोन लढायांचें वर्णन पुढें बखरींत आलें आहेच. पहिलीत अळवंतराव मेहेंदळे पडले व दुसरींत गोविंदपंत बुंदेल्यांना मारण्यांत आले.

पृ. १५

**दिल्लीपत बादशाहीचा व सुरळीतपणाचा जवा बसवून ... स्वदेशास जावें** – मराठ्यांनी समेट करून स्वारीचा खर्च घेऊन परत जावें असें तहाच्या वेळीं अट म्हणून अब्दालीतर्फे वकिलांनीं सांगितलें. तहाच्या अटींत अब्दाली अटकेपार गेल्यास भाऊंनीं नर्मदेपार जावें अशी अट प्रामुख्यानें होती. ( पा. रणसंग्राम, पृ. २२० ) बखरीत पुढें आले आहेच, 'नर्मदा दक्षण तीरापासून पलीकडील हद्द तुम्हीं आपली संरक्षण करून असावें.'

पृ. १६

**तें तख्त फोडून बादशहा परांगदा करवून** - आलमगीर (दुसरा) याचा पुत्र अलीगोहर हा नोव्हेंबर १७५९ मध्यें पळून गेला त्याचा हा निर्देश आहे. वास्तविक भाऊंनींच याला दिल्लीस आणून राज्याचा वारस म्हणून बलीहद समारंभ केला. ( १० ऑक्टोबर १७६० ) ( पा. रणसं. पृ. २१३ ऐ. प्र. पृ. ७०

**दक्षिणेंतील सरदेशमुखी** – मोगलांच्या अंमलांतील प्रदेशावर मराठ्यांना उत्पन्नाच्या दशांश किंवा १२।। टक्के कर वसुलीचा हक्क मिळाला होता.

पृ. १७

( क्रमांक १३ ) भाऊसाहेबांचे हे निधडे उद्‌गार त्यांची जिद्द, आत्मविश्वास, ठाम भूमिका यांचे प्रत्यंतर देतात. ' हिंदुपत बादशाही येथील बंदोबस्त करणें तो आम्हीच करू तुम्ही पर पादशाहीचे ... ' हा रोखठोक जबाब व ' लढाई करावी हाच आमचा निश्चय ' - हा ठामपणा यांतून भाऊंच्या स्वभावाचें इंगितच बखरकारानें प्रकट केलें आहे.

पृ. १८

**याप्रमाणें मजालस करून सरफराई केली** : भाऊंनीं सरदारांना अनुकल करण्याचें कसें चातुर्यानें, व्यवहारी दृष्टीनें साधलें हें वर्णनही लक्षणीय आहे. भाऊ उद्दामपणें वागत असा त्यांच्यावर जो आरोप केला जातो त्याचें विराकरण या मजकुरामुळें होतें.

पृ. २०

**नंतर सैन्याचे चार भाग** : यदुनाथ सरकारांनीं सैन्याची आंकडेवारी पुढीलप्रमाणें दिली आहे. ( स. फॉल २, पृ. २८९ )

**मराठी सैन्य** – डावी बाजू – इब्राहीमखान ( ८००० बंदुकधारी पायदळ ) दत्ताजी गायकवाड ( २५०० घोडेस्वार ) विठ्ठल शिवदेव ( १५०० घोडेस्वार ), मध्य बाजू – लहान सरदार ( २००० घोडेस्वार ) भाऊ व विश्वासराव हुजुरातसह ( १३५०० स्वार ) उजवी बाजू – अंताजी माणकेश्वर (१००० घोडेस्वार ) सटवाजी जाधव ( १५०० घोडेस्वार ) लहान सरदार ( २००० घोडेस्वार ) यशवंतराव पवार ( १५०० शिपाई ) समशेर बहाद्दर ( १५०० शिपाई ) जनकोजी शिंदे ( ७००० स्वार ) मल्हारराव होळकर ( ३००० स्वार ) एकूण ४५०००.

**दुराणीचे सैन्य** – डावी बाजू शहापसंद (५००० घोडदळ ) नजीबखान ( १५००० पायदळ ) सुजाउद्दौला (३००० स्वार)

मध्य बाजू – शहावलीखान ( १९००० शिपाई )

उजवी बाजू – अहमद बंगश ( १००० पायदळ ) हाफीजरहमत व धुंधीखान ( १४००० स्वार ) अमीर बेग व बरखुरदरखान ( ३००० पायदळ ) एकूण ६००००

पृ. २२

**या युद्धांत बळवंतराव गणपतराव मेहेंदळे यांजवर वार पडला** – ७ डिसेंबर १७६० रोजीं झालेल्या लढाईंत ही दुर्घटना घटली. मराठ्यांना जय मिळूनही ही मोठीच हानी झाली. ( ऐ. प्र. पृ. ८४, पा. १७६१, पृ. १११-११२, स. फॉल. पृ. ३०४ )

नाना फडणिसाच्या पत्रांत याबद्दल पुढील उल्लेख आहे.

'ही लढाई फार चांगली झाली होती. परंतु बळवंतराव यांचा प्रकार असा झाला यामुळें ते सर झाले.' ( रा. खं. १ क्र. २७२ )

पृ. २५ ते२७

क्रमांक १८ – २० दुतर्फा झालेला नाश, पडलेल्या सरदारांचीं यादी हा या बखरीचा विशेष म्हणून रियासतकारांनीं निर्देश केला आहे. ( म. रि. पे. वा. पृ. ४३७ टीप )

पृ. २७

**सलूखाचे सदाशिवपंत भाऊंकडे सूत्र.. .नाहीं** – भाऊंना तह कोणत्याही प्रकारें अपमानकारक रीतीनें नको होता तर 'अब्रू राखुनच' हवा होता नाहीं तर त्यांची लढाईची तयारी होतीच. याविषयीं त्यांचें पत्रांतील शब्द लक्षणीय आहेत. 'लढाई न पडतां सर्व प्रेत्न आबरू राहून होतील ते करू सेवटी नेटाने सर्व येकत्र जम्हून लढाई करू.' ( पु. द. १.३८९ )

प्रारंभी मराठ्यांची बाजू वरचढ होती. त्यांना यशाची बरीच खात्री होती त्यावेळचें हें वर्णन आहे. या वेळच्या कांहीं पत्रांतही हा उत्साह अब्दालीची झालेली नाकेबंदी यांचें वर्णन येतें. ४ नोव्हेंबर १७६० ला स्वतः भाऊंनीं गोविंदपंत बुंदेल्यांना लिहिलेल्या पत्रांतील वर्णन पहा– अब्दालीची

आमची गाठ पाणीपताजवळ पडली आहे. तोफखान्याचा आरावा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्यानें इकडेतिकडे जावत नाहीं व कांहीं करवत नाहीं ' ( राजवाडे खंड १ क्र. २६४. )

कृष्णजोशीचे ५ नोव्हेंबरचे पत्रही असेंच आहे – 'आमची फौज बहुत शेर आहे. अब्दालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं; युद्ध करावें तरी परिणाम नाहीं, उगेंच बसावें तरी भक्षावयास नाहीं.' (राजवाडे खंड १ क्र. २६५ )

पृ. २८

**परंतु दाणावैरणींकरतां पेशवेबहादुर मोठ्या फिकिरींत पडले** – अब्दालीनें आपली छावणी बदलली आणि उलट मराठ्यांचीच रसद तोडली. मराठी लष्करांत दुष्काळ पडला. ( पा. १७६१ पृ. ११७)

**गोविंदपंत बुंदेले . . . खजिना व दाणा भरून निघाले** – भाऊनें गोविंदपंत बुंदेल्यांना वसुली करून पैसे पाठवावें आणि अब्दालीची रसद तोडावी असे दोन हुकुम केले होते. गोविंदपंतानें डिसेंबरच्या प्रारंभीं चार लक्ष वीस हजार रु. गोळा करून नारोशंकराकडे दिल्लीत दिले. त्यानंतर अब्दालीची रसद तोडण्याचा तडाखा त्यानें सुरु केला. अब्दालीला ही बातमीं कळतांच त्यानें अताईखान व करीमदादखान या सरदारांना गोविंदपंतावर पाठवलें जलालाबादेजवळ त्यांनी गोविंदपंतांला गांठलें. मराठ्यांची निशाणे दाखवून त्यांची फसवणूक केली व स्नानसंध्या करून जेवणाच्या तयारींत असलेल्या गोविंदपंतांवर अचानक हल्ला केला. त्याचें शिर कापून नेलें. येथें बखरींत दिलेली शास्तेखां व जुलपुकरखां ही नांवें चुकीची आहेत. ( पा. १७६१ पृ. १२०–१२१, स० फॉल २ पृ. ३११, म. रि. पे. बा. पृ. ३९३ ) गोविंदपंतांच्या मृत्यूची तारीख शेजवलकर व सरदेसाई २० डिसेंबर सरकार १७ डिसें. मानतात, राजवाडे २२ डिसेंबर ( ऐ. प्र. पृ. ८४ )

**पंत मशारनिल्हेचे शीर कापून . . . भाऊसाहेबांकडे नजर पाठविले**, – या प्रसंगाचें वर्णन भाऊसाहेबांच्या बखरींत अधिक विस्तारानें आलें आहे, तेथें भाऊंनीं अब्दालीला दिलेलें तडफदार प्रत्युत्तरही आहे. ' तुमचे

गोविंदपंत पुढें तुम्हांस स्वर्गी जागा पहावयास गेले आहेत ' या अब्दालीच्या दर्पोक्तीला भाऊसमर्पक उत्तर देतात, ' तो जागा सर्वत्रांचा आहे. त्या शिवाय दुसरी गति कोणती आहे ? प्रस्तुत तुम्ही थोर, खंदाराचे पातशहा, तुम्ही तेथें जाल तेव्हां तुमचे स्वरूपाप्रमाणें मान झाला पाहिजे म्हणोन तुमचे मेजवानीस गोविंदपंत बुंदेले साहित्यास गेले आहेत. ' ( भा. ब. १२२ )

**मग महर्गतेची वार्ता .. थंड राहिले –** नाना फडणीसाच्या पत्रांत याला आधार मिळतो, ' भाऊ आरबा पसरून खंदक खणून मोंगलाई रीतीनें राहिले आहेत. दीन महिने यांची त्याची लढाई होते. मनसबा भारी पडला आहे. पैसा नाहीं, महागाई फार. यामुळें लष्कर गलबललें आहे. ( ऐ. पत्रव्यवहार लेख. ९७ – २८ डिसेंबरचे हें पत्र आहे. )

मराठी लष्कराची हलाखीची परिस्थिती जाणून अबदालीनें त्यांना उपासमारीमुळेंच बाहेर पडावें लागेल असा डाव टाकला. त्यांना सर्व बाजूंनीं हैराण करण्याचा उपक्रम केला. शेजवलकरांनीं म्हटलें आहे, ' या प्रकारांनीं मराठ्यांचे आरंभी असणारें युद्धदृष्ट्या श्रेष्ठत्व आपोआप कमी होत गेलें व उपासामुळें त्यांस बाहेर पडावें लागलें. ' ( पा. १७६१ पृ. १२७ )

राजवाडे म्हणतात, ' मराठे आपल्यापेक्षां जोरदार आहेत हें अब्दाली जाणून होता. तेव्हां मराठे उपासमारीनें अर्धमेले होऊन जात तोंपर्यंत त्यांच्याशीं युद्ध करावयाचें नाहीं हा जो फेबियन डावपेंच तो अबदालीनें चांगला उपयोजिला. ( ऐ. प्र. पृ. ८८ )

पृ. २९

**अन्नपाण्यावांचून घोड्या माणसांचे प्राण जातात –** सटवोजी जाधवराव यानें सुभानवास लिहिलेल्या पत्रांत असेंच वर्णन आहे. १९ जानेवारी १७६१ चे हें पत्र आहे. ' गिलचा आमच्या लष्कराभोवती फिरोन रस्त बंद केली वैरण जाळली यामुळें लष्करांत काळ पडला. लोकांस अन्न न मिळे, ऐसा प्रसंग जाला. घोडीं तो बहुत लोकांचीं मेलींच होती. राहिली तीहि पोटामुळें तुटलीं होती. ( राजवाडे खंड ६ क्र. ४०६ )

**उगीच हेका केला** – पानिपत प्रसंगावरील लिखाणांत पुष्कळ ठिकाणीं ही समजूत, कल्पना आलेली आहे. मल्हारराव होळकराचा गनिमी काव्यानें अब्दालीशी युद्ध करण्याचा सल्ला न मानतां भाऊसाहेबांनीं इब्राहीमखानाचा खंदक खणून राहण्याचा सल्ला मानला व आपलाच हेका चालविला यामुळें अखेरीस मराठ्यांची उपासमार होऊन सर्वस्वनाश ओढवला. अशा प्रकारची मीमांसा कांहीं ठिकाणीं केलेली आढळते. भाऊसाबांची कैफियत, भाऊसाहेबांची बखर यात तसेंच कांहीं फारसी ग्रंथांतूनहि हा विचार मांडलेला आहे. शिवप्रसाद तारीख फैजबक्ष ( पा. संग्राम. पृ. ७७ ) काशि राजाची बखर ( पा. संग्राम. पृ. ८३ ) भाऊसाहेबांचा गर्व, घमेंड यावर अपयशाचें खापर पुष्कळ ठिकाणीं फोडलेलें आढळतें. भाऊसाहेब स्वाभिमानी होते. त्यांनीं आपली मूळ भूमिका कायम ठेवून तहाचा प्रयत्न केला आणि शेवटीं 'आम्ही युद्धाचे सोबती' हा निर्णय घेतला. अशी त्यांची बाजू शं. ना. जोशी यांनीं मांडली आहे. (पा. रणसं. पृ. २२२-२२३) पाश्चात्य पद्धतीचे युद्धतंत्र भाऊंनीं अवलंबिलें होतें कारण उदगीरच्या लढाईंत त्यांना तोफखान्याचा प्रभाव कळला होता. परंतु सैनिकांना हें तंत्र अवलंबितां आलें नाहीं, कांहींना कळलें नाहीं, कांहींना कळून पचले नाहीं. ( शेजवलकर पा. १७६१. पृ. १३४ )

पृ. ३१

**उद्यां सर्वांनीं खंदकणार होऊन मारतां मारतां कटून मरावें** – उपासमारीनें मेटाकुटीला आलेल्या सरदारांनीं विचारविनिमय केला आणि भाऊंच्या आज्ञेप्रमाणे शत्रूवर तुटून पडण्याचा मार्ग अखेरीस मराठी सैन्यानें स्वीकारला. फारशी ग्रंथांतून याच प्रकारचें वर्णन आलें आहे. मीराते अहमदी – ( पा. संग्राम. पृ. ५२ ) खजानाये आमिरा – मराठ्यांच्या छावणींत रसदेची टंचाई झाली. उपासामुळें लोक रोज मरूं लागले. शेवटीं मराठ्यांनीं ठरविलें कीं छावणींत कुजून आणि उपासमारीनें मरण्यापेक्षां बाहेर पडून लढाई द्यावी. आमच्या नशिबांत मग तक्त असो किंवा तख्ता ( फाशीची फळी ) ( पा. संग्राम. पृ. ५८ ) तारीखे फैजबक्ष – उपासमारीमुळें सगळे लोक छावणींतून बाहेर पडून सैरावैरा पळत सुटतात कीं

काय असें वाटूं लागलें. सरदारांनीं सल्लामसलत केली. त्यांनीं पाहिलें कीं असें झालें तर सैन्य उधळून जाईल. त्यापेक्षां उद्यां छावणींतून बाहेर पडून लढाई करावी. ( पा. संग्राम. पृ. ७८ )

**समय तर तुटक व दुर्घट प्राप्त जाहाला** – पानिपतावरील निकाली युद्ध होण्यापूर्वीची कठीण अवस्था. प्रत्यक्ष मृत्यू समोर दिसत असतांना भाऊसाहेब आणि विश्वासराव यांची येथील भाषणें बखरकारानें अंतःकरण हेलावून सोडणारी अशी दिली आहेत. रूमशाम येथील सरदेशमुखीच्या वतनाचीं वस्त्रें मिळविण्याची प्रतिज्ञा तर या निदानसमयीं अधिकच धारदार वाटते.

पृ. ३७-३८

**क्रमांक ३१-३२** – पानिपतचा १४ जानेवारी १७६१ चा संग्राम अगदी अटीतटीचा झाला. दोन्ही पक्षांकडील –मराठे व दुराणी– वीरांनी पराक्रमाची शर्थ केली. याचें वर्णन बखरकारानें मोठ्या आवेशानें केलें आहे. स्वतः अब्दालीनें जयपूरचा राजा सवाई माधवसिंह याला लिहिलेल्या पत्रांतील वर्णन पाहावें.

'सिंहासारखे शूर वीर आणि शक्तिशाली शिपाई विजेप्रमाणे एकमेकांवर तुटून पडले. त्यांनीं गाजविलेलें शौर्य यापूर्वीं कधींच दृष्टीस पडलें नाहीं. रुस्तुम आणि इस्फिदारसारख्या वीरांनीं हे युद्ध पाहिलें असतें तर त्यांनीं आश्चर्यानें आपलीं बोटें चावलीं असतीं ...' ( पा. संग्राम. पृ. ४२ )

निजामुद्दीन या कवीनें अब्दालीच्या जीवनावर 'शहनामाये अहमदिया' हें काव्य केलें आहे. त्यांत या युद्धाचें काव्यमय वर्णन आलें आहे. तो म्हणतो, 'दोन्ही सैन्यें प्रचंड पर्वताप्रमाणें भासत होतीं. सैन्याच्या धुराळ्यानें अंधार पडला. परमेश्वरानें जणू त्याच दिवशीं प्रळय घडवून आणण्याचें ठरविलें होतें. दोन्ही सैन्यांतून तोफांचा मारा होऊं लागला तेव्हां चोहों-कडून आगीचा दर्या वाहतो असें वाटलें. उभय सैन्यांनीं शौर्यांत कोणतीच कसूर केली नाहीं. ( पा. संग्राम. पृ. ७१ )

स्वत: अब्दाली आणि त्याचे विजयगीत गाणारा कवी यांनींही मराठ्यांच्या शौर्याची ग्वाही दिलेली आहे; मग बखरकाराला हे वीरांच्या वीरश्रीचें वर्णन करतांना स्फुरण चढल्यास आश्चर्य कोणतें ?

पृ. ४०

**विश्वासरावसाहेब अंबारींतून तिरंदाजी ... वैकुंठवासी जाहाले** – युद्धाच्या धुमश्चक्रींत मराठ्यांच्या बाजूचे पारडें प्रथम वरचढ होतें. पण दुपारीं विश्वासरावाला गोळी लागल्यावर मात्र मराठी सैन्याचे व विशेषत: भाऊसाहेबांचें मनोधैर्य एकदम खचलें. विश्वासरावाला गोळी लागून मृत्यु आल्याचा निर्देश अनेक कागदपत्रांतून व ऐतिहासिक ग्रंथांतून येतो. सटवोजीराव जाधवांची पत्रें ( राजवाडे खंड ६, क्र. ४०६, ४०९ ) नाना पुरंदरे यांचे पत्र ( पु. द. ३, क्र. २०९ ), भाऊसाहेबांची कैफियत, भाऊसाहेबांची बखर, नाना फडणीसाचे आत्मचरित्र यात हीच माहिती आहे. शेजवलकर व यदुनाथ सरकार विश्वासरावाला बाण लागला म्हणतात. ( पा. १७६१, पृ. ९३, स. फॉल. २, पृ. ३४१) रियासतकार सरदेसाई म्हणतात, त्याच्या छातींत झांबरकाची गोळी अवचित शिरून तो तत्काळ गतप्राण झाला. ( म. रि. पे. बा. पृ. ४०५ )

पृ. ४२

**तेव्हा मल्हारजी होळकर यांस आज्ञा जाहली कीं, तुम्ही पुण्यास जावें**– मल्हारराव होळकरांना भाऊसाहेबांनीं पार्वतीबाईंच्या संरक्षणाची कामगिरी सांगितली होती असें होळकरांच्या थैलीत आलें आहे. ' मग त्यांनीं आम्हाला त्वरेनें निरोप पाठविला कीं आमच्या कुटुंबाला युद्धभूमींतून सत्वर घेऊन जावें. आपणही लढावें आणि रणांगणांत जीव द्यावा हेच आम्हाला इमानीपणाचें वाटलें पण भाऊसाहेबांनीं दिलेली आज्ञा आठवली. निरुपाय होऊन भाऊ साहेबांचे कुटुंब बरोबर घेऊन आम्ही लष्करांतून निघालों ( पा. संग्राम पृ. ४० ) मल्हारराव होळकर युद्धांतून पळून आलें असा जो आरोप केला जातो त्याची ही दुसरी बाजू पाहण्यासारखी आहे. याखेरीज पहा ( हो. थैली राज. खंड ३, पृ १९१ )

**भाऊसाहेबांनी उत्तर केलें... वडिलांचे भेटीस आपण जावें हें अयोग्य**–रणांत विश्वासराव पडल्यावर भाऊसाहेब दुःखानें बेहोष झाले. फार मोठी हानी आपल्या हातून झाली अशा समजुतीनें त्यांनीं त्वेषानें शत्रूवर चाल केली. होळकरांच्या थैलींत असेंच वर्णन आलें आहे, 'भाऊसाहेब म्हणूं लागले कीं, नानासाहेबांनीं विश्वासरावाला माझ्या हवाली केलें होतें. मी त्यांना काय तोंड दाखवूं आणि त्यांना काय उत्तर देऊं. आतां हें जीवन आम्हाला संकट वाटतें.' ( पा. संग्राम पृ. ४० पहा भा. व. पृ. १३२. )

मीरकवीच्या फारसी भाषेंतील आत्मचरित्रांत पानिपतच्या हकीकतींत असेंच भाऊंच्या स्वाभिमानी वर्तनाचें वर्णन केलें आहे.

'भाऊ मोठा स्वाभिमानी होता. तो शौर्याची शर्थ करीत होता. जेव्हां त्यानें विश्वासरावाचा प्रकार आपल्या डोळयानें पाहिला तेव्हां तो म्हणाला कीं, 'दक्षिणेंत जाण्यास आतां मला तोंड राहिलें नाहीं आणि मग त्यानें जिवावर उदार होऊन अब्दालीच्या फौजेच्या मध्यावर हल्ला केला.' ( पा. संग्राम. पृ. १८८ )

सरदेसाईंच्या मतें विश्वासराव पडल्यावर भाऊ बेभान झाला व आवेशानें रणांत घुसला ही सेनापती या दृष्टीनें त्याची अक्षम्य चूक होय. भाऊच्या ठिकाणीं अनेक बहुमोल गुण होतें पण बिकट प्रसंगीं शांत चित्त ठेवण्याचा सेनापतीचा मुख्य गुण नव्हता असें त्यांनीं म्हटलें आहे. ( म. रि. मध्यविभाग ३, पृ. २०० )

**मलकाजमानीन .. पदर पसरला कीं** – पानिपत युद्धापूर्वी अब्दालीनें हिंदुस्थानांत जी स्वारी केली त्यामागें मलकाजमानी या महाराणीचा महंमद शहाच्या पत्नीचा हात होता. शेजवलकर म्हणतात, 'या खेपेला अब्दालीला हिंदुस्थानांत बोलाविण्यांत व आतां त्याला छावणी करण्यास लावून मराठ्यांच्या पारिपत्यासाठीं थांबवून ठेवण्यांत, नजीबाबरोबर तिचाच पुढाकार होता. ( पानि. १७६१ ) नजीबखानानें सुजाउद्दौला व त्याची आई यांचें मन वळवण्याचें काम मलकाजमानीला सांगितलें होतें. मराठ्यांचें संकट सर्व मुसलमानांविरुद्ध आहे अशा युक्तिवादानें तिनें त्यांना अब्दालीच्या बाजूला वळविलेलें दिसतें. मलकाजमानीनें सुजाउद्दौला याला

उद्देशून केलेलें तडफदार भाषण राजवाडे खंड ३, पृ. १८६ वर दिले आहे. होळकरांच्या थैलींतील हें भाषण आहे. तेथें मलकाजमानी तयार होऊन अवघ्यांचें मागें होती. पठाण फौजेची अधैर्यता पाहून चिंतागत जाली ... असें वर्णन आलें आहे. ( राजवाडे खं. ३, पृ. १८८ )

पृ. ४३

**ते समयीं श्रीहरी विन्मुख जाहला** – भाऊंनी हुजुरातीच्या सैन्यासह निकराची लढाई दिली. पण अब्दालीनें नव्या दमाचे सैनिक पुढें आणल्यावर त्यचांया माऱ्यापुढें मराठ्यांच्या थकलेल्या सैन्याचा टिकाव लागला नाहीं व अखेरीस मराठ्यांचा पाडाव झाला अशी मीमांसा रियासतकार सरदेसाई व शेजवलकर यांनीं केली आहे. ( म. रि. पे. बा. पृ. ४०३, पा. १७६१, पृ. १७६ )

**खंदक भरल्यावर आले** – युद्धांत पाडाव झाल्यावर मराठ्यांचा पळ सुरू झाला. अत्यंत हलाखीच्या अवस्थेंत लुटीला तोंड देत लोक परत आले. या दुर्दशेचें वर्णन पानिपत प्रसंगाचें हकीगत देणारीं पत्रें, इतिहास ग्रंथ, बखरी सर्व ठिकाणीं पाहावयास मिळते. कांहीं महत्त्वाचे संदर्भ खालीलप्रमाणें

सटवोजी जाधवाचे सुभानवास पत्र. (राजवाडे खंड ६, क्रं. ४०९)

' वरकड लोक पायउतारा, अंगावरीं पांघरुण नाहीं ऐसें, विपत्तीनें आलें. माणसाचे हाल मोठे जाले, हत्ती, घोडे, पालख्या, डेरे, कुलसरंजाम अवघे लस्कराचा गेला. '

खजानाये आमिरा ( पा. संग्राम पृ. ५९ )

रणातून जे पळाले त्यांना आसपासच्या खेड्यापाड्यातील लोकांनी सर्वस्वी नागविले आणि कित्येकांना ठार मारले.

भाऊसाहेबांची कैफियत, भाऊसाहेबांची बखर, ( पृ.१४२ ) काशिराजाची बखर यांत कत्तल आणि लूट यांचे भेदक वर्णन आलें आहे.

या खेरीज पहा नजीबखान चरित्र ( पा. संग्राम पृ. ६९ ) तारीखे फैजबक्ष ( पा. संग्राम पृ. ७९ )

**कितीकांचे तोतये जाहाले** – भाऊसाहेबांचा तोतया सुखनिधान प्रसिद्धच आहे, हरिपंत फडके व जनकोजी शिंदे यांचेही तोतये झाले.

**भाऊसाहेब केवळ ... मंगळवारीं पौष शुद्ध २ अवतार संपविला**– पानिपतचे निकाली युद्ध १४ जानेवारी १७६१ रोजीं, बुधवार पौष शुद्ध अष्टमीस झाले. या बखरींतील तिथी चुकलेली आहे. शेजवलकर व रियासतकार सरदेसाई दोघांनीं पौष शुद्ध अष्टमी हीच तिथी ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारें ग्राह्य मानली आहे. सटवोजी जाधवरावाचे दोन्ही पत्रांत हीच तिथी येते. ( राजवाडे खंड १, क्र. ४०९ ) पौश शुद्ध अष्टमीस श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांणीं आपल्या फौजेनिशीं अब्दालीवरी चालोन गेले - ( राजवाडे खंड १, क्रं. ४०६ ) मध्यें - निदान प्रसंग जाणोन पौष शुद्ध अष्टमी बुधवारीं हल्ला केला. असा उल्लेख आहे.

नाना पुरंदऱ्यांच्या मातोश्रीला लिहिलेल्या पत्रात (पु. द. ३, क्र.२०९) पौश शु॥ ८ अष्टमीस श्रीमंतांनी गिलज्याचे फौजेसी जाऊनें युद्धे मोठे मातबर केले म्हटलें आहे. याखेरीज पहा–नाना फडणीस पत्र ( पु. द. १, क्र. ४१७ )

भाऊसाहेबांचे ठिकाण लागलें नाहीं असा उल्लेख कांहीं कागदपत्रांतून येतो तर कांहीं कागदपत्रात, रणांगणावर नंतर भाऊसाहेबांचें प्रेत सांपडलें व त्याचेवर अग्निसंस्कार करण्यांत आला असें उल्लेख आढळतात.

| फारशी ग्रंथ | ग्रंथकार | पा. संग्राम. पृ. |
|---|---|---|
| खजानायें अमिरा | बिलग्रामी | ५९ |
| नजीबखान चरित्र | नुरुद्दीन | ६९ |
| शहानामाये अहमदिया | निजामुद्दीन | ७३ |
| तारीखे फैजबक्ष | शिवप्रसाद | ७८ |
| मनाजिल अल्फतूह | शाम्लू | १२० |
| इमादुस्सादत्त | सय्यद गुलामअली नकवी | १४८ |
| तारीखे सुलतानी | सुलतान महमदखान दुराणी | १७४ |

वरील फारशी ग्रंथातून भाऊसाहेब मारले गेले अशी निश्चित माहिती दिली जाते. उलट मराठी कागदपत्रात याबाबत अनिश्चितता आढळते. कोण: 'ठिकाण लागत नाहीं म्हणतात, पहा. सटवोजी जाधव ( राजवाडे ६, क्र. ४०६ ) नाना फडणीस ( पु. द. १, क्र. ४१७ ) नानांच्या आत्मचरित्रातही असेच वर्णन आहे. तर नाना पुरंदरे (पु. द. ३, क्र. २०९) भाऊसाहेबांचा थांग जयनगरास लागला आहे– असें लिहितात; जिवाजी नाईक ( इस. ऐ. टि. १, २१) 'जाट याच्या मुलुखात गेलेत' म्हणतात– भाऊंच्याबाबत अशा कांहीं अफवा उठत होत्या असें दिसतें.

काशीराजाच्या बखरींत व त्याच्या पत्रात मात्र रणांगणांतून शव आणले व चंदनादिक संस्कार केलें असें वर्णन येते.

काशीराजाच्या बखरींतील वर्णन विस्तृत आहे. ( पा. संग्राम. पृ. १०४–१०६ ) सुजाउद्दौल्यानें पाणी वाहणारे भिस्ती बरोबर घेऊन पानिपतच्या रणांगणावर शोध केला. तेव्हां एक प्रेत काढतांना त्यावरून मूल्यवान मोती खाली पडले. शरीरावर पैशाएवढा काळा तीळ पायावर मत्स्याची खूण व पाठीवर मुजफ्फरखानानें केलेली कटयारीची जखम अशा खुणा दिसल्या त्यावरून तें प्रेत भाऊंचेच अशी खात्री झाली. एका दुराणी शिपायानें भाऊंचें शिर लपवलें होतें तेंही नंतर मिळालें. शुजाउद्दौल्यानें भाऊंचें प्रेत व संताजी वाघाचे प्रेत दोन्ही हत्तीवर घालून आणली आणि काशिराजाकडे संस्कारासाठीं दिलीं. काशीराजाच्या दोन पत्रांत भाऊसाहेब' व विश्वासराव यांच्या शवावर अग्निसंस्कार केल्याचा उल्लेख आला आहे.

( १ ) २४ फेब्रुवारीचे १७६१ चे नानासाहेबांना लिहिलेलें पत्र ( पे. द. २, क्र. १४८ )

( २ ) ३ मार्च १७६१ चे त्रिंबकराव नानांस लिहिलेलें पत्र (राजवाडे ६ क्र. ४०८ ) यात तो म्हणतो, 'आणिक सेवा न घडली. ईश्वरें हाच वाटा आम्हांस नेमिला होता! भगवत् इच्छेस उपाय काय'

अनुपगीर गोसवी याचेंही एक पत्र यासंबंधीचें उपलब्ध आहे ( राजवाडे ६ क्र. ४०७ ) त्यात काशीराजाप्रमाणेंच रणभूमींत सुजा-

उद्दौल्याला भाऊंचें प्रेत सांपडलें, खूणा पाहून ओळखलें व शेवटीं अंत्यसंस्कार केला अशी माहिती आली आहे.

पृ. ४४

**ते तहकीक . . . पुण्यास नानासाहेबांस लिहून पाठविलें** – पानिपतच्या युद्धांत मराठ्यांचा झालेला पाडाव आणि भाऊंचा मृत्यू यासंबंधी माहिती पुण्यास पेशव्याला बारनिसानें कळविली हें बखरींतील वर्णन चूक आहे. नानासाहेब पेशवे नोव्हेंबर २२ लाच उत्तरेस निघाले ( राज. ३, क्र.१९७ ) १४ नोव्हेंबरचे भाऊंचें पत्र त्यांना मिळालें त्यानंतर उत्तरेकडील माहिती कळेना म्हणून नानासाहेब अस्वस्थ झाले. ( राजवाडे ३, क्र. २१० ) १८ जानेवारी १७६१ चे नानासाहेबांचें जें पत्र उपलब्ध आहे त्यावरून ( पु. द. १, क्र.३९५ ) विशेषत: ' कुमक पावावी हेच ईश्वराजवळ इच्छितो ' या शब्दांतून त्यांची चिंता व्यक्त होते. पानिपत युद्ध समयीं नानासाहेब पेशव्यांचा मुक्काम भेलशाजवळ होता. १९ जानेवारीला पानिपतहून निघालेला सावकारी जासूद त्यांना २४ जानेवारीला भेटला. त्याजवळील सांकेतिक मजकुराच्या कागदांत लिहिलें होतें. ' दोन मोती गलत. दसवीस अश्राफत रुपयोंकी गणति नहीं. ' (म. रि. मध्य विभाग ३, पृ. २११) पुढें विस्तृत हकीकत नानासाहेबांना ३ फेब्रुवारीला कळली. नानासाहेब उत्तरेंत सिहोर, सिरोंज, पछार मार्गें गेले. पण त्यांची प्रकृती बिघडली. भाऊंचा शोध लागेल ही त्यांची आशा व्यर्थ ठरली आणि २२ मार्च रोजीं ते परत पुण्यास आले. ( स. फॉल २ पृ. ३५९, ६० )

**केवळ भाऊसाहेबांचें वेड लागलें** – पुरंदरे दप्तरांतील नानासाहेबांच्या कांहीं पत्रांतून त्यांना भाऊंना आपण दुरावलों म्हणून किती तीव्र दु:ख झालें याचें वर्णन अगदीं हृदयस्पर्शी असें आलें आहे.

पु. द. खंड १, क्र, ४०० – ' येक भाऊवांचून दुनिया दौलत व्यर्थ आहे. त्याचें हातचें पत्र पाहीन तेव्हां माझें बायकोस मला जीव येईल. आतां तो वेडेपणें आहो. लेक अल्पायुषी होता. सूर्यमंडल भेदून गेला. तें दु:ख परमार्थ शास्त्रपुराणें करून टाकिलें. परंतु चिरंजीव भाऊवांचून दुनिया व्यर्थ आहे. '

**नानासाहेब शोकार्णवी पडोन भ्रांत जाहाले** – नाना फडणीसाच्या आत्मचरित्रांत याचें वर्णन आलें आहे. याखेरीज भा. ब. पृ. १४५– पृ. ४५

**सर्वांचीं भाषणें ... माघारा ढाला फिरविल्या** – याबाबत गोपिकाबाईनें पेशव्यांची प्रकृती खालावलेली पाहून परत येण्याचा आग्रह धरला असें रियासतकार सरदेसाई म्हणतात, ( म. रि. पे. बा. पृ. ४३१ ) भाऊसाहेबांच्या बखरींत ' गोपिकाबाई यांणीं बहुत बोध विवेकें करून माघारें फिरवि ' अशी माहिती येते. येथील कलावंतिणींची विनंती आणि त्याच्या अनुषंगानें कारभारी व सरदार यांची विनंती हे बखरकारांचे कल्पित वर्णन असावें.

**इंहिदे ... नानासाहेबांनीं कैलासवास केला** – नानासाहेब पेशवे २३ जून १७६१ रोजीं मरण पावलें. ( म. रि. पे. बा. पृ. ४५० ) ( स. फॉल. २, पृ. ३६० ) भाऊसाहेबाच्या बखरींत बाजीरावानंतर ६ महिन्यांनीं चिमाजीआप्पा मृत्यू पावले याचा उल्लेख केला आहे. रामभरताची साम्यता दाखविली आहे. ( भा. ब. पृ. १४५ )

**जनकोजी शिंदे .. ठिकाण लागलेंच नाहीं** – जनकोजी शिंदे यांचे ठिकाण लागलें नाहीं असा असा निर्देश कांहीं पत्रांतून आहे सटवोजी जाधवचे पत्र (राज ६ क्र.४०६) नाना पुरंदरे यांचें पत्र (पु. द. ३, क्र. २०९) जनकोजी जाटाच्या मुलखांत गेले अशी बातमी जिवाजी नाईकच्या पत्रांत येते ( इ. सं. ऐ. टि. भाग १, पृ. २०-२१ ) अबदालीनें माधवसिंहाला लिहिलेल्या पत्रांत जनकोजीचें काय झालें तें कळलें नाहीं ( पा. संग्राम. पृ. ४२ ) असा उल्लेख आहे तर अली महंमदखान याच्या ' मीराते अहमदी ' मध्यें म्हटले आहे. जनकोजी हे जीवंत आहेत का मेले आहेत याचा छडा लागला नाहीं (पा. संग्राम. पृ. ५४) काशीराजाच्या बखरींत मात्र जनकोजी शिंदेच्या मृत्यूची निराळीच माहिती दिलेली आहे. बर्खुर्दारखान याचा दिवाण मोतीलाल याच्या तंबूंत जनकोजी शिंदे जखमी अवस्थेंत होता. जनकोजीला वाचविण्यासाठीं मोतीलाल व काशीराज यांचे प्रयत्न चालू असतां नजीब-

खानानें फसवून, दुष्टपणा करून जनकोजीला बर्खुर्दारनें आश्रय दिला असल्याचें शहावलीखानातर्फे अबदालीला कळविलें. बर्खुर्दारनें याचा इन्कार केला व जनकोजीचा वध करून त्याला पुरुन टाकण्याची आज्ञा आपल्या माणसांना दिली. ( पा. संग्राम पृ. १०१–१०३ )

**बापुजी बल्लाळ फडके** - हरिपंत बल्लाळ फडके यांचा हा भाऊ. हा पानिपतच्या युद्धात मरण पावला. इ. १७६२ मध्यें हरिपंतास माधवरावानें कारकून नेमले.

पृ. ४५-४६

**विश्वासरावसाहेब यांचा हत्ती .. श्रम पावले** – अनुपगीर गोसावी यांच्या पत्रांत विश्वासरावाचें प्रेत दुराणीनें नेलें होतें तें सुजाउद्दौलानें आपणाजवळ आणविलें आणि अनुपगीराला ' आज्ञा केली कीं येथासांग याचें सार्थक करणें ' अशी माहिती आली आहे. (राज. खंड ६, क्र. ४०७) काशीराजाच्या बखरींत वर्णन केलें आहे, ' शहावलीखान आणि इतर अफगाण आणि हिंदुस्थानी सरदार यांनी विश्वासरावाचें प्रेत पाहिले ' आणि ते म्हणू लागले कीं, ' अशा वर्णाचा आणि सुंदर बांध्याचा मनुष्य आमच्या आजपर्यंत पाहण्यांत आला नाहीं ' ( पा. संग्राम पृ. १०१ )

पृ. ४६

**आमचा हिंदूंचा मुर्दा .. प्रेत त्यांचें हवाली केलें** – येथे गोसाव्यांनी अब्दालीकडे अर्ज केला असें बखरकार म्हणतो. काशीराजाच्या बखरींत निराळी माहिती दिली आहे. दुराणी शिपायांनीं आग्रह धरला कीं, ' हा दख्खनचा बादशहा होता. त्याचें प्रेत वाळवून देशी नेलें पाहिजे. ' सुजा-उद्दौल्याला ही बातमी कळतांच त्यानें अब्दालीकडे जाऊन विनंती केली, ' वैर हे जिवंतपणीं असतें. विजयानंतर शत्रूच्या मृत सरदारांचे दहन अगर दफन त्यांच्या पद्धतीप्रमाणे करवावें असें करण्यांतच लौकिक आहे. विश्वासरावाला आमच्या ताब्यांद देण्यांत यावें. हिंदुधर्माप्रमाणे त्याचे दहन करवू. ' ( पा. संग्राम, पृ. १०१ ) यदुनाथ सरकारांनीं ह्यावर आधारित निर्देश केला आहे. (स. फॉल. २, पृ. ३४९ ) विश्वासरावाच्या शवावर अग्नि

संस्कार केल्याचें उल्लेख काशीराजाच्या दोन पत्रांत ( पे. द. २, क्र. १४८, राजवाडे ६, क्र. ४०८ ) व अनूपगीर गोसाव्याच्या पत्रांत (राजवाडे ६, क्र. ४०७ ) आहेत.

**पुरुषान देखणा विश्वासरावसाहेब** – शिवप्रसादने तारीखे फैजवक्ष मध्यें म्हंटलें आहे, ' विश्बासराव हा तरुण, देखणा आणि अनुपम असा सुंदर होता. ' ( पा. संग्राम ७९ )

**मस्तानी** – बुंदेलखंडाच्या स्वारींत छत्रसालाकडून बाजीरावाला ही प्राप्त झाली. बाजीराव मस्तानी यांचें प्रेमप्रकरण इतिहासांत प्रसिद्ध आहे आणि अनेक ललित कृतींना या प्रेमप्रकरणानें जन्म दिला आहे. चिमाजी आप्पाला हें प्रकरण पसंत नव्हतें. त्यानें मस्तानीला कैदेत टाकलें होतें पण ती बाजीरावाकडे पळून गेली. अत्यत सुंदर, देखणी असें मस्तानीचें वर्णन ठिकठिकाणीं येतें. १७४२ मध्यें तिचा मृत्यू झाला. बाजीरावाच्या मृत्यूनंतर फार दिवस ती जगली नाहीं. पानिपतच्या लढाईवर गेलेला समशेरबहादूर हा तिचा पुत्र होय.

पृ. ४७

**शके १६८४ .. मंदवासर** – राजवाडचांनीं या तिथीबद्दल शंका प्रगट केली आहे. ' फाल्गुन शुद्ध ५ मीला मंदवार नसून शुक्रवारच आहे ' असे ते म्हणतात ( ऐ. प्र. पृ. १०८ )

पृ. ४९

**खांसा इभ्रामखान ठार पडला** – फारशी साधनांतून इब्राहीमखान जखमी झाला. होता. अब्दालीनें त्याचा वध केला. अशी माहिती येते. मराठचांच्या बाजूनें इब्राहीमखान मुसलमानांविरुद्ध लढला म्हणून त्याला धर्मभ्रष्ट असें फारशी ग्रंथांत म्हटलेलें आढळतें ' या धर्मभ्रष्टाला वध हीच शिक्षा योग्य होय ' असें तारीखे हुसेनशाही मध्यें अब्दालीनें म्हटल्याचें आलें आहे ( पा. संग्राम, पृ. १४० ) याखेरीज पहा तारीखे अहमद ( पा. संग्राम, पृ. १६३ ) तारीखे सुलतानी ( पा. संग्राम, पृ. १७४ ) काशीराजाच्या बखरींतील वर्णन पुढीलप्रमाणें आहे. ' इब्राहीमखान गार्दी ' जखमी होऊन

शुजाउद्दौल्याच्या लष्करांत आला होता. ही बातमी अहमदशहाला कळली. दुराणी शिपाई ओरडू लागले, 'इब्राहीमखान आमचा शत्रू आहे. त्याला आमच्या हवालीं करा' दुराणी शिपाई व सुजाउद्दौला यांत कटकट होणार हे पाहून शहावलीखान मध्यें पडला. त्यानें दगा करणार नाहीं म्हणून शपथ घेऊन इब्राहीमखानाला ताब्यांत घेतलें. त्याच्या जखमेवर विष बांधण्यांत आलें आणि त्याला वाईट अन्न देण्यात आलें. अहमदशहा दिल्लींत दाखल झाल्यानंतर सात दिवसांनीं इब्राहीमखान वारला. (पा. संग्राम, पृ. १०३)

* * *

१४५०

# डॉ. सौ. कुसुम व्यं. कुलकर्णी

डॉ. सौ. कुसुम व्यं. कुलकर्णी यांनी आपल्या अध्ययनकालात सतत प्रथम श्रेणी आणि पारितोषिके मिळवून उज्ज्वल यश संपादन केले आहे. एम्. ए. ला प्रथम श्रेणीत येऊन त्यांनी मराठीची तीन पारितोषिके मिळविली. 'मराठी कादंबरीतील मनोलेखन' ( इ. स. १८५५ ते १९५५ ) हा प्रबंध लिहून त्यांनी पुणे विद्यापीठाची पीएच् डी. पदवी घेतली या प्रबधाला पुणे विद्यापीठाने डॉ. य. वि. परांजपे पारितोषिक बहाल केले आणि उत्कृष्ट प्रबंध म्हणून त्यांचा गौरव केला.

सखोल संशोधन, चिकित्सक, मर्मग्राही दृष्टिकोण आणि समतोल विवेचन यांचा परिपाक म्हणजे त्यांचा हा प्रबंध होय. प्रस्तुत पाणिपतच्या बखरीच्या संपादनात त्यांची हीच गुणवैशिष्टचे प्रगट झाली आहेत.